



# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १२ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## राज्याभरातील बँकिंग कामकाज ठप्प

**पुणे/मुंबई :** युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी, विशेषतः आठवड्यातून पाच दिवस कामकाज सुरू ठेवण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या कर्मचा-यांनी आजपासून चार दिवसांच्या देशव्यापी संपाची हाक दिली आहे. या संपामुळे देशभरासह पुण्यातील बँकिंग कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे.शुक्रवारी पुण्यातील पुणे स्टेशन ट्रेझरी परिसरात सर्व बँक कर्मचा-यांनी एकत्र येउन जोरदार निदर्शने केली आणि केंद्र सरकारच्या धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला. पाच दिवसांचा आठवडा लवकरात लवकर लागू करावा, या (पान २ वर)

# ट्रक-पिकअप व्हॅनच्या धडकेत 9 जणांचा मृत्यू

## मृतांमध्ये तीन चिमुकल्यांचा समावेश





## माहेरच्या वाटेवरच तीन पिढ्यांचा अंत! नियतीने आई, लेकीसह नातीलाही हिरावले

**भंडारा/प्रतिनिधी :** नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक येथील भाउ ढाब्याजवळ ट्रक आणि पिकअप व्हॅनमध्ये जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात तब्बल ९ जणांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये तीन लहान बालकांचाही समावेश आहे. तर तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

पहाटेच्या सुमारास नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक परिसरात हा भीषण अपघात घडला. भाउ ढाब्याजवळ ट्रक आणि पिकअप व्हॅनची जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत तीन चिमुकल्यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. या अपघातात तीन जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघात नेमका कशामुळे झाला, याचा तपास पोलीस करत आहेत. सासरी गेलेल्या लेकीला तीजच्या सणाला माहेरी आणण्याची छत्तीसगढमधील प्रथा. त्यासाठी नागपुरातून जामबाई वर्मा या त्यांची लेक मीनाक्षी आणि नात ग्रेशा या दोघींना माहेरी नेण्यासाठी छत्तीसगडला गेल्या होत्या. १४ तारखेला तीज सण साजरा करायचा या ओढीने मायलेकींचा प्रवास नागपूरच्या दिशेने सुरू झाला सुरू झाला. गाडीत जामबाई मुलगी मीनाक्षीच्या शेजारी बसल्या होत्या, तर मीनाक्षीची चिमुकली ग्रेशा तिच्या मांडीवर विसावली होती. पण माहेरच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचण्याआधीच पहाटेच्या काळोखात काळाने वाट अडवली आणि जामबाई, मीनाक्षी व तिची चिमुकली मुलगी ग्रेशा अशा एकाच कुटुंबातील तीन पिढ्यांचा दुर्दैवी अंत झाला. मीनाक्षीची जावू सरिता तिचा देखील जागीच मृत्यू झाला. तीजच्या आनंदासाठी सुरू झालेला प्रवास त्यांच्या आयुष्यातील अखेरचा प्रवास ठरला.छत्तीसगढमध्ये तीज सणाला विशेष महत्त्व आहे. तीज हा केवळ सण नाही, तर माहेर आणि लेकीच्या नात्याला पुन्हा उजाळा देणारा दिवस आहे. सासरी गेलेल्या मुलींना माहेरी आणून त्यांच्या अखंड सौभाग्यासाठी प्रार्थना केली जाते. त्यामुळे मुलीला माहेरी आणण्यासाठी आई, भाउ किंवा कुटुंबातील सदस्य स्वत? सासरी जातात. नागपूरमध्ये कामानिमित्त स्थायिक झालेल्या अनेक छत्तीसगढी कुटुंबांतील मुलींचे विवाह मात्र छत्तीसगढमध्ये झाले आहेत. याच परंपरेनुसार विचारपूर आणि परिसरातील महिला आपल्या मुलाबाळांसह नागपूरच्या दिशेने निघाल्या होत्या.

मीनाक्षीला माहेरी आणण्यासाठी तिची आई जामबाई यांच्यासोबत मीनाक्षीची जाउ सरिताचा हिचा भाउ गुलशनही गेला होता. १३ सप्टेंबर रोजी तीज असल्याने सणाच्या दोन दिवस आधी सुरू झालेला हा प्रवास आनंदाचा असावा, अशीच अपेक्षा होती. मात्र पिंपळगावने या प्रवासाचे सारे चित्रच बदलून टाकले.

शुक्रवारी पहाटे चारच्या सुमारास पिंपळगाव येथील इंडियन ऑईल पेट्रोलपंपासमोर राष्ट्रीय महामार्गावर बोलेरो आणि ट्रकची जोरदार धडक झाली. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, पेट्रोलपंपावरून ट्रक रस्त्यावर येत असताना रायपूरकडून नागपूरच्या दिशेने येणारी बोलेरो ट्रकवर मागून आदळली. या दुर्घटनेत सहा महिला आणि तीन चिमुकल्यांसह नउ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले. जखमींना साकोली उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मृतदेह भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले.

### एका कुटुंबातील चार जण हिरावले...

या दुर्घटनेने वर्मा कुटुंब अक्षरशः उद्ध्वस्त झाले. जामबाई मुलगी मीनाक्षीला आणि नात ग्रेशाला तीजसाठी नागपूरला आणण्यासाठी गेल्या होत्या. मात्र त्या तिघीही परतल्या नाहीत. त्याच कुटुंबातील मीनाक्षीची जाउ सरिता वर्मा हिचाही या अपघातात मृत्यू झाला. सरिताची दोन लहान मुले रितेश आणि सुभाष जखमी झाली आहेत. सरिताचा भाउ गुलशनही गंभीर जखमी असून त्याच्यावर भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## विदर्भात 5 लाख कोटींची गुंतवणूक, 3 कोटी रोजगार

### मुख्यमंत्र्यांचे खाण परिषदेत वक्तव्य



**नागपूर/प्रतिनिधी :** गडचिरोलीतील लोहखनिज, विदर्भातील कोळसा आणि दुर्मीळ खनिजांच्या साठ्यांमुळे आगामी काळात या प्रदेशाचे आर्थिक चित्र पालटू शकते. विदर्भात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि वर्षाला जवळपास ५ कोटी टन पोलाद उत्पादनक्षमता विकसित होत आहे. त्यामुळे गडचिरोलीसह ६ जिल्हे खाणकाम, हरित पोलाद आणि नव्या उद्योगांचे केंद्र बनतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**फडणवीस नेमके काय म्हणाले?**

देशाच्या अर्थव्यवस्थेत खाण क्षेत्र पुढील २० वर्षांत सुमारे अर्धा लाख कोटी डालरचे योगदान देउ शकते. या क्षेत्रातून ३ कोटींहून अधिक रोजगार निर्माण होण्याची क्षमता असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

**विदर्भातील कोणत्या जिल्ह्यांना लाभ होणार?**

गडचिरोलीतील मोठ्या लोहखनिज साठ्यांमुळे तेथे पोलाद उद्योग वेगाने विकसित होत आहेत. त्यासोबत चंद्रपूर, भंडारा, नागपूर, गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यांतही नवी औद्योगिक व्यवस्था उभी राहू शकते. वाहतूक सुविधा, स्वच्छ तंत्रज्ञान आणि हरित पोलाद प्रकल्पांमुळे रोजगाराच्या संधी वाढण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रीय कोळसा वायुनिर्मिती अभियानातील पहिल्या ८ प्रकल्पांपैकी ४ प्रकल्प विदर्भाला मिळाले आहेत. माजरी येथे प्रस्तावित कोळसा वायुनिर्मिती केंद्रामुळे या भागात पूरक उद्योगांनाही चालना मिळणार आहे.

**वेकोलिची पुढील दिशा काय?**

वेकोलिने १२ खाणींमध्ये १८ महत्त्वाची आणि दुर्मीळ खनिजे शोधली आहेत. आता केवळ कोळसा उत्पादनापुरते मर्यादित न राहता या खनिजांचे उत्खनन, शुद्धीकरण आणि मूल्यवर्धन करण्यावर भर दिला जाणार असल्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डा. हेमंत शरद पांडे यांनी सांगितले.

**परिषदेत कशावर चर्चा होणार?**

नागपुरात सुरू झालेल्या खाण अभियंत्यांच्या ३६ व्या राष्ट्रीय परिषदेत देशभरातील सुमारे ३०० प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. परिषदेत ४० संशोधन प्रबंध मांडले जातील. कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव तंत्रज्ञान, ड्रोन, खाण सुरक्षा, खाण बंद करण्याचे नियोजन, उपग्रह निरीक्षण, उर्जाबचत आणि दुर्मीळ खनिजांवर चर्चा होणार आहे.

**परिषदेचा समारोप -**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत १२ सप्टेंबरला सायंकाळी ५ वाजता परिषदेचा समारोप होणार आहे.

## जमिनीच्या वादातून घराला मालवाहू वाहनाने 4 वेळा धडक, घटनेत वृद्धेचा चिरडून मृत्यू

**अकोला/प्रतिनिधी :** जमिनीच्या वादातून मालवाहू वाहनाने घराला चार ते पाच वेळा धडक मारल्याची धक्कादायक घटना बार्शीटाकळी पोलीस ठाण्यांतर्गत जांभवासू गावात शुक्रवारी घडली. या थरारक घटनेमध्ये चिरडल्याने एका ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला असून दोन ते तीन जण जखमी झाले आहेत. या घटनेची एक चित्रफित समाज माध्यमातून प्रसारित झाली. या घटनेमुळे खळबळ उडाली. जिल्ह्याच्या बार्शीटाकळी तालुक्यातील जांभवासू गावात जमिनीच्या वादाला हिंसक वळण प्राप्त झाले. मालवाहू वाहन भरधाव वेगात चालवून एका घराला चार ते पाच वेळा धडक देण्यात आली. या घटनेमध्ये ७५ वर्षीय सोनाबाई मखराम जाधव यांचा मृत्यू झाला. चालकही जखमी झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. प्राथमिक माहितीनुसार, गावात दोन गटांमध्ये जमिनीवरून वाद सुरू होता. या वादातून बार्शीटाकळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर हा वाद आणखी चिघळला शुक्रवारी सकाळी मालवाहू वाहनाद्वारे घराला वारंवार धडक देण्यात आली. वाहन घराभोवती मागे-पुढे चालवतांना दिसत आहे.



**वाहन थांबवण्याचा प्रयत्न; दगडफेक-**चालकाने संतप्त होउन भरधाव वेगात वाहन चालवत असतांना घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहनचालक ऐकण्याचा मनस्थितीत नव्हता. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली हे पाहून काही लोकांनी वाहनावर दगडफेकही केली. त्यानंतरही वाहन थांबवले नाही. घराला धडक देणे सुरू च असल्याचे चित्रफितीमध्ये दिसून येते.

**गावात तणाव, पोलिसांकडून तपास सुरू** -या घटनेमध्ये एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला, तर दोन ते तीन जण जखमी सुद्धा झाले. त्यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. तीन संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या सर्व प्रकरणात बार्शीटाकळी पोलीस कसून तपास करीत आहेत. तपासामध्ये नेमके कारण समोर येण्याची शक्यता आहे.

## पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये आयोजित करणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घोषणा

**लंडन/वृत्तसंस्था :** जगभरात विखुरलेल्या मराठी बांधवांना, उद्योजकांना आणि मराठी संस्कृतीला एका वैश्विक व्यासपीठावर आणण्यासाठी पुढील 'विश्व मराठी साहित्य संमेलन' लंडनमध्ये आयोजित करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. लंडन येथील ऐतिहासिक अशा महाराष्ट्र मंडळाने त्यांचा 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार देउन सन्मान केला. यावेळी महाराष्ट्र भवनातील वातावरण मराठीमय होउन गेले होते. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल उपमुख्यमंत्र्यांचा हा गौरव करण्यात आला. सातासमुद्रापलीकडे मराठी माणसाने झेंडा फडकवला आहे, त्यामुळे महाराष्ट्र मंडळाच्या पाठीशी सरकार आणि एकनाथ शिंदे म्हणून मी खंबीरपणे उभा आहे असा विश्वास त्यांनी दिला. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र भवनात मोठी गर्दी झाली होती. तरुणांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि मराठी परंपरेनुसार उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी जय महाराष्ट्र, जय भवानी-जय शिवाजीच्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता. उपमुख्यमंत्र्यांनीही या जोशपूर्ण स्वागताचे भाषणात कौतुक केले. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लंडनस्थित सर्व मराठी जनाला गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आपली संस्कृती, आपला ठसा हा उमटवावाच लागेल असेही ते म्हणाले.



महाराष्ट्र मंडळाच्या सोहळ्यात 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र' पुरस्काराने उपमुख्यमंत्री सन्मानित

यावेळी निवृत्त सनदी अधिकारी भूषण गगराणी, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, महाराष्ट्र मंडळाचे ज्येष्ठ सदस्य डॉ गोविंद कानेगावकर, मंडळाचे अध्यक्ष वृषाल खांडके, मराठी भाषा संचालक श्यामकांत देवरे, मराठी चित्रपट निर्माते अभिनेते मंगेश देसाई त्याचप्रमाणे इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

मराठी भाषकांसाठी मध्यवर्ती संस्था

यावेळी भावपूर्ण सत्काराला उत्तर देतांना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला, तरी तो आपली माती, भाषा आणि संस्कृती कधीही विसरत नाही. नुकताच मराठी भाषेला केंद्र सरकारकडून 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेचा हा डंका जगभरात गाजवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर मराठी माणसांना मजबुतपणे जोडण्यासाठी लंडनमध्ये विश्व मराठी साहित्य संमेलन भरवले जाईल तसेच जगभरातील मराठी भाषकांसाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याबाबतही विचार करीत असल्याचे ते म्हणाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि महाराष्ट्र गीताला राज्यगीताचा (पान २ वर)

## 3 महिन्यांत 3 मोठी चक्रीवादळे येणार

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** अल निनोचा मोठा प्रभाव देशात पडणा-या पावसावर पडत आहे. देशभरातील अनेक राज्यांमध्ये पावसाची तूट वाढत चालली आहे. शेतकरी चिंतेत आहे. अशातच आता भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोने ३ महिन्यात ३ चक्रीवादळे येण्याबाबत इशारा दिला आहे. गेल्या ४४ वर्षांत आलेल्या चक्रीवादळांपेक्षा याचा तडाखा मोठा असू शकतो, अशी शक्यताही वर्तवण्यात आली आहे. इस्रोच्या अंदाजानुसार, २०२६ च्या मान्सूनोत्तर हंगामात उत्तर हिंद महासागरात तीन चक्रीवादळे तयार होउ शकतात. पीडीआय (उच्च वेग तीव्रता निर्देशांक) वादळाच्या वा-याचा वेग आणि त्याचा कालावधी यांसारख्या घटकांचा विचार करून चक्रीवादळाची तीव्रता मोजली जाते. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, पीडीआय (पान २ वर)



## एमपीएससी सचिवांना काळे फासले

**मुंबई/प्रतिनिधी :** एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला संभाजी ब्रिगेडने काळं फासल्याची घटना समोर आली आहे. एमपीएससीच्या पेपरफुटीवरुन संभाजी ब्रिगेडने आक्रमक पवित्रा घेतला आहे. नवी मुंबईत ही घटना घडली. सदर घटनेनंतर एमपीएससीचा अभ्यास करणा-या २५ लाख विद्यार्थ्यांच्या व महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने या भ्रष्ट व्यवस्थेच्या आणि नालायक सरकारच्या तोंडाला काळे फासले आहे. महेंद्र हरपाळकरच्या जी थोबाडीत मारली आहे ती या सरकारला जनतेच्यावतीने संभाजी ब्रिगेडने मारलेली थप्पड आहे, अशी प्रतिक्रिया संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्राचे प्रवक्ते संतोष शिंदे यांनी दिली. एमपीएससी औषधं निरीक्षक पेपर फुटी संदर्भात संभाजी ब्रिगेडने ३ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालया सामोरे आंदोलन केले होते. त्याचवेळी सरकारला आम्ही इशारा दिला होता. मात्र सरकार गेंड्याच्या कातडीचे आहे, त्यांना ज्या भाषेत समजत त्या भाषेत सांगितले पाहिजे.



एमपीएससीचे अध्यक्ष व सचिव यांनी तत्काळ राजीनामा दिला नाही तर पुढचा नंबर हा एमपीएससी अध्यक्षांचा असेल यात तिळमात्र शंका नाही, असा इशारा देखील संतोष शिंदे यांनी दिला आहे. एमपीएससीच्या माध्यमातून अध्यक्ष आणि (पान २ वर)

## शिंदे घराण्यात 41 हजार कोटींच्या संपत्तीवरून वाद;

### कुटुंबातील आणखी एका मुलीने कोर्टात ठोकला दावा

**ग्वाल्हेर/वृत्तसंस्था :** शिंदे राजघराण्यात जवळपास ४१ हजार कोटी संपत्तीच्या मालकीवरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत नवा ट्विस्ट आला आहे. ग्वाल्हेर जिल्हा कोर्टाने केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची आत्या दिवंगत पद्माराजे यांची मुलगी प्रतिमा देवी यांचा अर्ज स्वीकारला आहे. म्हणजेच प्रतिमा देवी यांना बहुचर्चित संपत्ती वादात त्यांचा अधिकार कोर्टासमोर ठेवता येणार आहे. प्रतिमा देवी यांच्या येण्याने केवळ पक्षकारांची संख्या वाढणार नाही तर संपत्तीच्या वाटपाचे गणितही बदलणार आहे.

हे प्रकरण शिंदे राजघराण्याच्या वडिलोपार्जित आणि इतर मालमत्तेच्या वाटपाशी संबंधित आहे. अनेक वर्षे चाललेल्या या कायदेशीर लढाईत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि त्यांच्या आत्या उषा राजे, वसुंधरा राजे आणि यशोदरा राजे यांच्यातील मालमत्ता हक्कांवरून वाद आहे. आतापर्यंत दिवंगत पद्माराजे यांच्या कुटुंबातील कोणताही सदस्य या प्रकरणात थेट सामील नव्हता. मात्र कोर्टाने प्रतिमा देवी यांचा अर्ज स्वीकारल्यानंतर हे चित्र बदलले आहे.



**प्रतिमा देवी यांचा दावा काय?**

ग्वाल्हेर जिल्हा कोर्टाने प्रतिमा देवी यांचा अर्ज सुनावणीसाठी पात्र म्हणून स्वीकारला आहे. त्यामुळे मालमत्तेवरील त्यांचे दावे आणि आक्षेप मुख्य (पान २ वर)

## स्वस्त धान्यासाठी ई-केवायसीची सक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** पुरवठा विभागाने शिधापत्रिकेसाठी ई-केवायसी आता सक्तीची केली आहे. शिधापत्रिकेत नाव असलेल्या प्रत्येक सदस्यांना ई-केवायसी करावी लागेल. त्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली. या मुदतीत शिधापत्रिकेची ई-केवायसी न केल्यास स्वस्त धान्य बंद केले जाणार असल्याचे पुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सर्व पात्र शिधाधारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत बंधनकारक केले आहे. आगामी ३० सप्टेंबरपर्यंत शिधापत्रिकामधील सर्व सदस्यांनी ई-केवायसी पूर्ण न केल्यास, संबंधित लाभार्थ्यांना धान्य मिळणे कायमचे बंद होणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पारदर्शक धोरणानुसार, स्वस्त धान्याचा लाभ केवळ प्रत्यक्ष गरजू व पात्र नागरिकांपर्यंतच पोहोचावा, तसेच वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी ई-केवायसी सक्तीचे करण्यात आले आहे असे जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी सांगितले.

**ई-पास यंत्रावर ई-केवायसी**

ई-केवायसी करण्यासाठी नागरिकांनी आपल्या गावातील किंवा परिसरातील जवळच्या अधिकृत स्वस्त धान्य दुकानाला प्रत्यक्ष भेट द्यावी (पान २ वर)



जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

# ३४१० गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई ;गणेशोत्सवासाठी पोलीस अलर्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोमवार १४ सप्टेंबर पासून गणेशोत्सवाची सुरुवात होणार आहे. यासाठी भक्तांमध्ये उत्साह आहे. यंदा गणेश उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे.उत्सव शांततेत, उत्साहात आणि सुरक्षित वातावरणात पार पडण्यासाठी ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने चोख व कडक पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला असून पोलीस दल सदैव कार्यतत्पर व सक्षम आहे. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ३४१० गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिली आहे. त्यांनी सांगितले आहे की, ग्रामीण भागातील एकूण १५०९ गणपतींची स्थापना होणार आहे. या बंदोबस्तासाठी ग्रामीण पोलिस दलाच्या वतीने एकूण दोन हजार हून अधिक अधिकारी, अंमलदार व गृहरक्षक दलाची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.गणेश स्थापना व विसर्जन मार्गावर ठिक ठिकाणी वाहतूक अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली असून वाहतूक व्यवस्था सुरळीत होऊन जनतेला त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून ठिकठिकाणी बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. समाजात शांतता प्रस्थापित व्हावी, कुठलाही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता ग्रामीण घटकातर्फे गणेशोत्सव संदर्भाने बीएनएसएस, मदाका कायद्यान्वये एकूण ३४१० लोकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.कलम १६३ बीएनएसएस अन्वये समाजात शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहचविणाऱ्या एकूण ९४८ वर प्रतिबंधात्मक आदेश काढण्यात येणार आहे. ७ बदशांना तडीपार करण्यात आले आहे.एक टोळी हद्दपार करण्यात आली आहे.२ आरोपींनावर एमपीडीए कारवाही करण्यात आली आहे.

**संवेदनशील ठिकाणी ड्रोनद्वारे नजर -** गणेश बंदोबस्त अनुषंगाने अमरावती ग्रामीण घटकातील संवेदनशील, अतिसंवेदनशील भागामध्ये आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष बंदोबस्त नेमण्यात येऊन प्रत्येक मंडळाला सीसीटीव्ही अद्यावत ठेवण्याबाबत आदेशित केले आहे. सदर उत्सव दरम्यान ड्रोनद्वारे नजर ठेवली जाणार आहे. घटकातील अतिसंवेदनशील, संवेदनशील गावांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. शांतता कमिटी, जातीय सलोखा, पोलीस मित्र समिती, गणेश मंडळ अशा एकूण २२५ बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

**ध्वनी प्रदूषण नियमाचे पालन करा-** सर्व मंडळांना ध्वनी प्रदूषण अनुषंगाने नियम काटेकोरपणे पाळण्याबाबत सूचित केले आहे. विहित मर्यादेपेक्षा जास्त आवाजात डीजे किंवा लाऊडस्पीकर किंवा इतर साऊंड सिस्टीमचा वापर केला गेला तर कायदेशीर कारवाई करून साहित्य जप्त केले जाईल अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**अफवांवर लक्ष देऊ नका-** पोलीस अधीक्षक निकेतन कदम म्हणाले, उत्सवादरम्यान सोशल मीडियावर पसरविण्यात येणाऱ्या कोणत्याही अफेवर लक्ष देऊ नका. आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यांवर कठोर कार्यवाही केली जाणार आहे. कोणतीही अडचण आल्यास डायल ११२ वर कॉल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ व १० वरून

## राज्याभरातील बँकिंग कामकाज

मागणीवर कर्मचारी आक्रमक झाले असून, जर मागण्या मान्य न झाल्यास आगामी २७, २८ आणि २९ तारखेला देखील देशव्यापी संप पुकारला जाईल असा इशारा यावेळी कर्मचा-यांनी दिला आहे.

**सलग चार दिवस बँका बंद-** सलग चार दिवस बँका बंद राहणार असल्यामुळे सामान्य नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी एटीएममध्ये पैशांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे नागरिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच बँका बंद असल्याने ग्राहकांचे चेक वटत नसून इतर महत्त्वाची आर्थिक कामेही रखडली आहेत, ज्यामुळे सामान्य नागरिक या आंदोलनात अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत.

## पुढील विश्व मराठी साहित्य

दर्जा देण्याच्या निर्णयांचा उल्लेख करत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी, या सुरेश भट यांच्या ओळींचा उल्लेख करत त्यांनी मराठी अस्मिता जपण्याचे आवाहन केले. महाराष्ट्र मंडळाने पुढेही लंडनमध्ये मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्याचे काम सुरू ठेवावे. तुमच्या पाठीशी सरकार आहे आणि एकनाथ शिंदेही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**गतिरोधक काढून टाकले-** मुंबई-एमएमआरमध्ये विकासाला गती दिल्यास मोठी आर्थिक क्षमता निर्माण होउ शकते. महाराष्ट्राने एक ट्रिलियन ड?लर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य ठेवले असून राज्याला देशाच्या विकासात मोठी भूमिका बजावायची आहे. सरकार विकासाच्या ब्रेकवर नाही, तर अक्सिलेटरवर आहे, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असावा, हीच राज्य सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मी मुख्यमंत्री झाल्यावर गणपती उत्सव, दहीहंडी वगैरे परत उत्साहाने साजरे करायला सुरु वात केली. आपले सण, उत्सव, परंपरा, तुम्ही लंडनमध्ये येउन सुद्धा सोडत नाहीत, मग महाराष्ट्रात बंद कसं करू न चालेल असे ते म्हणाले

**पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल**

अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे मिसिंग लिंक टनेल आणि ७६ हजार कोटी रु पयांच्या वाढवण बंदराचा उल्लेख करत, महाराष्ट्र हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' व 'पावर हाउस' बनले असून राज्य १.५ ट्रिलियन डालर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

समृद्धी महामार्गाचा अनुभव सांगताना त्यांनी विकास प्रकल्पांसाठी सरकार आणि जनतेमधील विश्वास किती महत्त्वाचा आहे, यावर भर दिला. समृद्धी महामार्गासाठी जमीन देणा-या शेतक-यांना मोबदला देताना आपल्या उपस्थितीत करार करण्यात आले आणि त्यानंतर काही तासांतच आरटीजीएसद्वारे त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले, असा अनुभव त्यांनी सांगितला. या विश्वाासामुळे जमीन संपादनाची प्रक्रिया विक्रमी वेळेत पूर्ण होण्यास मदत झाली, असे ते म्हणाले.

**लंडनशी महाराष्ट्राचे संबंध जुने-** भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक आणि स्वातंर्त्यवीर सावरकर यांचा लंडनशी सबंध येउन गेला आहे असे सांगून उपमुख्यमंर्त्यांनी बाबासाहेबांच्या लंडनमधील वास्तव्याच्या ठिकाणाचे स्मारक महाराष्ट्र सरकारने विकसित केल्याचे सांगितले. लंडनमध्ये ज्या वास्तूत बाबासाहेबांचे वास्तव्य होते, तेथे नतमस्तक होण्याचे भाग्य मला लाभले. बाबासाहेबांनी लिहिलेल्या अद्वितीय संविधानामुळेच आज माझ्यासारखा सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता राज्याच्या सर्वोच्च पदावर सेवा करू शकत आहे, अशा भावना त्यांनी या वेळी व्यक्त केल्या. महाराष्ट्राचा विकास, महाराष्ट्राची प्रगती हाच आमचा अजेंडा आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

## 3 महिन्यांत 3 मोठी

जितका जास्त, तितकी वादळाची तीव्रता जास्त असते. यासाठी जवळपास ४० वर्षांच्या हवामान आणि सागरी माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. अधिक चक्रीवादळे निर्माण होण्यास कारणीभूत ठरू शकणा-या परिस्थिती आणि त्यांची तीव्रता समजून घेण्यासाठी या माहितीचा वापर करण्यात आला. दरम्यान, भारतासह उत्तर हिंद महासागराच्या आसपासच्या अनेक देशांचे किनारपट्टीचे प्रदेश चक्रीवादळांसाठी संवेदनशील आहेत. २०२६ साठीचा ढउक अंदाज गेल्या ४४ वर्षांच्या सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान उत्तर हिंद महासागरातील चक्रीवादळांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे ठरेल.

चक्रीवादळांच्या हालचालींचा अंदाज

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ दरम्यान उत्तर हिंद महासागरात तीन उष्णकटिबंधीय चक्रीवादळे तयार होउ शकतात. इस्रोच्या मते, या वादळांची एकूण शक्ती मागील ४४ वादळांच्या शक्तीपेक्षा सुमारे ८३ टक्के जास्त आहे. याचा अर्थ असा की, या मान्सूनोत्तर हंगामात चक्रीवादळांची क्रियाशीलता अधिक असू शकते. चक्रीवादळाची निर्मिती आणि तीव्रता प्रभावित करणा-या घटकांचाही विचार करण्यात आला आहे. जानेवारी ते ऑगस्टपर्यंतच्या माहितीच्या आधारे, ऑक्टोबर ते डिसेंबर या मान्सूनोत्तर हंगामातील चक्रीवादळांच्या हालचालींचा अंदाज लावण्यात आला.

## एमपीएससी सचिवांना काळे

सचिव आणि त्यांची जी भ्रष्टाचाराने बरबटलेली टीम आहे, त्यांनी तरु णांच्या आयुष्याची राख रांगोळी करण्याचे ठरवले आहे. तरु ण आत्महत्या करत आहेत, त्याची प्रतिक्रिया आहे. प्रश्नपत्रिका फोडली जात आहे, सरकार आंधळे आणि बहिरं आहे, त्याची ही प्रतिक्रिया आहे. महाराष्ट्रात तरु णांकडे दुर्लक्ष केले जात आहे. संभाजी ब्रिगेडने आज केलेली कारवाई झाकी है, अध्यक्ष अभी बाकी है, मुलं मरत आहेत, असे संतोष शिंदे यांनी म्हटले. आज प्रश्नपत्रिका फुटत असतील, परीक्षा रद्द होत असतील तर किती वर्ष वाट बघायची असं संतोष शिंदे यांनी म्हटले.

**सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?** सदर घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील प्रतिक्रिया दिली. शाईफेक करणे दुर्दैवी आहे. आमचे कार्यकर्ते विकास लवांडे यांनाही असेच शाईफेक केली होती, त्याचाही आम्ही निषेध केला होता. लोकशाहीमध्ये आंदोलन करु या, चर्चा करु या आणि त्यातून मार्ग काढला जाउ शकतो, पण शाईफेक करणे योग्य नाही. एमपीएससीबाबत रोहित पवार आंदोलन करत आहेत. आम्ही पक्षाचं राजकारण करतोय असं नाही तर विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका आहे. काळं फासणे वगैरे हे मला स्वतःला सुसंस्कृत वाटत नाही. लोकशाहीत भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या चौकटीत राहून मार्ग काढूया. एमपीएससीबाबात मुख्यमंर्त्यांनी काल विद्यार्थ्यांशी चर्चा केली, त्यातून ज्या गोष्टी आहेत, त्यावर काही आक्षेप असेल तर चर्चा करावी, त्यातून मार्ग काढला जाउ शकतो, असे सुप्रिया सुळेंनी सांगितले.

**कोण आहेत महेंद्र हरपाळकर?** महेंद्र हरपाळकर हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव डिसेंबर २०२५ पासून या पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी छत्रपती संभाजीनगरमधील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर काम केलेले आहे. अन्न व औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटीसंदर्भातील तक्रार आल्यानंतर महेंद्र हरपाळकर यांनी एका तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्याची माहिती दिली होती. हरपाळकर १९९५ पासून प्रशासनात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**राज्यातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक, गट-ब भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे राज्यातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणात प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी काही व्यक्तींपर्यंत पोहोचल्याचा आरोप असून, त्यानंतर चौकशी, अटक, भरती प्रक्रिया रद्द करणे आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन असा घटनाक्रम पुढे आला. या प्रकरणाच्या तपासात एक वैयक्तिक संबंधातून मिळालेल्या माहितीमुळे पेपरफुटीचा संशय समोर आल्याची चर्चा झाली. तपासानुसार, प्रश्नपत्रिका कथितरीत्या एमपीएससी कार्यालयाशी संबंधित व्यक्तींपासून पुढे कोचिंग क्लासच्या माध्यमातून उमेदवारांपर्यंत पोहोचल्याचा आरोप आहे. या संपूर्ण साखळीची चौकशी करण्यात आली. एमपीएससी मार्फत औषध निरीक्षक पदासाठी भरती प्रक्रिया सुरू होती. या भरतीची परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी घेण्यात आली. तपासात समोर आलेल्या आरोपांनुसार, परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न बाहेर पडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, लीक झालेल्या प्रश्नांपैकी ७७ प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्नांशी जुळल्याचा दावा करण्यात आला आहे.

## शिंदे घराण्यात 41 हजार कोटींच्या

सुनावणीचा भाग बनणार आहे. गुरु वारी त्यांचे जावई प्रतीक कार्को ग्वाल्हेरमध्ये दाखल झाले आणि त्यांनी कोर्टात त्यांची बाजू मांडली. आगामी सुनावणीत प्रतिमा देवी त्यांच्या दाव्याशी संबंधित कागदपत्रे आणि कायदेशीर आधार सादर करतील अशी अपेक्षा आहे. या निर्णयानंतर प्रतिमा देवी यांना कोर्टासमोर त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. प्रतिमा देवी मालमत्तेतील आपला वाटा कोणत्या आधारावर मागत आहेत आणि त्यांच्याकडे कोणती कागदपत्रे किंवा पुरावे आहेत हे उघड होईल. माझी आई पद्माराजे शिंदे घराण्याची कन्या होत्या. त्यामुळे माझ्या आईच्या वाट्याच्या आधारावर आम्हाला कुटुंबाच्या मालमत्तेत समान हक्क दिले पाहिजेत असा प्रतिमा देवी यांचा युक्तिवाद आहे.

दरम्यान, प्रतिमा देवी यांच्या दाव्यावर इतर पक्षकारांनी विरोध केला. आधी झालेल्या तडजोडीत प्रतिमा देवी यांची सहमती झाली होती आणि संबंधित कागदपत्रांवर त्यांनी स्वाक्षरीही केली आहे. त्यामुळे येणा?या सुनावणीत दोन्ही पक्ष कोणते तर्क लढवतात आणि कागदपत्रे सादर करतात हे पाहणे गरजेचे आहे. प्रतिमा देवी यांचा अर्ज स्वीकारला असला तरी त्यांचा संपत्तीत किती वाटा हे अद्याप निश्चित नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ ऑक्टोबरला होणार आहे. शिंदे राजघराण्यातील हा संपत्ती वाद देशातील सर्वात चर्चेत असणा?या मालमत्ता वादांपैकी एक आहे. आता प्रतिमा देवी यांच्या एन्ट्रीने या खटल्याला नवे वळण लागणार आहे.

## स्वस्त धान्यासाठी ई-केवायसीची

लागेल. ई-पास मशीनवर आपल्या बोटांचे ठसे अद्ययावत करू न ही प्रक्रिया विनामूल्य पूर्ण केली जाणार आहे. शिधापत्रिकामधील प्रत्येक सदस्याची वैयक्तिक ई-केवायसी होणे अनिवार्य केले. ई-केवायसी न करणा-या लाभार्थ्यांना धान्याची गरज नाही, असे गृहीत धरू न त्यांचे धान्य थांबवले जाईल. मुदतीपूर्वी ई-केवायसी पूर्ण करू न स्वस्त धान्य मिळण्याचा मार्ग सुरक्षित करणे गरजेचे असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

**दर शुक्रवारी साखर साठा तपासणी**

जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत १ ऑगस्टपासून साखरेची साठा मर्यादा लागू झाली. आता साखरसाठ्याची मर्यादा चार हजारहून दोन हजार क्विंटलवर कमी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांना दोन हजार क्विंटलपर्यंतच साठवणूक करता येईल. जिल्हा पुरवठा विभागाचे जिल्ह्यात नउ तपासणी पथके गठित करण्यात आली आहेत. त्याद्वारे वेळोवेळी भेटी, पडताळणी, तपासणी केली जात आहे. सर्व साखर व्यावसायिकांनी अन्नसाठा देखरेख पोर्टलवर तत्काळ नोंदणी करणे गरजेचे आहे. प्रत्येक शुक्रवारी साखर साठा अद्ययावत करू न पोर्टलवर चुकीची, अपूर्ण, विलंबित माहिती देणे गंभीर मानून कारवाई केली जाईल, असा इशाराही पुरवठा विभागाने दिला.

## रस्ते, पुल, इमारतींचे कामे

रस्त्यांची कामे झाल्यानंतर वृक्षारोपण करण्यात यावे. रस्त्यांच्या थोडी दूरवर झाडे लावल्यास भविष्यात रस्त्यांमध्ये अडथळा येणार नाही. तसेच कडूनिंब, वड आणि पिंपळाची झाडे लावल्यास ती दिर्घकाळपर्यंत टिकण्यास मदत होईल. ही झाडे जगविण्यावर भर देण्यात यावा. नागरिकांच्या सुविधांसाठी सुविधा केंद्र उभारण्यात येत आहे. ही केंद्रे सुस्थितीत राहणे आणि नागरिकांच्या वापरात राहण्यासाठी खासगी संस्थांना देण्यात यावी. आवश्यकता पडल्यास महिला बचतगटांना दिल्यास त्याची निगा राखली जाईल.

बैठकीत अमृतकाल रस्ते, विकास आराखडा, धोकादायक पुल, आदिवासी क्षेत्रातील इमारती आदीबाबत सादरीकरण मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे यांनी केले.

## सारथी इमारत बांधकामाची

३०० आसन क्षमता वाढवून ५०० करण्याची मागणी केली. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल तसेच यासंदर्भात रितसर प्रस्ताव विभागाकडे पाठवण्यात यावा असे, मंत्री भोसले यांनी सांगितले. येथील संपूर्ण कामाची सद्य:स्थिती जाणून घेत त्यांनी आवश्यक सूचना केल्या तसेच नियोजित कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पुढील वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत येथील कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तत्पूर्वी, मंत्री भोसले यांच्या हस्ते सारथी इमारत परिसरात आपट्याच्या वृक्षाचे रोपण करण्यात आले.

## बच्चू कडूंच्या वर्षानुवर्षांच्या

शेतमजूर आणि महिला शेतकरी, तसेच त्यांच्या पात्र कुटुंबीयांचा समावेश करण्यात आला आहे. अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये, दोन डोळे/हात/पाय निकामी झाल्यास २ लाख रुपये, तर एक डोळा/हात/पाय निकामी झाल्यास १ लाख रुपये सानुग्रह अनुदानाची तरतूद आहे. रस्ता-रेल्वे अपघात, सर्पदंश-विंचूदंश, वीज पडणे, विद्युत धक्का, विषबाधा, उंचावरून पडणे तसेच जनावरांच्या हल्ल्यात जखमी होणे किंवा मृत्यू यांसारख्या घटनांचाही ग्राह्य अपघातांमध्ये समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटींचा खर्च अपेक्षित असून लाभाची रक्कम पात्र लाभार्थी किंवा कायदेशीर वारसदारांच्या बँक खात्यात थेट DBT पद्धतीने जमा केली जाणार आहे.

'शेतात राबणाऱ्या माणसाच्या हातात जमीन आहे की नाही, यावर त्याच्या जीवाची किंमत ठरता कामा नये. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग आणि एकल महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आमचा संघर्ष सुरूच राहील. आजचा निर्णय हा आमच्या आंदोलन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा विजय आहे; पुढे प्रत्येक कष्टकरी कुटुंबाला संकटात आर्थिक आधार देणारी व्यापक सामाजिक सुरक्षा व्यवस्था उभी करणे, हेच आमचे ध्येय आहे.'

**– आ. बच्चू कडू**

**पाठपुराव्याला धोरणात्मक यश-**

शेतीत प्रत्यक्ष राबणाऱ्या कष्टकरी वर्गाला अपघाताच्या संकटात आर्थिक संरक्षण मिळावे, ही बच्चू कडूंच्या आंदोलनाची सातत्यपूर्ण भूमिका राहिली आहे. आज शासन निर्णयातून भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांचा समावेश झाल्याने या मागणीला महत्त्वपूर्ण धोरणात्मक यश मिळाले आहे. 'शेतात राबणाऱ्या हाताला जमीन नसली तरी त्याचा हक्क कमी होत नाही,' या भूमिकेला शासनाच्या निर्णयाने बळ मिळाले असून, बच्चू कडूंच्या वर्षानुवर्षांच्या संघर्षाची ही ठोस फलश्रुती मानली जात आहे.

## जिल्हा परिषदेत कोल्ह्याचा

ताब्यात घेण्यात पथकाला यश आले. कोल्हा ताब्यात घेतल्यानंतर त्याची प्राथमिक पाहणी करण्यात आली.त्या नंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी कोल्ह्याला जवळील पोहरा जंगल परिसरात नेले. तेथे त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. कोल्ह्याला कोणतीही इजा न होता रेस्क्यू करण्यात आल्याने जिल्हा परिषद कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.शहरी भागात अन्न व पाण्याच्या शोधात वन्यप्राणी येण्याच्या घटना अधून मधून घडत असतात. त्यामुळे अशा परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता वन विभागाला तातडीने माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बनावट AI वाघाच्या

कोणतीही माहिती अथवा छायाचित्र सोशल मीडियावर प्रसारित करण्यापूर्वी त्याची अधिकृत खातरजमा करणे गरजेचे आहे. बनावट फोटो व अफवांमुळे नागरिकांची दिशाभूल होण्याबरोबरच वनविभागाच्या यंत्रणेवरही अनावश्यक ताण निर्माण होतो.

वन्यप्राण्यांबाबत कोणतीही खातरजमा न करता सोशल मीडियावर चुकीची माहिती, बनावट AI फोटो किंवा अफवा पसरवून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता माहितीची अधिकृतपणे खातरजमा करावी.

**-सोमेश्वर घोरमाडे, वनपाल, तिवसा वर्तुळ**

## ऑक्टोबरमध्ये शहरातील मध्यवर्ती

सखोल अभ्यास करून ही कामे हाती घेण्यात येत आहेत.

येत्या ऑक्टोबर महिन्यात या कामाला सुरुवात होणार आहे. रेल्वे पुल बंद असल्याने स्थानिक नागरिकांची होत असलेली गैरसोय पाहता लवकरात लवकर ही कामे पूर्ण करण्यात येतील, असेही मंत्री भोसले यांनी सांगितले.

## एकाच रात्री ३ ज्वेलर्स

-चांदीचे दागिने चोरून नेले. तीसरी घटना गोपाल नगर परिसरातील विनायक ज्वेलर्स येथून ही चोरट्यांनी दुकानात शिरून तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला, मात्र काही कारणास्तव त्यांना यश आले नाही आणि त्यांना रिकाम्या हाताने पळ काढावा लागला. एकाच रात्री तीन सराफ दुकाने फोडल्याची माहिती मिळताच पोलीस दलात एकच खळबळ उडाली. डीसीपी, एसीपी यांच्यासह श्वान पथक, फॉरेन्सिक टीम आणि गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने तिन्ही घटनास्थळांची पाहणी केली.प्राथमिक तपासात ही एखाद्या आंतरराज्यीय किंवा व्यावसायिक टोळीची कामगिरी असावी, असा पोलिसांचा अंदाज आहे. या टोळीने आधी रेकी करून वेगवेगळ्या टीम बनवून एकाच वेळी हल्ला चढवला असावा.पोलिसांनी तिन्ही प्रकरणांमध्ये अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले असून दुकानातील आणि मुख्य मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्यांचा शोध वेगाने सुरू केला आहे.

## शाळेसाठी निघालेल्या तीन

जमीन सरकली. याप्रकरणी मोझरी येथील २१ वर्षीय प्रीतम नावाच्या तरुणाने आपल्या नातीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय मुलीच्या आजोबांनी व्यक्त केला असून, तिवसा पोलिसांनी तत्काळ अपहरणाचा गुन्हा नोंदवला आहे. दोन्ही प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## ५ दिवसाच्या आठवड्यासाठी

'PLI भेदभाव बंद करा आणि 'प्रलंबित मागण्या तात्काळ पूर्ण करा' अशा घोषणा देण्यात आल्या. निदर्शनात विविध राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांमधील अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. कर्मचाऱ्यांनी सांगितले की बँकिंग व्यवस्था सुरळीत चालवण्यात अधिकाऱ्यांसोबतच कर्मचाऱ्यांचीही महत्त्वाची भूमिका आहे. असे असूनही बऱ्याच काळापासून उपस्थित केल्या जात असलेल्या मागण्यांवर अपेक्षित निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. आंदोलकांनी विशेषतः ८ मार्च २०२४ रोजी झालेल्या सेटलमेंटचा आणि पी एल आय मधील भेदभावाचा मुद्दा उपस्थित केला. संघटने ने इशारा दिला आहे की मागण्या मान्य न झाल्यास २६ ऑक्टोबर पासून अनिश्चितकालीन संप पुकारला जाईल. बँकिंग कर्मचारी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

## परतवाड्यात जुगार अड्डयावर

अरविंद तुळशीराम अमोदे (वय ३५, रा. पलशा, ता. चिखलदरा, ह.मु. रश्मीनगर, परतवाडा), सागर भाऊरावजी बिडकर (वय ४६, रा. मिल कॉलनी, परतवाडा), उल्केश दिने ढोके (वय २७, रा. घोडगाव), दिनेश केशवराव बरडे (वय ४६), शेखर हंसराज शिवनकर (वय ५१, रा. लक्ष्मीनगर, देवमाळी), प्रज्वल सुरेशपंत काळे (वय २४, रा. घोडगाव), प्रमोद रामदास मंडले (वय ५२, रा. मिल कॉलनी, परतवाडा) ,मनीष नामदेव देवळेकर, दिलीप अंबादास जाधव, योगेश धनराज वानखडे, गौरव दिनेश जायले, मनीश राजू कावरे, धीरज रमेश गंगात्रे, निलेश मधुकर पातोंड, सत्यम धनराज चौधरी, नितेश जगदेव देवळेकर, रत्नदीप बाळू इंगळे आणि अमन सुधाकर वाढोकर या आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.या कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगाराच्या प्रकाराशी संबंधित रोख रक्कम आणि मोबाईल फोन जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात १९ हजार १२० रुपये रोख रक्कम व अंदाजे १ लाख २० हजार रुपये किमतीचे ११ मोबाईल फोन असून एकूण १ लाख ३९ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

जुगाराच्या अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी परतवाडा पोलिसांनी ही कारवाई केल्याने परिसरातील जुगार अड्डे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

याशिवाय शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, गुन्हे शाखा, शहर वाहतूक शाखा तसेच विविध शाखांचे प्रभारी अधिकारी आणि पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. या मोहिमेत ७७ पोलीस अंमलदार, क्यूआरटीचे १० आणि आरसीपीचे ३४ जवान, असे मनुष्यबळ सहभागी झाले. गणेशोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास किंवा अचानक तणाव निर्माण झाल्यास पोलीस यंत्रणेने तत्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणणे आवश्यक असते. त्यादृष्टीने घेण्यात आलेल्या या रंगीत तालीमेत पोलिसांच्या जलद प्रतिसादाची तसेच दंगा नियंत्रण यंत्रणेच्या सज्जतेची चाचणी घेण्यात आली.

## वैद्यकीय तपासणीपूर्वी

तरुणाला ताब्यात घेतले. त्याने मद्यप्राशन केले आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी त्याला वैद्यकीय तपासणीकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. रुग्णालयात तरुणासोबत पोलीस कर्मचारी आणि होमगार्डही उपस्थित होते. मात्र, वैद्यकीय तपासणी सुरू होण्यापूर्वीच त्याने पोलिसांची नजर चुकवली आणि अचानक रुग्णालयातून पळ काढला. काही क्षणांतच तो पसार झाल्याचे लक्षात येताच पोलिसांची एकच धावपळ उडाली. यानंतर पोलिसांनी तातडीने त्याचा पाठलाग सुरू केला. रुग्णालय परिसरात शोधमोहीम राबवत अखेर त्याला पुन्हा पकडण्यात आले. त्यानंतर त्याला पोलिस ठाण्यात आणून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.

## कसाबपुरात अवैध गोवंश

त्यानुसार पथक ग्रामीण भागात पेट्रोलिंग करीत असताना पूर्णानगर येथील कसाबपुरा परिसरात अवैध गोवंश कत्तल होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पूर्णानगरमधील कुरेशी मोहल्ल्यात छापा टाकला. कारवाईदरम्यान ८३० किलो गोमांस (किंमत ४ लाख १५ हजार रुपये), दोन गोवंश (२० हजार रुपये), ३१ किलो गोवंश कातडी (३१ हजार रुपये), कुंदा, तराजू, कुऱ्हाड, सत्तूर व सुरे असा साहित्यसाठा (९ हजार ८०० रुपये), रोख १ हजार ८०० रुपये आणि तीन मालवाहू वाहने (९ लाख रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मोहम्मद जावेद अ. प्यारे (२३), मोहम्मद एजाज शेख ईसा (४०), अब्दुल मोबीन अब्दुल करीम (४५), अब्दुल कदीर शेख युसुफ (४८), अन्सार अब्दुल लतीफ (५०), मकसूद अहमद बशीर अहमद (५०) आणि अब्दुल कलाम अब्दुल जब्बार (५२), सर्व रा. कसाबपुरा, पूर्णानगर, ता. भातकुली, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पोउपनि सतीश झाल्टे, सागर हटवार, शिवाजी घुगे, मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे, रुपेश गावंडे, विवेक घोरमाडे, संजय प्रधान, नईम शहा तसेच आसेगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी आणि आरसीपी पथकातील कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

## दारूच्या नशेत वाद

त्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी पोलिसांना कळविले. त्यानंतर कुऱ्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली. दरम्यान, बोरकर यांच्या मृत्यूमागे नेमके कारण काय, मारहाणीतच त्यांचा मृत्यू झाला का, तसेच घटनेतील इतर बाबी काय आहेत, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणात अरुण नामक व्यक्तीचे नाव समोर आले असून, त्याच्याविरुद्ध पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर घटनेचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कुऱ्हा पोलिस करीत आहेत.

## पावसाअभावी मूग करपला

पिके पूर्णपणे सुकू लागली आहेत.मुगाचे पिक फुलोऱ्यात आणि शेंगा धरण्याच्या स्थितीत असतानाच पाऊस नसल्याने विनोद लाजूरकर यांचे संपूर्ण पिक जळून खाक झाले. बियाणे, खते, कोळपणी आणि मजुरी असा एकरी हजारो रुपयांचा खर्च करून चार एकर क्षेत्र तयार केले होते. मात्र, हाती काहीच लागणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने, अखेर उद्विग्न झालेल्या लाजूरकर यांनी उभ्या पिकात ट्रॅक्टर घालून रोटर फिरविण्याचा अत्यंत वेदनादायी निर्णय घेतला. राज्य सरकार यांनी तात्काळ आदेश देऊन तात्काळ पंचनामे करून मदतीची मागणी केल्या जात आहे. शेतकरी सध्या पूर्णपणे हवालदिल झाला आहे. कर्जाचा डोंगर कसा फेडायचा, असा गंभीर प्रश्न बळीराजासमोर उभा आहे. शासनाने व कृषी विभागाने तात्काळ पिकांचे पंचनामे करून विनोद लाजूरकर यांच्यासह सर्व बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी आता स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

**बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अमरावती र.नं. ३१४**

खंडेलवाल मार्केट, राजेन्द्र कॉलनी, अमरावती
फोन नं. - ०७२१ - २६७८३७४ / ७७७००३६७९४
(२०२५ - २०२६)

**(फक्त भागधारकांकरिता)**

संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांना सुचित करण्यात येते की, संस्थेची सन २०२५ - २०२६ ची वार्षीक आमसभा दि. २७/०९/२०२६ रोजी रविवार सकाळी ठिक ११.०० वाजता अहिल्या मंगलम, विवेकानंद कॉलनी, रुख्मिनी नगर अमरावती. येथे घेण्यात येत आहे. त्या बाबत सभेचा अहवाल संस्थेजवळ उपलब्ध आहे. तरी संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांनी वेळेवर उपस्थीत राहावे हि विनंती.

**प्र.वा.बोके**
अध्यक्ष बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. रजि. नं.३१४. अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# चिखली सबस्टेशनवर शेतकऱ्यांचे मुक्काम आंदोलन

## मनमानी लोडशेडिंग, वारंवार वीज खंडित होण्याचा निषेध

### रात्री दोन वाजता अधिकाऱ्यांची धाव

■ प्रतिनिधी | रिसोड ■

पावसाने दडी मारल्याने सोयाबीनसह खरीप पिके वाळण्याच्या मार्गावर असताना शेतीसाठी होणारा अनियमित वीजपुरवठा शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. वारंवार वीज खंडित होणे, पाच-पाच मिनिटांनी वीज ये-जा करणे, मनमानी लोडशेडिंग तसेच जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलण्यास विलंब होत असल्याच्या निषेधार्थ घोटा, चिखली, व्याड व कवठा परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली चिखली सबस्टेशनवर मुक्काम आंदोलन केले.

दिवसभर आंदोलन करूनही रात्री उशिरापर्यंत ठोस तोडगा निघाला नाही. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी सबस्टेशन परिसरातच मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलनस्थळावरून हटणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली.



**‘पिके वाळत आहेत, वीज तरी नियमित द्या’**

पावसाअभावी पिकांची अवस्था बिकट असताना शेतीसाठी मिळणारा वीजपुरवठाही अनियमित राहिल्यास शेतकऱ्यांनी करायचे तरी काय, असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. जळालेले ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलावेत, शेतीपंपांचा वीजपुरवठा सुरळीत करावा, वारंवार होणारी वीज ये-जा थांबवावी आणि अनावश्यक लोडशेडिंग कमी करावे, अशी मागणी करण्यात आली. ‘निसर्गाने साथ सोडली, आता महावितरणने तरी शेतकऱ्यांना साथ द्यावी; अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल,’ असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेने दिला आहे.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर यासह खरीप पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. मात्र, सिंचनासाठी आवश्यक वेळी वीज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. काही ठिकाणी वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच खंडित होत असल्याने विद्युत मोटारी सुरू करून पिकांना पाणी देणेही कठीण झाले आहे.

**रात्री दोन वाजता अधिकाऱ्यांची चर्चा**

आंदोलनाची दखल घेत महावितरणचे अधिकारी अंजनकर यांनी रात्री सुमारे दोन वाजता आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी जळालेले ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलणे, गावठाण फिडरचा वीजपुरवठा सुरळीत करणे तसेच शेतातील वीजपुरवठा नियमित करण्याच्या मागण्या शेतकऱ्यांनी मांडल्या. चर्चेनंतर अधिकाऱ्यांनी सकाळपर्यंत जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलण्यासह गावठाण फिडर व शेतीचा वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर शेतकऱ्यांनी मुक्काम आंदोलन तात्पुरते स्थगित केले. दरम्यान, दिलेल्या आश्वासनाची सकाळपर्यंत अंमलबजावणी झाली नाही किंवा वीजपुरवठा पूर्ववत झाला नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या तिघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दरोडा घालण्याच्या तयारीत रेल्वे स्टेशन परिसरातील पडीत जागेत दबा धरून बसलेल्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेतले. ही कारवाई १० सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास करण्यात आली. आरोपींकडून दोन चाकू, मिरची पूड, लांब खिळा, छोटी टामी, दोन हॅन्डग्लोव्हज तसेच सुमारे पाच हजार रुपये किमतीचा जुना मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे स्टेशन परिसरातील पडीत जागेत काही इसम अंधाराचा फायदा घेऊन दरोडा घालण्याच्या उद्देशाने दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. यावेळी संशयित इसम आढळून आल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत तिघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये विशाल कालबाल्या चव्हाण (वय ३५, रा. लहुजी नगर, वाशिम), यशवंत गंगाराम चव्हाण (वय ३४, रा. चांडस, ता. मालेगाव) आणि शंकेश मनोहर भोसले (वय २०, रा. चांडस, ता. मालेगाव) यांचा समावेश आहे. आरोपींकडून दरोड्याच्या तयारीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलीसांच्या सतर्कतेमुळे संभाव्य दरोड्याचा प्रकार घडण्यापूर्वीच उधळून लावण्यात यश आले. या प्रकरणाचा पुढील तपास वाशिम शहर पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर आढे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव, पोलीस हवालदार गजानन झागरे, आशिष बिडवे, ज्ञानदेव मात्रे, दिलीप देवकते, पोलीस अंमलदार राजकुमार यादव, भुषण ठाकरे, अमाले इरतकर, संतोष वाघ, तुषार ठाकरे, संदीप दुतोंडे, गोपाल चौधरी व चालक सुनिल तावडे यांच्या पथकाने केली.



# कारंज्यात देशसेवक जवानांसह नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार



■ प्रतिनिधी | कारंजा ■

देशसेवेच्या भावनेने कठीण प्रशिक्षण पूर्ण करून राष्ट्रसेवेसाठी सज्ज झालेल्या कारंजा तालुक्यातील जवानांचा तसेच नुकतेच नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या समाजबंधूचा भव्य सत्कार व गौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

संत गाडगे बाबा नागरी सहकारी पतसंस्था, जुना भाजी बाजार, कारंजा येथे कारंजा तालुका धोबी (परीट) समाज बांधवांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वनाथ राऊत होते. प्रमुख अतिथी म्हणून उद्योगपती रविंद्र शहाकर, तर नवनिर्वाचित नगरसेवक अजय श्रीवास यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला हारार्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यानंतर देशसेवेसाठी निवड झालेल्या जवानांच्या आई-वडिलांचा सन्मान करण्यात आला. BSF चे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेले संकेत सुभाष कवळे तसेच CRPF चे प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रतिक कवळे यांचा उपस्थित सत्कार करून गौरव करण्यात आला.

# जिल्ह्याचा अभिमान : केबीसी मध्ये २५ लाख जिंकणाऱ्या विशाल राठोडचा काँग्रेसकडून हृदयस्पर्शी सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संपूर्ण देशात वाशिम जिल्ह्याचे नाव अभिमानाने पोहोचवणाऱ्या कळंबा बोडखे (ता. मंगरुळपीर) येथील गरीब व ग्रामीण कुटुंबातील ङविशाल प्रेमचंद राठोड याने सोनी टीव्हीवरील अमिताभ बच्चन सादर करत असलेल्या कौन बनेगा करोडपती (KBC) या प्रतिष्ठित कार्यक्रमाच्या हॉटसीटवर बसून २५ लाख रुपयांचे घवघवीत यश मिळवले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्याचा घरी जाऊन सत्कार करण्यात आला.

वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजु चौधरी यांनी विशाल राठोड यांच्या कळंबा बोडखे येथील घरी भेट देऊन शाल, बुके देऊन त्याचा हृदयस्पर्शी सत्कार केला. ग्रामीण भागातील एका होतकरू व बुद्धिमान युवकाने जिद्द आणि ज्ञानाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश वाशिम जिल्ह्यासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी राजु चौधरी म्हणाले. यावेळी राजु चौधरी म्हणाले की, देशातील मोठी औद्योगिक घराणी आणि व्यावसायिकांनी KBC सारखे ज्ञानावर आधारित कार्यक्रम मोठ्या प्रमाणात विविध माध्यमांतून पुढे आणले पाहिजेत, जेणेकरून ग्रामीण, शहरी आणि गरीब कुटुंबातील होतकरू, बुद्धिमान युवक, विद्यार्थी व व्यक्तींना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची आणि आर्थिक मदत मिळवण्याची संधी मिळेल. विशाल राठोड याने दाखवून दिले की परिस्थिती गरीब असली तरी जिद्द, मेहनत आणि ज्ञान असेल तर यश नक्की मिळते. त्याच्या या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून त्याचे अभिनंदन होत आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस उज्वल देशमुख, सरचिटणीस सुरेश रत्नपारखी, संतोष पाठे, ज्ञानेश्वर अखंड, सुरेश किसनराव राठोड व इत्यादी युवक उपस्थित होते.



# कर्जमुक्ती योजनेंतर्गत मिळणार लाभ

**अकोला :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत अकोला जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत ११ हजार ५० शेतकऱ्यांचा समावेश असून, पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार असल्यामुळे यादीतील पात्र शेतकऱ्यांनी विनाविलंब आधार प्रमाणीकरण पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गितेशचंद्र साबळे यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना राबविण्यात येत आहे.

# आगीत नुकसानग्रस्त नाथ जोगी परिवाराला आ. अमित झनक यांचा मदतीचा हात



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील बोरगाव येथे नाथ जोगी परिवाराच्या तीन घरांना आग लागून मोठे नुकसान झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच रिसोड-मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित सुभाषराव झनक यांनी पोळा सणाच्या दिवशीही घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस केली. तसेच पीडित कुटुंबीयांना तातडीने मदतीचा हात देत संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास दिला. पोळा सणाच्या दिवशी जनतेसोबत आनंद साजरा करण्याबरोबरच संकटात सापडलेल्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देण्याची संवेदनशीलता आमदार झनक यांच्या भेटीतून दिसून आली. आगीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी संबंधितांकडून घटनेची माहिती घेतली.

यावेळी गटविकास अधिकारी मितेश पाटील, ग्रामपंचायत अधिकारी मोहन वानखेडे, प्रकाश मामा आंभोरे, माजी सरपंच वसंतराव लांडकर, नारायण गारडे सर, सदाशिव लांडकर, संजय गुडदे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दूध व्यवसायातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा मार्ग!



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या दूध व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत शेतकरी व विशेषतः महिला शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत व्हावी, महिलांना स्वावलंबी व सक्षम बनविता यावे, या उद्देशाने इंदुजा दूध डेअरीच्या वतीने श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथे शेतकरी हिताचा मार्गदर्शनपर कार्यक्रम ता.६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कल्याण महाराज जोशी,तसेच मुख्य मार्गदर्शक म्हणून इंदुजाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिकंदर मुलानी, डॉ. वसीम हन्नुरे, प्रज्वल कडू आदी उपस्थित होते.

दूध व्यवसाय केवळ जोडधंदा न राहता कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीचे प्रभावी साधन कसे बनू शकते, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी दुग्ध व्यवसायात पुढाकार घेऊन स्वतःची आर्थिक ताकद निर्माण करावी, यावर विशेष भर देण्यात आला.यावेळी विविध शासकीय योजना, दूध उद्योग उभारणीसाठी उपलब्ध बँक कर्ज सुविधा व त्यासाठीची प्रक्रिया, तसेच पशु पालनातून उत्पन्न वाढविण्याच्या विविध मार्गांची माहिती देण्यात आली. जनावरांची योग्य निवड, कृत्रिम रेतणाचे महत्त्व, जात व गुणवत्तेनुसार पशुधन निवड, संतुलित खाद्य, लसीकरण, जनावरांची स्वच्छता व आरोग्याची निगा याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. दूध उत्पादन वाढविण्यासोबतच गुणवत्तापूर्ण दूध उत्पादन, नियमित पशुपालन व्यवस्थापन आणि योग्य नियोजन केल्यास दुग्ध व्यवसायातून शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो.असे यावेळी सांगण्यात आले.ग्रामीण भागातील महिलांच्या हातात आर्थिक निर्णय क्षमतेची ताकद देणारा आणि शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहण्याची दिशा देणारा हा उपक्रम ठरला. महिला सक्षम झाल्या तर कुटुंबाची आर्थिक घडी मजबूत होते. आणि कुटुंब मजबूत झाले.

# भूमिपुत्र कडून शेतकऱ्याच्या मदतीसाठी निवेदन सादर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सभापती रिसोड कृ. उ. बा. स. विष्णुपंत भुतेकर यांच्या मार्गदर्शनानुसार वाशिम जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्यामुळे खरिपातील पिकांवर संकट आलेले आहे. याच संदर्भात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भूमिपुत्र कडून प्रत्येक जिल्ह्यात त्या- त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्या मार्फत शासनाला निवेदने दिली जात आहेत. काल भूमिपुत्राचे जिल्हाधक्ष रामेश्वर भाऊ अवचार यांच्या नेतृत्वात निवासी जिल्हाध्यक्ष संतोषजी सुर्वे, श्रीरंग नागरे, बाळू बर्डे, शत्रू अवचार, बालाजी बोरकर, उद्धराव इढोले यांच्या उपस्थितीत वाशिम जिल्ह्यांमध्ये नुसकान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी वाशिम यांना देण्यात आले.



# श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे काटेपूर्णा अभयारण्यात ‘अरण्यवाचन’

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

राष्ट्रीय वन्यजीव दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, पशुपक्षी, वृक्षसंपदा आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा द्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (ऱ्एए) व राष्ट्रीय छात्र सेना (ऱ्ण) यांच्या संयुक्त विद्यमाने काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात एकदिवसीय अरण्यवाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि मार्गदर्शक सहभागी झाले होते.



अरण्यवाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांमधून मिळणाऱ्या माहितीपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष जंगलात जाऊन निसर्ग, जैवविविधता आणि वन्यजीवांचे निरीक्षण करण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. जंगलातील विविध घटकांचा प्रत्यक्ष अनुभव घेताना पर्यावरणाचा समतोल आणि त्याच्या संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात आले. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक प्रवीण कांबळे तसेच गाईड नागसेन आकोडे आणि प्रथम शिंकटवार यांनी विद्यार्थ्यांना अभयारण्यातील विविध नैसर्गिक घटकांची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांच्या सोबत अभयारण्य परिसरात फेरफटका मारत विविध वृक्ष, वेली, वनस्पती तसेच पक्ष्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले.

# बुद्धिबळ स्पर्धेत गुरुकुल विद्यालयाच्या नूतन सोनेकरची जिल्हास्तरावर निवड



■ प्रतिनिधी | कारंजा ■

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम आणि तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी तालुका क्रीडा संकुल, कारंजा येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत गुरुकुल विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी नूतन सोनेकर हिने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड मिळविली. स्पर्धेदरम्यान नूतन सोनेकर हिने आपल्या बुद्धिमत्तेचा, संयमाचा आणि उत्कृष्ट खेळतंत्राचा प्रभावी वापर करत प्रतिस्पर्ध्यांसमोर दमदार खेळीचे प्रदर्शन केले. तिच्या या कामगिरीमुळे गुरुकुल विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. नूतनच्या या यशाबद्दल गुरुकुल विद्यालयाच्या वतीने तिचे अभिनंदन करण्यात आले.

# नियमबाह्य कामांना थारा नाही; कंत्राटदारांवर कारवाईचा इशारा

## स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांचा बांधकाम विभागाला सज्जड दम

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील विकासकामांच्या नावाखाली नियमांची पायमल्ली अथवा निकृष्ट कामे अजिबात खपवून घेतली जाणार नाहीत. प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावतानाच प्रत्येक काम नियमानुसार आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करा; कंत्राटदारांमुळे कामे रखडत असल्यास संबंधितांवर कारवाई करा, असा स्पष्ट आदेश स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला.

महानगरपालिकेच्या बांधकाम विभागांतर्गत मागील वर्षी नगरोत्थान, दलितेतर, दलित वस्ती, मूलभूत सोयी-सुविधा तसेच अन्य निधीतून प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा प्रभागनिहाय आढावा गुरुवारी घेण्यात आला. या बैठकीत शहरातील सुरू असलेली, प्रलंबित असलेली तसेच विविध कारणांमुळे रखडलेली कामे आणि त्यातील अडचणींचा आढावा घेण्यात आला.



मनपा क्षेत्रातील विविध प्रभागांमध्ये तब्बल ५६ कामे प्रलंबित असल्याचे बैठकीत समोर आले. यापैकी काही कामे भूमिगत गटार योजनेमुळे, काही जागेअभावी, तर काही अतिक्रमणामुळे रखडली आहेत. संबंधित अडचणी तातडीने दूर करून प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश अग्रवाल यांनी दिले.

**रस्त्यांच्या कामात मातीचा भराव नको**

भूमिगत गटार योजनेचे काम झाल्यानंतर रस्त्यावर केवळ माती टाकून काम उरकू नये. नियमानुसार मुरूम टाकून भरती व दबाई केल्यानंतरच रस्त्याचे काम करण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना अग्रवाल यांनी दिल्या. तसेच रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर भूमिगत गटार योजनेचे पाईप रस्त्याच्या पृष्ठभागावर दिसता कामा नयेत. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अभियंत्यांची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. शहरातील चारही कचरा संकलन केंद्रांकडे ये-जा करण्यासाठी आवश्यक मार्ग तयार करण्याचे प्रस्ताव तातडीने तयार करून संबंधित रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

### ५६ कामे अद्याप प्रलंबित

**दर्जा आणि नियमांशी तडजोड नाही**

रस्ते, नाल्या, कंपाउंड वॉल, शौचालये, नाल्यांवरील धापे यांसह मनपाच्या माध्यमातून करण्यात येणारे प्रत्येक बांधकाम नियमानुसारच झाले पाहिजे. नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेले कोणतेही काम खपवून घेतले जाणार नाही, असा सज्जड इशारा अग्रवाल यांनी दिला. कंत्राटदारामुळे एखादे काम रखडले असल्यास संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीला उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेता पवन महल्ले, नगरसेवक अमोल माहोकार, हर्षद भांबेरे, कार्यकारी अभियंता अजय गुजर, उपअभियंता अनिल गावंडे, आशिष निचळ, युसुफ खान, नकुल पागृत यांच्यासह बांधकाम विभागातील सर्व कनिष्ठ अभियंते उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८६ ■ शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पोळ्याच्या जल्लोषात विरुळात हत्याकांड

## मुलानेच जन्मदात्याचा जीव घेतला; वीटांनी डोके ठेचून निर्घृण हत्या

### क्षुल्लक वादाचा भडका उडाला; विरुळ आकाजी हादरले, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** घराघरांत नंदी पोळ्याचा उत्साह सुरू असताना विरुळ आकाजी येथे मात्र एका घरात रक्ताचे थारोळे पडले. क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान इतक्या टोकाला गेले की मुलानेच जन्मदात्या वडिलांच्या डोक्यात वीटांनी घाव घालत त्यांची निर्घृण हत्या केली. तान्ह्या पोळ्याच्या दिवशी घडलेल्या या काळजाचा थरकाप उडविणाऱ्या घटनेने संपूर्ण गाव सुन्न झाले आहे.

परमेश्वर बबन चौधरी वय ५० रा विरुळ आकाजी असे मृताचे नाव आहे. तर प्रणय परमेश्वर चौधरी वय २६ याला या प्रकरणात पुलगाव पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. आबाजी वॉर्ड परिसरात शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार परमेश्वर चौधरी यांचे पत्नीशी पटत नसल्याने पत्नी मुलगा प्रणय आणि मुलगी मागील काही वर्षांपासून रसुलाबाद येथे राहत आहेत. पोळ्याच्या पाडव्याच्या निमित्ताने प्रणय मांस घेऊन विरुळ येथील वडिलांच्या घरी आला होता. आणलेले मांस घरी शिजविण्याच्या कारणावरून वडील आणि मुलामध्ये वादाची ठिणगी पडली.

शाब्दिक वाद वाढत गेला आणि दोघांमध्ये हाणामारी झाली. याचदरम्यान परमेश्वर यांनी प्रणयवर वीट फिरकावल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर संतापलेल्या प्रणयने वीट हातात घेत परमेश्वर यांच्या डोक्यावर घाव घातले. डोक्यावर गंभीर वार झाल्याने परमेश्वर यांचा मृत्यू झाला.

**तान्ह्या पोळ्याच्या दिवशी बापाच्या मृत्यूने गाव हादरले**



ज्या दिवशी गावागावांत नंदी पोळ्याच्या निमित्ताने आनंदाचा जल्लोष सुरू होता त्याच दिवशी जन्मदात्या वडिलांचा मुलाच्या हातून झालेला अंत पाहून विरुळमध्ये शोककळा पसरली. क्षुल्लक कारणातून सुरू झालेला वाद जीवघेणा ठरल्याने संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.घटनास्थळी पोलिस अधिकाऱ्यांची धाव

हत्येची माहिती मिळताच पुलगावचे ठाणेदार सदाशिव ढाकणे एपीआय नितीन मदनकर आणि पोलिस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून आरोपी प्रणय चौधरी यालाही ताब्यात घेतले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेले यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने तपासणी करीत हत्येच्या घटनेमागील संपूर्ण पार्श्वभूमी तपासण्यास सुरुवात केली आहे.

**फॉरेन्सिक पथकाकडून रक्ताचे नमुने**

ठाणेदार सदाशिव ढाकणे यांनी घटनेची माहिती फॉरेन्सिक पथकाला दिल्यानंतर पथकाने घटनास्थळी पोहोचून पुरावे संकलित केले. रक्तमिश्रित माती साधी माती तसेच इतर आवश्यक नमुने तपासासाठी घेण्यात आले. या नमुन्यांच्या आधारे घटनाक्रमातील महत्त्वाचे पुरावे तपासले जाणार आहेत.

**मृत परमेश्वर यांच्यावरही होता हत्येचा आरोप-** या घटनेतील आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. मृत परमेश्वर चौधरी यांच्यावर यापूर्वी एका व्यक्तीच्या हत्येचा आरोप होता. या प्रकरणात त्यांनी सुमारे तीन वर्षे कारागृहात घालविली होती. आता त्यांच्याच मुलाने त्यांची निर्घृण हत्या केल्याने विरुळ परिसरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पुलगाव पोलिस करीत आहेत.

# सरकारी नोकरीचे गाजर दाखवून १३ लाखांचा गंडा

## मंत्रालयातील ओळखीचा बनाव, नर्सची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत दोन महिलांकडून लाखोंची उकळपट्टी

### बनावट नियुक्तीपत्र देऊन टाळाटाळ, चार लाखांचे धनादेशही बाऊन्स, हिंगणघाट पोलिसांत दोघांविरुद्ध गुन्हा

**हिंगणघाट जनमाध्यम :** सरकारी नोकरीच्या आमिषाला भुलवून दोन महिलांकडून तब्बल १३ लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार हिंगणघाट शहरातील निशानपुरा वार्डात उघडकीस आला आहे. मंत्रालयातील आरोग्य विभागात आपली ओळख असल्याचे सांगत कोल्हापूरच्या शासकीय रुग्णालयात नर्सची जागा असल्याचा बनाव करण्यात आला. नोकरीच्या आशेने पैसे दिल्यानंतर बनावट नियुक्तीपत्र हातात देण्यात आले. मात्र प्रत्यक्ष नियुक्तीचा आदेश न आल्याने फसवणुकीचा प्रकार उघड झाला.

यासीमा मोहम्मद इस्तयाकी शेख वय ३६ या आदिवासी आश्रमशाळा चोरांबा येथे परिचारिका म्हणून कार्यरत आहेत. सुवर्णा फुलझेले रा सेवाग्राम यांच्या माध्यमातून त्यांची स्वप्नील वानखेडे रा बर्हाणपूर जिल्हा अमरावती याच्याशी ओळख झाली. वानखेडे याने मुंबई मंत्रालयातील आरोग्य विभागात ओळख असल्याचे सांगून कोल्हापूर येथील शासकीय रुग्णालयात जागा रिक्त असल्याचे सांगितले.

नोकरीसाठी पैसे द्यावे लागतील तसेच अर्ज आणि कागदपत्रांच्या नावाखाली खर्च येईल असे सांगून त्याने यासीमा शेख यांच्याकडून वेळोवेळी सहा लाख रुपये घेतले. त्यानंतर बनावट नियुक्तीपत्र दाखवून मुख्य आदेश लवकरच मिळेल असे सांगण्यात आले.

याच माध्यमातून जागृती धोटे रा संत तुकडोजी वार्ड यांच्याकडूनही नोकरीच्या नावाखाली सात लाख रुपये घेण्यात आले. मात्र बराच कालावधी उलटूनही नियुक्तीचा आदेश आला नाही. पैसे परत मागितल्यानंतर आरोपीकडून उडवाउडवीची उत्तरे मिळू लागली. गॅरंटी म्हणून दिलेले चार लाख रुपयांचे धनादेशही बँकेत वठले नाहीत.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलांनी हिंगणघाट पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी स्वप्नील वानखेडे आणि अप्पासाहेब पाटील रा लोकशाही कॉलनी जिल्हा संभाजीनगर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहेत.

# माणूस वाघाने मारला, व्यवस्था मात्र सुन्न

## भगवान धुर्वेंच्या मृत्यूने रायपूर हादरले, वाघाच्या बंदोबस्तासाठी ग्रामस्थांचा दुसऱ्या दिवशीही ठिय्या

### खा. अमर काळे रस्त्यावर उतरले, पालकमंत्री पोळ्यात रमले

**सेलू जनमाध्यम :** वाघाने माणूस मारला आणि आता प्रशासनाच्या निर्णयाची प्रतीक्षा करत एक कुटुंब अंत्यसंस्काराशिवाय थांबले आहे. तालुक्यातील रायपूर जंगली येथे शेतकरी भगवान धुर्वे वय ६५ यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू होऊन जवळपास ४८ तास उलटले आहेत. मात्र वाघाचा तातडीने बंदोबस्त आणि कुटुंबीयांना ठोस आश्वासन मिळत नसल्याने मृतदेह स्वीकारण्यास कुटुंबीयांनी नकार दिला आहे. ग्रामस्थांनीही दुसऱ्या दिवशी आंदोलन कायम ठेवत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.

बैलपोळ्याच्या पूर्वसंध्येला भगवानजी धुर्वे शेतातून गावाकडे परतत होते. दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने रायपूर जंगलीसह परिसर हादरला आहे. शेतात जाणे आणि परतणेही जीवावर बेतत असल्याची भीती ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे.

भगवान धुर्वे यांचा मृतदेह सेलू ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी घटनास्थळी येऊन ग्रामस्थांशी प्रत्यक्ष चर्चा करावी. वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा आणि तो निर्णय प्रत्यक्ष कृतीत उतरवावा. अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. तोपर्यंत मृतदेह स्वीकारणार नसल्याचे कुटुंबीयांनी स्पष्ट केले आहे.

**दोन दिवस खासदारांचा ठिय्या-** ग्रामस्थांच्या आंदोलनाला खासदार अमर काळे यांनी सलग गुरुवार शुक्रवार दोन्ही दिवस आंदोलनस्थळी ग्रामस्थांसोबत ठिय्या मांडून बसले. त्यांनी मृतकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे जाणून घेतले. तसेच प्रशासन आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा केली. मागण्यांवर ठोस निर्णय होत नसल्याने खासदार काळे यांनी वनविभागाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. अभ्युदय मेघे. माजी जिल्हा परिषद सदस्य सौरभ शेळके. सेलूचे तहसीलदार आणि वनविभागाचे अधिकारीही आंदोलनस्थळी उपस्थित आहेत. जिल्ह्यात नुकतेच रुजू झालेले उपविभागीय अधिकारी मोटवानी यांनी शुक्रवारी सायंकाळी सुमारे पाच वाजता घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली.



**पालकमंत्री याच मार्गाने गेले. रायपूर मात्र दूरच**

या घटनेनंतर ग्रामस्थांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या भेटीची मागणी केली होती. गुरुवार आणि शुक्रवार असे दोन्ही दिवस पालकमंत्री नागपूरहून वर्ध्याकडे याच मार्गाने आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र जवळपास दोन दिवस आंदोलन सुरू असूनही ते रायपूर जंगली येथे पोहोचले नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

पोळ्याच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी वेळ मिळतो. मात्र वाघाच्या हल्ल्यात कुटुंबाचा कर्ता गमावलेल्या परिवाराची भेट घेण्यासाठी वेळ का मिळत नाही. असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. पालकमंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा आता आंदोलनात राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

**रायपूरमध्ये पोळा साजराच झाला नाही-** भगवानजी धुर्वे यांच्या मृत्यूने गावावर दुःखाचे सावट आहे. गावाच्या इतिहासात प्रथमच बैलपोळा आणि तान्हा पोळा साजरा झाला नाही. ज्या सणात शेतकरी बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. त्याच काळात शेतकऱ्याचा वाघाच्या हल्ल्यात बळी गेल्याने रायपूरची अवस्था अक्षरशः काळजाला चटका लावणारी झाली आहे. दरम्यान विरोधक आणि काँग्रेसचे पदाधिकारी कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहून आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. सत्ताधारी पक्षातील प्रमुख नेत्यांच्या अनुपस्थितीबाबत मात्र ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जवळपास ४८ तास उलटूनही मृतदेह स्वीकारला गेलेला नाही. अंत्यसंस्काराची प्रतीक्षा कायम आहे. रायपूरला आता केवळ आश्वासन नको आहे. वाघाच्या दहशतीतून मुक्त करण्यासाठी ठोस कृती हवी आहे. एका शेतकऱ्याचा जीव गेल्यानंतरही प्रशासनाचा निर्णय कागदावरच राहणार की रायपूरच्या आक्रोशाला प्रत्यक्ष उत्तर मिळणार. हा प्रश्न आता प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

### आज जिल्हाधिकारी कार्यालयावर गावकऱ्यांचा हल्लाबोल

रायपूर प्रकरणात मृतदेह स्वीकारण्यास कुटुंबीयांनी नकार देत आंदोलन सुरूच ठेवले आहे. जवळपास ४८ तास उलटूनही प्रशासनाकडून ठोस तोडगा निघालेला नाही. जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांना भेटीसाठी वेळ नसल्याचा आरोप करत संतप्त गावकऱ्यांनी आज सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल करण्याचा निर्णय घेतला आहे.

# पैशांची मागणी केल्यानंतर कामगार बेपत्ता

**हिंगणघाट जनमाध्यम:** कंपनीच्या क्वॉटरवरून संपर्क तुटलेल्या कामगाराचे कुणीतरी अपहरण केले असावे असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी योगिराज रमेश करे यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी १० सप्टेंबर रोजी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

धनराज करे हे नजीकच्या वेळा येथील गिमा टेक्स कंपनीत काम करीत होते. योगिराज यांच्या आईची प्रकृती बिघडल्याने त्या उपचारासाठी यवतमाळ येथे गेल्या होत्या. दरम्यान २६ ऑगस्ट रोजी योगिराज यांनी धनराज यांना दूरध्वनी केला. त्यावेळी धनराज कंपनीच्या क्वॉटरवर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी धनराज यांनी पैशांची मागणी केली. त्यानुसार योगिराज यांनी पाचशे रुपये ऑनलाइन पद्धतीने पाठविले. त्यानंतर धनराज यांचा मोबाईल बंद झाला. नातेवाईक आणि परिचितांकडे चौकशी करून तसेच विविध ठिकाणी शोध घेऊनही धनराज यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे धनराज यांचे कुणीतरी अपहरण केले असावे असा संशय योगिराज यांनी तक्रारीत व्यक्त केला आहे. हिंगणघाट पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# समाज बदलायचा असेल तर लेखणीला विचारांची धार द्या

## सुरेश गणराज यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय कवी संमेलनात साहित्यिकांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम :** साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजमन घडविण्याची आणि भावी पिढीला दिशा देण्याची प्रभावी शक्ती आहे. साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून समाजातील प्रश्नांना वाचा फोडत नव्या पिढीमध्ये ज्ञान, कौशल्य, विवेक आणि स्वतंत्र विचारांची जाणीव निर्माण करावी. साहित्य हे भविष्याचे शिल्पकार ठरावे, असे प्रतिपादन स्किल डेव्हलपमेंट मेंटर सुरेश गणराज यांनी केले.

प्रबोधिनी प्रेरणा फाउंडेशन, प्रबोधिनी प्रेरणा मंच आणि महाराष्ट्र साहित्य समूह चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन आणि कविरत्न पुरस्कार सोहळा श्री संत गाडगेबाबा स्मारक सभागृह कृष्णनगर येथे आयोजित करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक तसेच विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष राजेंद्र



मुंढे होते. नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, ज्येष्ठ कवी भालचंद्र डंभे, सामाजिक कार्यकर्त्या अर्चना भोमले आणि ॲडव्होकेट मृणालिनी रागीट यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्याच्या निर्मितीत जीवनानुभवाबरोबरच ज्ञान आणि कौशल्याचे मूल्य रुजले पाहिजे. साहित्य वाचकाला केवळ विचार देत नाही तर प्रश्न विचारण्याची वृत्ती, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित करते. महाकवी कालिदास यांच्या साहित्यदृष्टीचा संदर्भ देत गणराज यांनी साहित्य समाजाला मार्गदर्शन करणारी शक्ती असल्याचे सांगितले. सर्जनशील साहित्याच्या माध्यमातून उद्योजक, शास्त्रज्ञ, कलाकार आणि सामाजिक आव्हानांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधणारे नागरिक घडू शकतात. त्यामुळे साहित्यिकांची जबाबदारी केवळ लेखनापुरती मर्यादित नसून समाजाच्या भविष्याची घडण करण्याची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# गणेशोत्सवासाठी वर्धा पोलीस सज्ज

## लेझर लाईट आणि ध्वनी प्रदूषणावर करडी नजर

**वर्धा जनमाध्यम :** गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा यासाठी वर्धा पोलीस दल सज्ज झाले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासोबतच ध्वनी प्रदूषण आणि धोकादायक लेझर लाईटच्या वापरावर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे.

ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३६ आणि ३८ नुसार आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शांतता क्षेत्रांमध्ये नॉइज लेव्हल मीटरद्वारे ध्वनी पातळीचे रीडिंग घेण्यात आले आहे. मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.



लेझर लाईटमुळे वाहनचालक तसेच नागरिकांच्या डोळ्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी बीएनएसएस कलम १६३ नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. गणेश मंडळे, डीजे चालक, शांतता समिती आणि नागरिकांच्या बैठका घेऊन मिरवणूक मार्ग, वेळापत्रक, वाहतूक व्यवस्था आणि नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत दंगा काबू योजनेची रंगीत तालीम आणि संवेदनशील भागात रूट मार्चही घेण्यात आला.सायबर पोलिस ठाण्यात २४ तास सोशल मीडिया मॉनिटरिंग सेल कार्यरत राहणार असून अफवा आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या संदेशांवर लक्ष ठेवले जाणार आहे.

गणेशोत्सवाच्या बंदोबस्तासाठी ११४ पोलीस अधिकारी, १२०० पोलीस अंमलदार, दोन दंगल नियंत्रण पथके, एक जलद प्रतिसाद पथक, १०८० होमगार्ड आणि एक एसआरपीएफ तुकडी तैनात राहणार आहे. यासोबतच सामाजिक संदेश देणाऱ्या गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी गणराया उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नागरिकांनी शांतता आणि सामाजिक सलोखा जपत गणरायाचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी केले आहे.

# घरासमोर उभी दुचाकी चोरट्याने केली लंपास

**वर्धा जनमाध्यम :** घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वर्धा शहरातील गांधीनगर परिसरात घडली. याप्रकरणी वैकुंठ शेखर दरणे यांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी १० सप्टेंबर रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

वैकुंठ दरणे यांनी त्यांच्या गांधीनगर येथील निवासस्थानासमोर एम एच ३२ एस ८८६९ क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. काही वेळाने अज्ञात चोरट्याने परिसरात कुणी नसल्याची संधी साधून दुचाकी चोरून नेली. दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात आल्यानंतर दरणे यांनी परिसरात तसेच आजूबाजूच्या भागात शोध घेतला. मात्र दुचाकीचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही.

यानंतर त्यांनी वर्धा शहर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. चोरीस गेलेल्या दुचाकीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला असून परिसरातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजचीही पाहणी केली जात आहे.

# आरोग्यसेवेत वर्ध्याचा झेंडा; राज्यात तिसरा क्रमांक

## ४५.१७ गुणांची कमाई; ग्रामीण आरोग्य यंत्रणेच्या प्रभावी कामगिरीची राज्यस्तरावर दखल

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि प्रभावी आरोग्य सेवा देण्याच्या कामात वर्धा जिल्ह्याने राज्यात दमदार कामगिरी नोंदविली आहे. यंदाच्या पहिल्या तिमाहीच्या आरोग्य निर्देशांकात वर्धा जिल्ह्याने ४५.१७ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल घेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले यांचा पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्राचे आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक संजय काटकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

राज्यात दर तीन महिन्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या माध्यमातून विविध आरोग्य कार्यक्रमांच्या उद्दिष्टपूर्तीचा आणि निर्देशांकांचा आढावा घेतला जातो. या मूल्यांकनात गोंदिया जिल्ह्याने ४६.५७ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. नागपूर ४५.७९ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला. वर्ध्याने ४५.१७ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. अकोला ४४.३९ गुणांसह चौथ्या तर गडचिरोली ४४.१४ गुणांसह पाचव्या क्रमांकावर आहे.



**२८५ आरोग्य संस्थांचा खांदा-** जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात तब्बल २८५ शासकीय आरोग्य संस्था कार्यरत आहेत. यामध्ये ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे. १८३ उपप्राथमिक आरोग्य केंद्रे. चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे. २१ ॲलोपॅथीक दवाखाने. दहा आयुर्वेदीक दवाखाने. २६ नागरी उपकेंद्रे आणि आठ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब आपला दवाखान्यांचा समावेश आहे. या विस्तीर्ण आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

**माता बाल आरोग्याला प्राधान्य-** माता व बाल आरोग्य. कुटुंब नियोजन. किशोरवयीन आरोग्य. लसीकरण. आरसीएच ऑनलाइन पोर्टलवरील नोंदणी. क्षयरोग नियंत्रण आणि आयुष्मान भारत योजनेंतर्गत मोफत तपासण्यांवर आरोग्य विभागाने भर दिला.

सुरक्षित प्रसूती. प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरचा पाठपुरावा. १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवा तसेच प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समन्वय समिती जिल्हाधिकारी वान्मथी सी. आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे.

पहिल्या तिमाहीत वर्धा जिल्ह्याने ४५.१७ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक मिळविला आहे. हे यश केवळ माझे नसून आरोग्य विभागातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. निर्धारित उद्दिष्टांचा सातत्याने आढावा घेतल्यामुळे विविध आरोग्य निर्देशांकांमध्ये सुधारणा झाली आहे.

**डॉ. स्वप्निल बेले**
**जिल्हा आरोग्य अधिकारी वर्धा**


## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की माझे पक्षकार श्री. सागर विनोद साखरकर व श्री. गौरव विनोद साखरकर राह हिंगणघाट यांच्या मालकीच्या खालील नमूद स्थावर मालमत्तेबाबतचे लिंक नोंदणीकृत विक्रीखत (Registered Sale Deed), दस्त क्र. १३८९ /२०१४, मा. दुय्यम निबंधक, हिंगणघाट, जि. वर्धा यांच्या कार्यालयात नोंदणीकृत असून लिहून घेणार : फिरदोस इमरान अली व लिहून देणार : सौ. मंदाबाई ज्ञानेश्वर माटे असे आहे सदर मूळ दस्तऐवज हरविला/गहाळ झाला आहे.

मालमत्तेचा तपशीलः मौजा पिंपळगाव मा., ता. हिंगणघाट, जि. वर्धा, मौजा न. १०३ प.ह.न.३४ सर्व्हे नं. १९६/५, परिवर्तित प्लॉट नं. ७ पैकीची आराजी ११२.५२चौ.मी., क्षेत्रफळ अंदाजे १२०० चौ. फुट. याची लांबी पूर्व-पश्चिम ६० फुट व रुंदी उत्तर-दक्षिण २० फुट प्रमाणे आहे.

चतुःसीमाः पूर्वेस ओपन प्लेस; पश्चिमेस

उत्तरेस प्लॉट नं. ८; दक्षिणेस याच प्लॉटचा शिल्लक भाग-ले-आउटमधील रोड; सदर मूळ विक्रीखत कोणास सापडल्यास अथवा सदर दस्तऐवजाबाबत कोणाचा हक्क, दावा, हितसंबंध किंवा हरकत असल्यास त्यांनी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर दस्तऐवजाबाबत कोणाचाही दावा/हरकत नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११/०९/२०२६

**अधिवक्ता**
**संजय दि. बोरकर**

शनिवार १२ सप्टेंबर २०२६
epaper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कमकुवत देश स्वतःला G7 का म्हणतात

## ब्रिक्समध्ये पुतिन यांचा अमेरिका-युरोपवर टोला:

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी शुक्रवारी ब्रिक्स बिझनेस फोरममध्ये जागतिक व्यापारावर चर्चा केली. पुतिन यांनी अमेरिका आणि युरोपवर टीका करताना म्हटले, पाश्चात्य देश आता कमकुवत होत आहेत. हे देश स्वतःला जी-७ का म्हणतात हे मला कळत नाही. जगाच्या जीडीपीपैकी ४० टक्क्यांहून अधिक वाटा ब्रिक्स देशांचा आहे, तर जी-७ चा वाटा केवळ २९ टक्के आहे. पंतप्रधान मोदी असेही म्हणाले की, ब्रिक्स देशांमध्ये जगाची निम्मी लोकसंख्या राहते आणि जगाच्या जीडीपीमध्ये त्यांचा ४० टक्के वाटा आहे. भारताला व्यापार वाढवायचा आहे आणि त्यासाठी सुरक्षित सागरी मार्ग आवश्यक आहेत. यापूर्वी, मोदी आणि पुतिन यांनी भारत मंडपम येथे एकमेकांना आलिंगन दिले आणि एकाच गाडीतून प्रवास केला. मोदींनी पुतिन यांना २००० वर्षे जुने पुस्तक भेट दिले आणि पुतिन यांनीही मोदींना आपल्या देशाला भेट देण्याचे निमंत्रण दिले.

पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांना तिरुक्कुरल पुस्तकाच्या रशियन भाषेतील अनुवादाची एक प्रत भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांचे आलिंगन देउन स्वागत केले. द्विपक्षीय बैठकीनंतर पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी भारत मंडपम येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन हे रशियाच्या सर्वात मोठ्या औद्योगिक आणि उत्पादन प्रदर्शनात, इनोप्रोम औद्योगिक प्रदर्शनात पोहोचले. पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी इंटरप्राम प्रदर्शनात बुलेट ट्रेन प्रकल्प पाहिला.पंतप्रधान मोदी यांनी ब्रिक्स देशांचे नेते, ब्रिक्स बिझनेस कौन्सिलच्या अध्यक्षा आणि ब्रिक्स विमेन्स बिझनेस अलायन्सच्या प्रतिनिधींसोबत एक समूह छायाचित्र काढले. तिरुक्कुरल हा तमिळ कवी आणि तत्त्वज्ञ तिरु वल्लुवर यांचा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. याला तमिळ वेद मानले जाते. त्यात सुमारे १,३३० श्लोक आहेत. या श्लोकांमध्ये उत्तम जीवन, नीतिमत्ता, शासन, अर्थशास्त्र, प्रेम आणि मानवी मूल्यांचे वर्णन आहे.तिरुक्कुरल हा तमिळ साहित्यातील सर्वात महत्त्वाच्या ग्रंथांपैकी एक मानला जातो. त्याचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. पंतप्रधान मोदींनी परदेशी नेत्यांना तिरुक्कुरल भेट देणे, हा भारताच्या प्राचीन तमिळ संस्कृती आणि ज्ञान परंपरेबद्दल जगाला दिलेला एक संदेश म्हणून पाहता येईल.




पंतप्रधान मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पझिश्कयान यांनी शुक्रवारी पश्चिम आशियातील परिस्थिती आणि दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. सुमारे दोन आठवड्यांतील दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी भेट आहे. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर पझिश्कयान यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. अमेरिकेने इराणवर नवीन आर्थिक निर्बंध लादल्यामुळे पश्चिम आशियात वाढलेल्या तणावाच्या काळात त्यांचा हा दौरा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्यात बैठक सुरू झाली आहे. एएनआयच्या वृत्तानुसार, दोन्ही नेत्यांमध्ये भारत-यूएन संबंध आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा होत आहे. पंतप्रधान मोदी आणि इराणचे अध्यक्ष मसूद पझाकियान यांच्यातील बैठक संपली आहे. ही बैठक एडक्ष्क्च समिट २०२६ दरम्यान झाली. आता घ मोदींची पुढील बैठक संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्यासोबत होणार आहे. ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणा-या प्रतिनिधींना आणि पाहुण्यांना बिहारचे सत्तू आणि मखाना, बनाना चिप्स, ओडिशाची क?फी आणि गुजराती स्कार्फ असलेल्या विशेष गुडी बॅग दिल्या जात आहेत. पाहुण्यांना भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे हा यामागील उद्देश आहे.

**ब्राझीलने म्हटले- भारताचे ब्रिक्स अध्यक्षपद उत्कृष्ट**

ब्राझीलचे परराष्ट्र मंत्री माउ्रो व्हिएरा यांनी भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाची प्रशंसा केली. ते म्हणाले की, भारताचे अध्यक्षपद उत्कृष्ट आणि खूप यशस्वी होते आणि या काळात बरेच काम पूर्ण झाले.

**अबू धाबीचे प्रिन्स भारतात दाखल**

अबू धाबीचे प्रिन्स शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायद अल नाहयान हे ब्रिक्स शिखर परिषद २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी भारतात दाखल झाले आहेत. विमानतळावर परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी त्यांचे स्वागत केले.

**मोदी म्हणाले- जगाची निम्मी लोकसंख्या ब्रिक्समध्ये आहे.**

पंतप्रधान मोदींनी सांगितले की, जगाची निम्मी लोकसंख्या ब्रिक्स देशांमध्ये राहते. या देशांचा जगाच्या जीडीपीमध्ये ४०% आणि जागतिक व्यापारात २५% पेक्षा जास्त वाटा आहे.

ते म्हणाले की, अलिकडच्या वर्षांत जगाचा जीडीपी जवळपास अडीच पटीने वाढला आहे, तर ब्रिक्स देशांचा जीडीपी साडेचार पटीने वाढला आहे. याचा अर्थ असा की, ब्रिक्सची अर्थव्यवस्था उर्वरित जगाच्या तुलनेत जवळपास दुप्पट वेगाने वाढली आहे. मोदी म्हणाले की, ब्रिक्स देश आता नवोन्मेष आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रमुख केंद्रे बनत आहेत. भारतात आयोजित होत असलेला हा ब्रिक्स बिझनेस फोरम आतापर्यंतचा सर्वात मोठा आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ब्रिक्स बिझनेस फोरममध्ये पाश्चात्य देशांवर टीका केली. काही कमकुवत पाश्चात्य देश अजूनही स्वतङ्कला जी७ का म्हणतात, हे आपल्याला समजत नाही, असे ते म्हणाले. पुतिन म्हणाले की, आर्थिक सामर्थ्याच्या बाबतीत ब्रिक्सने जी७ ला खूप मागे टाकले आहे. त्यांच्या मते, जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे बदल होत आहेत आणि आता नवीन देश विकासाला चालना देत आहेत. ते म्हणाले की, ब्रिक्स अर्थव्यवस्थेचा आकार सातत्याने वाढत आहे. त्याच वेळी, पाश्चात्य देशांचे वर्चस्व पूर्वीसारखे राहिलेले नाही. पुतिन म्हणाले की, जागतिक अर्थव्यवस्था सतत बदलत आहे आणि आर्थिक विकासाची नवीन केंद्रे उदयास येत आहेत.

## जगाचे अर्थकारण बदलतंय

### ब्रिक्सच्या मंचावरून PM मोदी, पुतिन अन् इराणचे अध्यक्ष पेझेश्कियन यांचा अमेरिकेला इशारा?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नवी दिल्लीत ब्रिक्स शिखर परिषदेला सुरुवात झाली आहे. या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी शुक्रवारी ब्रिक्स बिझनेस फोरमच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य, सुरक्षित व्यापार यावर भर दिला. डालरच्या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या ब्रिक्सच्या प्रयत्नांवर अमेरिकेकडून नेहमीच टीका करण्यात आलीय. अशात ब्रिक्समधील नेत्यांची वक्तव्ये चर्चेत आली आहेत.



**पंतप्रधान मोदींचा सागरी वाहतूक आणि सुरक्षेवर भर-** ब्रिक्स परिषदेच्या माध्यमातून सध्याच्या जागतिक वित्तीय व्यवस्थेला मजबूत पर्याय निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षेबद्दल स्पष्ट संदेश गेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागतिक व्यापारासाठी आवश्यक सुरक्षित सागरी मार्ग आणि वाहतुकीवर भर दिला. तसेच, भारत सागरी वाहतूक स्वातंत्र्य आणि खलाशांच्या सुरक्षेचा समर्थक असल्याचे मत मोदींनी मांडले. अमेरिका, इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे होर्मुझची सामुद्रधुनी ठप्प झाली आहे. याचा व्यापारावर परिणाम होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हे वक्तव्य केले आहे. सागरी मार्ग सुरक्षित असतील, वाहतुकीचे मार्ग खुले राहतील आणि खलाशी सुरक्षित असतील, तरच जागतिक व्यापाराची प्रगती शक्य आहे. म्हणूनच भारत सागरी वाहतुकीचे स्वातंत्र्य आणि खलाशांच्या सुरक्षेचा समर्थक आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पुतिन यांनी जागतिक अर्थव्यवस्था विविध बदलांमधून जात असल्याचे मत नोंदवले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात विकासाला चालना देणा-या पारंपरिक आर्थिक शक्तींची जागा आता उदयोन्मुख अर्थव्यवस्था घेत आहेत, असे पुतिन म्हणाले. प्रस्थापित अर्थव्यवस्थांमध्ये पायाभूत सुविधा, तांत्रिक व वैज्ञानिक प्रगती अशी बलस्थाने असली तरी जागतिक आर्थिक परिस्थिती बदलत आहे यावर पुतिन यांनी भर दिला. जग सतत बदलत असते, असे पुतिन ब्रिक्समध्ये बोलताना म्हणाले. इराणचे अध्यक्ष पेझेश्कियन यांनी प्रमुख चलनांवरील अवलंबित्व कमी करण्याबाबत भाष्य केले. ब्रिक्स सदस्य देशांमधील व्यापारात राष्ट्रीय चलनांचा अधिक वापर करण्याचे आवाहन पेझेश्कियन यांनी केले. सदस्य देशांमधील व्यापारामध्ये राष्ट्रीय चलनांचा वापर वाढवणे महत्वाची गोष्ट आहे. यासाठी जोखीम आणि व्यवहारांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक साधनांची स्थापना करणेही गरजेचे आहे, असे पेझेश्कियन म्हणाले. सध्याची वित्तीय प्रणाली काही मोजक्या चलनांवर केंद्रित असल्यामुळे राजकीय अनिश्चिततेला बळी पडू शकते असेही ते पुढे म्हणाले. डालरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या ब्रिक्सच्या प्रयत्नांवर ट्रम्प यांनी टीका केली आहे. अशात ब्रिक्समध्ये या नेत्यांनी केलेली वक्तव्य चर्चेत आली आहेत. डालरच्या वर्चस्वाला आव्हान देणा-या ब्रिक्स देशांना १० टक्के शुल्काचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा ट्रम्प यांनी गेल्या वर्षी दिला होता.

# पत्नी आणि तीन मुलींना संपवले, तरी चेह-यावर भाव नाही

## सकाळी वडिलांना चहा पाजून आरोपी फरार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**जयपूरमध्ये एका व्यक्तीने पत्नी आणि तीन मुलींची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, चार जणांची हत्या केल्यानंतर आरोपीने दुस-या दिवशी सकाळी आपल्या वृद्ध वडिलांसाठी चहा बनवला आणि स्वत?च्या हाताने त्यांना चहा पाजला. त्यानंतर तो घरातून फरार झाला. करधनी परिसरात ही घटना घडली. राहुल झा असे आरोपीचे नाव असून, त्याने पत्नी गीता झा आणि तीन मुलींची दगडाने वार करून हत्या केल्याचा पोलिसांचा संशय आहे. याबद्दल सविस्तर वृत्त इंडिया टुडेने दिले आहे.

**झोपेत असतानाच चौघांवर हल्ला-** पश्चिम विभागाचे पोलीस उपायुक्त प्रशांत किरण यांच्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सुमारे १० वाजता पोलिसांना हत्यांची माहिती मिळाली. पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले तेव्हा पहिल्या मजल्यावरील एका खोलीत गीता झा यांचा मृतदेह आढळला. दाम्पत्याच्या तीन मुलींपैकी २३ वर्षीय नंदिनी, १८ वर्षीय राधिका आणि १४ वर्षीय मुलीचे मृतदेह तळमजल्यावरील दोन वेगवेगळ्या खोल्यांमध्ये आढळले.

**हत्या केल्यानंतर वडिलांसाठी बनवला चहा-**हत्येनंतर राहुल झा याने कोणताही संशय येउ नये अशा पद्धतीने नेहमीप्रमाणे वागल्याचे तपासात समोर आले आहे. सकाळी सुमारे ७ वाजता तो दूधवाल्याकडून दूध घेण्यासाठी बाहेर गेला. घरी परतल्यानंतर त्याने आपल्या वृद्ध वडिलांसाठी चहा बनवला. लक्ष्मीनाथ यांना त्याने स्वत?च्या हाताने चहा दिला आणि त्यानंतर घरातून निघून गेला. पुढे त्याने पलायन केल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेनंतर राहुलचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

**काही दिवसांपूर्वीच गुजरातहून जयपूरला परतला-**राहुल झा शेअर ट्रेडिंगचे काम करत होता. घटनेच्या काही दिवस आधीच तो गुजरातहून जयपूरला परतला होता. त्याची पत्नी गीता घराच्या पहिल्या मजल्यावर बुटीक चालवत होती. मोठी मुलगी नंदिनी शिक्षणासोबत एका खासगी कंपनीत नोकरी करत होती.

**हत्येच्या तीन दिवस आधी घेतले होते २५ हजार रुपये-** पोलिसांच्या तपासात राहुलने हत्येच्या अवघ्या तीन दिवस आधी शेजा-याकडून २५ हजार रुपये उधार घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी हा या हत्याकांडामागील एक संभाव्य कारण असू शकते, असा पोलिसांचा संशय आहे. याशिवाय कुटुंबातील वादाच्या दिशेनेही तपास केला जात आहे. हत्या नेमक्या कोणत्या कारणातून करण्यात आली आणि या घटनेमागे आणखी काही कारण होते का, याचा शोध पोलिस घेत आहेत. दरम्यान, आरोपी राहुल झा याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध ठिकाणी तपास सुरू आहे.

## रशिया Su-57 लढाउ विमाने देण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेची सुरुवात झाली असून जगभरातील सुमारे १८ देशांचे प्रमुख नेते यात सहभागी होत आहेत. या परिषदेनिमित्त रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन तीन दिवसांच्या भारत दौ-यावर आले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत त्यांची उच्चस्तरीय द्विपक्षीय बैठक पार पडली. दरम्यान, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग तब्बल सात वर्षांनंतर भारतात येत असून, मध्यरात्री त्यांचे दिल्लीत आगमन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्यातील चर्चेमध्ये संरक्षण सहकार्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. २०१६ च्या गोवा ब्रिक्स परिषदेत झालेल्या ज्-४०० हवाई संरक्षण प्रणालीच्या यशस्वी करारानंतर, आता रशिया भारताला आपले अत्याधुनिक पाचव्या पिढीतील स्टील्थ लढाउ विमान सुखोई-५७ देण्याची मोठी ऑफर करण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांनी २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज अमेरिकन डालरसपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याशिवाय रेल्वे, बोगदे निर्मिती आणि अवजड उद्योगांमध्ये रशियन सहकार्य वाढवणे; भारतीय व्यावसायिकांना रशियन बाजारपेठेत प्रवेश सुलभ करणे; नागरी अणुउर्जा क्षेत्रात (फ्युएल सायकल व लाइफ सायकल सपोर्ट) भागीदारी मजबूत करणे; भारतीय कुशल अभियंते व कामगारांसाठी रशियात रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि शेतीसाठी आवश्यक खते आणि खनिजांचा अखंड पुरवठा सुनिश्चित करणे यावर चर्चा केली जाणार आहे.

# न्यूक्लियर एनर्जीपासून ते क्रिटिकल मिनरल्सपर्यंत..;

## पीएम मोदी-राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यात दिल्लीत महत्वाची चर्चा दोन्ही देशातील व्यावार 100 अब्ज डॉलर्स वर नेण्याचे लक्ष्य!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात शुक्रवारी(दि. ११) नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे द्विपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत भारत आणि रशियामधील आर्थिक संबंध आणखी मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डालर्सपर्यंत नेण्याचे लक्ष्य या बैठकीतील प्रमुख मुद्द्यांपैकी एक होते. याशिवाय औद्योगिक सहकार्य, अणुउर्जा, कुशल भारतीय कामगार, क्रिटिकल मिनरल्स आणि खतांचा पुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही चर्चा झाली.



**२०३० पर्यंत १०० अब्ज डालर्सचा व्यापार**

सध्या भारत आणि रशियामधील वार्षिक व्यापार सुमारे ६० अब्ज डालर्सचा आहे. यामध्ये रशियाकडून भारत होणा-या कच्च्या तेलाच्या आयातीचा मोठा वाटा आहे. आता दोन्ही देशांना पुढील चार वर्षांत व्यापारात आणखी ४० अब्ज डालर्सची वाढ करून २०३० पर्यंत तो १०० अब्ज डालर्सवर नेण्याचे लक्ष्य आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी १० सप्टेंबर रोजी सांगितले होते की, हे लक्ष्य गाठण्यासाठी भारत आणि रशियामधील व्यापारात दरवर्षी सातत्याने दुहेरी अंकी वाढ आवश्यक असेल.

**रेल्वेपासून स्टीलपर्यंत वाढणार सहकार्य**

भारत-रशिया औद्योगिक सहकार्य वाढवणे हा देखील बैठकीतील महत्त्वाचा मुद्दा होता. नवी दिल्ली येथे सुरू झालेला INNOPROM ट्रेड फेअर दोन्ही देशांतील कंपन्यांमध्ये नवीन भागीदारी निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरू शकतो. रेल्वे, बोगदा बांधकाम आणि स्टील क्षेत्राच्या संपूर्ण व्हॅल्यू चेनमध्ये सहकार्य वाढवण्यावर भर दिला जात आहे. तसेच दोन्ही देशांतील कंपन्यांसाठी थेट व्यावसायिक संधी वाढवणे आणि रशियन बाजारपेठेत भारतीय वस्तूंचा प्रवेश अधिक सुलभ करणे यावरही चर्चा झाली.

**न्यूक्लियर एनर्जीमध्ये सहकार्य वाढणार**

भारत आणि रशिया नागरी अणुउर्जा क्षेत्रातील सहकार्य आणखी मजबूत करण्याच्या दिशेने काम करत आहेत. यामध्ये अणुइंधनाचा पुरवठा तसेच न्यूक्लियर प्रकल्पांना दीर्घकालीन तांत्रिक आणि इतर आवश्यक मदत देण्यासारख्या बाबींचा समावेश होउ शकतो.

**रशियात भारतीय कुशल कामगारांसाठी वाढणार संधी-** बैठकीत भारतीय कुशल कामगारांना रशियामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. अधिकाधिक भारतीय स्किल्ड वर्कर्सना रशियात जाण्याची सुविधा मिळावी यासाठी दोन्ही देश एक व्यवस्था विकसित करण्याचा विचार करत आहेत. यामुळे भारतीय व्यावसायिकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यासोबतच रशियाच्या मनुष्यबळाच्या गरजाही पूर्ण होउ शकतात.

**क्रिटिकल मिनरल्सवर भारत-रशियाची नजर-** आजच्या काळात क्रिटिकल मिनरल्स हे जगातील महत्त्वाचे धोरणात्मक संसाधन बनले आहेत. इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी, इलेक्ट्रानिक्स आणि इतर हायटेक उद्योगांसाठी या खनिजांची मोठी गरज असते. त्यामुळे भारत आणि रशिया या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या शक्यतांवर चर्चा करत आहेत. धोरणात्मक उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या सप्लाय चेन अधिक मजबूत करणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

**खतांच्या पुरवठ्यालाही महत्त्व-**भारत आणि रशियाच्या आर्थिक संबंधांमध्ये खतांचा पुरवठा हे देखील महत्त्वाचे क्षेत्र आहे. दोन्ही देश खतांचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी तसेच भविष्यात तो वाढवण्यासाठी प्रयत्न करू शकतात. यासाठी धोरणात्मक संयुक्त उपक्रम प्रकल्पांवरही भर दिला जाउ शकतो.

**संरक्षण आणि उर्जेपलीकडे भारत-रशिया संबंध**

भारत-रशिया संबंध आता केवळ संरक्षण आणि उर्जा क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. दोन्ही देश उद्योग, तंत्रज्ञान, सप्लाय चेन, अणुउर्जा आणि क्रिटिकल मिनरल्स यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्ये सहकार्याचा विस्तार करण्याच्या दिशेने पुढे जात आहेत. २०३० पर्यंत १०० अब्ज डालरचा द्विपक्षीय व्यापार साध्य करण्याचे लक्ष्य हे दोन्ही देशांमधील आर्थिक संबंधांना नवी दिशा देणारे ठरू शकते.

# नागपूरच्या मारबत मिरवणुकीत अवतरला 'स्मार्ट मीटरचा बडग्या'

## फलकांवरील संदेशांनी वेधले लक्ष

**नागपूर/प्रतिनिधी :**शहराच्या ऐतिहासिक मारबत महोत्सवात दरवर्षी सामाजिक प्रश्न, सरकारी धोरणे आणि जनतेला भेडसावणा-या समस्यांवर भाष्य करणारे बडगे आकर्षण ठरतात. यंदाच्या मिरवणुकीतही असाच एक बडग्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. हा बडग्या नेमका कोणत्या प्रश्नावर होता आणि त्यावरील फलकांमधून कोणाला इशारा देण्यात आला? जवळ गेल्यानंतर त्यावर लिहिलेले संदेश स्पष्ट झाले. हा होता स्मार्ट मीटरचा बडग्या. त्याच्या माध्यमातून स्मार्ट मीटरविरोधातील नागरिकांचा रोष व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



नागपुरातील मारबत मिरवणुकीत विविध सामाजिक आणि सार्वजनिक प्रश्नांवर भाष्य करणारे बडगे सहभागी झाले होते. त्यामध्ये स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावर तयार करण्यात आलेला बडग्या विशेष चर्चेचा विषय ठरला. वीजग्राहकांशी संबंधित प्रश्न थेट लोकउत्सवाच्या व्यासपीठावर आणल्यामुळे उपस्थितांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले.

**बडग्यावर नेमके काय लिहिले होते?**

या बडग्यावर स्मार्ट मीटर हटाव, जनता को बचाओ आणि लोगों की जेब काटना बंद करो असे हिंदीतील फलक लावण्यात आले होते. स्मार्ट मीटर हटवून जनतेला वाचवा तसेच लोकांच्या खिशाला कात्री लावणे बंद करा, असा त्याचा आशय होता. या घोषणांमधून स्मार्ट मीटरबाबत जनतेच्या मनात असलेली नाराजी आणि आर्थिक भाराची भीती अधोरेखित करण्याचा प्रयत्न झाला.

**स्मार्ट मीटरला विरोध का दर्शवण्यात आला?-** स्मार्ट मीटरमुळे वीजदेयकात वाढ होईल, वीजवापर आणि देयकांवर ग्राहकांचे नियंत्रण राहणार नाही, अशी भीती काही नागरिकांकडून व्यक्त केली जाते. या पार्श्वभूमीवर मारबत मिरवणुकीतील बडग्याच्या माध्यमातून स्मार्ट मीटरचा प्रश्न सार्वजनिक चर्चेत आणण्यात आला. मात्र, बडग्यावरील आरोपांबाबत वीज वितरण कंपनीची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही.

**मारबत उत्सवात असे बडगे का काढले जातात?**मारबत हा नागपूरच्या लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. अनिष्ट प्रथा, सामाजिक समस्या, भ्रष्टाचार, महागाई आणि नागरिकांवर परिणाम करणा-या निर्णयांविरोधात बडग्यांच्या माध्यमातून भाष्य करण्याची परंपरा आहे. त्यामुळे बडग्या हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून, जनतेच्या नाराजीला वाट मोकळी करून देणारे प्रभावी माध्यमही मानले जाते.

**या बडग्यातून कोणता संदेश देण्यात आला?** स्मार्ट मीटरचा निर्णय राबविताना ग्राहकांच्या शंका दूर कराव्यात, वीजदेयकाची पद्धत पारदर्शक ठेवावी आणि नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याची हमी द्यावी, असा अप्रत्यक्ष संदेश या बडग्यातून देण्यात आला. मारबतच्या गर्दीत दिसलेला हा बडग्या विसर्जित झाला असला, तरी त्याने उपस्थित केलेला स्मार्ट मीटरचा प्रश्न मात्र चर्चेत राहिला.

## शेतक-यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतक-यांची आधार प्रमाणीकरणासाठीची दुसरी यादी आज प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत एकूण ३ लाख ५५ हजार ६१४ शेतक-यांचा समावेश आहे. पात्र शेतक-यांनी यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, ही यादी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय प्रसिद्ध करण्यात आली असून, ती संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्येही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १२ लाख ५८ हजार शेतक-यांच्या कर्ज खात्यांवर १० हजार ११४ कोटी ९० लाख रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामध्ये ७ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख २२ हजार शेतक-यांना ५ हजार २८ कोटी ६० लाख रुपये, तर २४ ऑगस्ट २०२६ रोजी ६ लाख ३६ हजार शेतक-यांना ५ हजार ८६ कोटी ३० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. दुस-या यादीतील शेतक-यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकीची रक्कम तपासून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रामध्ये जाउन आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतक-यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

# दिव्यांगांना यूडीआयडी प्रमाणपत्रासाठी ग्राम, वार्डस्तरावर अभियान राबवा- उपसभापती अहिर



**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र (यूडीआयडी) विनासायास आणि मुदतीत उपलब्ध करून देण्यासाठी ग्राम व वार्डस्तरापर्यंत विशेष अभियान राबवावे. अंगणवाडी सेविका तसेच आशा वर्कर यांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या घरी भेटी देउन त्यांची माहिती संकलित करावी आणि पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. राज्यातील दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे बैठक झाली. या बैठकीस आमदार बच्चू कडू, दिव्यांग विभागाचे सचिव माणिक गुरसाळ, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, दिव्यांग सक्षमीकरणाचे आयुक्त सत्यजीत बडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपसभापती अहिर म्हणाले, दिव्यांग बांधवांना मुदतीत दिव्यांग प्रमाणपत्र मिळणे हा त्यांचा नैसर्गिक हक्क आहे. त्यामुळे आरोग्य विभाग आणि

**घरोघरी जाउन पात्र दिव्यांगांची माहिती संकलन करण्याचे निर्देश**

नगरपालिका, महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांच्या मागणीच्या याद्या तातडीने निकाली काढाव्यात. ग्रामविकास विभागाने ग्रामपंचायत स्तरावर दिव्यांग सक्षमीकरणासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती संकलित करून त्याचा आढावा घ्यावा. प्रत्येक विभागाने दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या पाच टक्के निधीचा प्रभावीपणे विनियोग करण्याची कार्यवाही करावी, असेही अहिर यांनी सांगितले. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना तत्काळ मिळेल, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी. जिल्हाधिका-यांनी आपल्या जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्राबाबत प्राप्त तक्रारी तसेच संशयास्पद प्रमाणपत्रांची तपासणी करावी. दिव्यांगांसाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करावी. दिव्यांग कल्याण विभागाने दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजनेचा प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत अंत्योदय योजनेचा लाभ, दिव्यांगांसाठी कर्जमाफी योजना, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन उभारणे, दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांसाठीच्या २०१६ च्या कायद्यानुसार राज्य निधी स्थापन करणे, रेल्वेतील दिव्यांगांसाठी राखीव डब्यांमध्ये अन्य प्रवाशांचा होणारा प्रवास रोखणे तसेच दिव्यांगांना दर्जेदार सहाय्यभूत साहित्य उपलब्ध करून देणे आदी विषयांचा आढावा घेण्यात आला.

परभणी आणि अकोला जिल्ह्यात दिव्यांग बांधवांचा सर्वे करून त्यांना दिव्यांग प्रमाणपत्राचे (यूडीआयडी) वितरण करण्याचे चांगले काम झाले आहे. याच धर्तीवर इतर जिल्ह्यांतही या प्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा आमदार बच्चू कडू यांनी व्यक्त केली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रेल्वेचा विस्तार

**भा**रतीय रेल्वेच्या सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांवरील कोंडी कमी करण्यासाठी केंद्राने मोठ्या क्षमतावाढीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. दिल्ली-हावडा, मुंबई-हावडा, दिल्ली-मुंबई, दिल्ली-गुवाहाटी, दिल्ली-चेन्नई, हावडा-चेन्नई आणि मुंबई-चेन्नई या ७ 'हाय डेन्सिटी नेटवर्क' कॉरिडॉरचे टप्प्याटप्प्याने चौपदरीकरण केले जाणार आहे. सुमारे ११ हजार किलोमीटरचे हे मार्ग देशातील जवळपास ४० टक्के रेल्वे वाहतूक हाताळतात. त्यातील २ हजार किलोमीटरचे चौपदरीकरण झाले असून, सुमारे ५ हजार किलोमीटरच्या कामांना मंजुरी मिळाली आहे; उर्वरित ४ हजार किलोमीटरसाठी पुढील प्रक्रिया सुरू आहे. याच मालिकेत दक्षिण भारतातील ५ मल्टिट्रॅकिंग प्रकल्पांसाठी १०,०२१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीने या निर्णयाचे महत्त्व मोठे आहे. कारण, मुंबई-हावडा आणि मुंबई-चेन्नई हे दोन प्रमुख मार्ग राज्यातून जातात. तसेच दिल्ली-चेन्नई मार्गावर नागपूर-बल्लारशाह ही महत्त्वाची केंद्रे येतात, तर दिल्ली-मुंबई मार्ग मुंबईला उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक पट्ट्यांशी जोडतो. त्यामुळे हा विषय महाराष्ट्रातील उद्योग, बंदरे आणि मालवाहतुकीच्या पुढील विस्ताराशी निगडित आहे.एकाच मार्गावर मेल-एक्स्प्रेस, लांब पल्ल्याच्या प्रवासी गाड्या, मालगाड्या चालतात; मुंबईत त्यात उपनगरी वाहतुकीचीही भर पडते. वेगवेगळ्या गतीच्या गाड्या एकाच मार्गावर आल्यावर नियोजन गुंतागुंतीचे होते. वेगवान प्रवासी गाडीला वाट देण्यासाठी मालगाडी बाजूला घ्यावी लागते. एखादी गाडी उशिरा धावू लागली की पुढील अनेक गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका ही वाढत्या वाहतुकीची गरज बनते. महाराष्ट्राला या विस्ताराचा लाभ वेगवेगळ्या दिशांनी मिळू शकतो. मुंबई-हावडा मार्ग कल्याण, भुसावळ आणि नागपूरमार्गे पुढे रायपूर, बिलासपूर, टाटानगर आणि हावड्यापर्यंत जातो. पश्चिम किनाऱ्यावरील आर्थिक केंद्राला मध्य आणि पूर्व भारताशी जोडणारा हा महत्त्वाचा रेल्वेमार्ग आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने त्यात मुंबईबरोबर भुसावळ आणि नागपूरचे स्थान महत्त्वाचे ठरते. उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे वाहतुकीचे प्रमुख केंद्र असलेल्या भुसावळमधून देशाच्या उत्तर, मध्य आणि पूर्व भागाकडे जाणाऱ्या मार्गांचे जाळे सुरू होते. नागपूर तर दिल्ली-चेन्नई आणि मुंबई-हावडा अशा २ महत्त्वाच्या राष्ट्रीय मार्गांच्या मध्यावर येते. त्यामुळे या मार्गांची क्षमता वाढणे हे विदर्भासाठीही आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.नागपूरला देशाचे 'लॉजिस्टिक्स हब' करण्याची चर्चा अनेक वर्षांपासून आहे. देशाच्या मध्यभागी असलेले भौगोलिक स्थान ही त्याची जमेची बाजू; पण त्याहीपेक्षा माल किती वेगाने पोहोचतो, पुढच्या गाडीत किती लवकर चढतो आणि तो पोहोचण्याची वेळ किती खात्रीशीर आहे, यावर लॉजिस्टिक्स केंद्राचे अर्थकारण ठरते. रेल्वेची क्षमता वाढवल्यास विदर्भातील खनिज, कृषी आणि औद्योगिक उत्पादनाच्या वाहतुकीला त्याचा उपयोग होईल. परिसरातील औद्योगिक व गोदाम सुविधांनाही राष्ट्रीय बाजारपेठांशी अधिक चांगली जोडणी मिळू शकते. मुंबई-चेन्नई मार्गाचा विचार करता पुण्याचे महत्त्व पुढे येते. पुण्यात विविध उत्पादन उद्योगांची मोठी साखळी आहे. पुण्यातून दक्षिण भारतात माल वाहतुकीसाठी रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्व मोठे आहे. पुणे-सोलापूरमार्गे दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढली तर नियमित आणि मोठ्या प्रमाणातील मालासाठी अधिक व्यवहार्य पर्याय उपलब्ध होईल. उद्योगाला किफायतशीर वाहतुकीचा पर्याय मिळणे स्पर्धात्मकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. रेल्वे अर्थकारणात बंदरांचाही विचार महत्त्वाचा ठरतो.जवाहरलाल नेहरू बंदर हे देशातील प्रमुख कंटेनर बंदरांपैकी एक आहे. दादरी ते जवाहरलाल नेहरू बंदर हा १,५०६ किलोमीटरचा पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्ग आता पूर्ण क्षमतेने उपलब्ध झाला. लुधियाना-सोननगर या १,३३७ किलोमीटरच्या पूर्व मार्गासह देशातील समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचे जाळे २,८४३ किलोमीटर झाले. मालगाड्यांना स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून देण्यामागे मुख्य प्रवासी मार्गांवरील ताण कमी करण्याचा उद्देश आहे. त्याच काळात अतिव्यस्त प्रवासी-मालवाहतूक मार्गांवर अतिरिक्त मार्गिका तयार झाल्या, तर दोन्ही गुंतवणुकींचा एकत्रित परिणाम अधिक मोठा होऊ शकतो. बंदरापासून कारखान्यापर्यंतच्या प्रवासात वेगापेक्षा कालमर्यादा महत्त्वाची असते. माल किती तासांमध्ये पोहोचणार याची खात्रीच नसेल तर उद्योगाला अतिरिक्त साठा ठेवावा लागतो. त्यातून गोदामाचा खर्च वाढतो, कंटेनर जास्त काळ अडकतो आणि पर्यायाने खेळत्या भांडवलावर ताण येतो. त्यामुळे वाहतुकीची अनिश्चितता कमी झाल्यास उद्योगांच्या खर्चात कपात होऊन नफा वाढण्यास मदत होईल.भारतीय रेल्वेचा मालवाहतुकीचा आलेख चढता आहे. २०१४-१५ मध्ये ती १,०९८ दशलक्ष टन होती. २०२१-२२ मध्ये ती १,४१८ दशलक्ष टन; २०२३-२४ मध्ये १,५९१ दशलक्ष टन आणि २०२५-२६ मध्ये १,६७० दशलक्ष टन झाली. अर्थव्यवस्थेच्या विस्ताराबरोबर कोळसा, पोलाद, सिमेंट, वाहने, पेट्रोलियम पदार्थ, धान्य, खते, कंटेनर यांची वाहतूक वाढेल. त्यासाठी जुन्याच रेल्वेमार्गावर अधिकाधिक गाड्या चालविण्याला मर्यादा आहेत. त्यामुळे स्वतंत्र मालवाहतूक मार्ग आणि अतिव्यस्त मार्गांचे चौपदरीकरण ही पूरक पावले आहेत. रेल्वेकडे अधिक माल वळविण्यामागे पर्यावरणीय आणि ऊर्जाविषयक कारणेही आहेत. लांब पल्ल्याच्या मालवाहतुकीत रेल्वेचा वापर वाढला तर महामार्गांवरील अवजड वाहनांचा ताण आणि इंधनाचा वापर कमी होईल. परंतु, यासाठी कारखान्यापासून रेल्वे टर्मिनलपर्यंत आणि गंतव्य स्थानकापासून अंतिम ग्राहकापर्यंतची वाहतूक सुटसुटीत आणि विनाअडथळा असायला हवी. माल चढविणे-उतरविणे ही प्रक्रियाही गतिमान असणे गरजेचे आहे.रेल्वेचे दर स्पर्धात्मक आणि वेळापत्रक विश्वासार्ह हवे. 'फर्स्ट माईल' आणि 'लास्ट माईल'मधील अडथळे कायम राहिले तर मुख्य मार्गावरची अब्जावधी रुपयांची गुंतवणूक पूर्ण क्षमतेने वापरली जाणार नाही. या क्षमतावाढीने प्रवाशांनाही फायदा होईल. समर्पित मालवाहतूक मार्गावर अधिक मालगाड्या गेल्याने पारंपरिक रेल्वे जाळ्यावर अतिरिक्त क्षमता उपलब्ध होईल. अतिव्यस्त मार्गांवर तिसरी आणि चौथी मार्गिका उपलब्ध झाल्यास अधिक प्रवासी गाड्या चालविणे, वेळपालन सुधारणे आणि देखभाल-दुरुस्ती काळात पर्यायी मार्गिका वापरणे शक्य होते. महाराष्ट्रातील मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक-भुसावळ, मुंबई-नागपूर आणि पुणे-दक्षिण भारत या दिशांतील वाढती मागणी पाहता ही क्षमता पुढील अनेक वर्षांसाठी उपयोगाची ठरेल. रेल्वेमार्गांची क्षमता वाढत असताना महाराष्ट्र त्याच्या मध्यवर्तीस्थानी आहे. या संधीचे रूपांतर उद्योग, व्यापार आणि रोजगाराच्या वाढीत करता आले, तर राज्याच्या पुढील आर्थिक विस्ताराचा तो एक महत्त्वाचा आधार ठरेल.

# मोदीजींचा रॉकस्टार स्टाइल कार्यक्रम आणि ते इंग्रजी गीत !

**मो**दीजी सतत नवनवीन प्रयोग करत असतात. जेन झी, युवा पिढी दूर जात आहे हे पाहिल्यावर त्यांनी त्वरित कृती कार्यक्रम सुरु केला. दिल्लीतील श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स मधील युवा मंडळींशी संवाद साधला. 'नाराज फुफा', 'होमिओपॅथी गोली', 'दिमागी नक्षल' असे बरेच काही त्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसमोर बोलले.

आता तर बडोद्याच्या युवाबरोबर मोठा कार्यक्रम केला.त्यांच्यासोबत जास्त जवळीक निर्माण व्हावी म्हणून मॉडेल्स जसे रँपवॉक वा कॅटवॉक करतात त्याच स्टाइल मध्ये मोदीजींचे व्यासपीठ सजवले गेले होते. 'बुक माय शो' या रिलायंस ची मालकी असलेल्या कंपनीने पासेसची व्यवस्था केली होती. थोडक्यात नेहमीच्या राजकीय कार्यक्रमापेक्षा वेगळंच काहीतरी होते. तरुण पिढीला लुभावणाऱ्या उडत्या चालीची गाणी वाजवली जात होती. त्यामध्ये We will rock you या एका इंग्रजी गाण्याचे म्युझिक होते. दुसरे गाणे धुरंदर मधील प्रचंड लोकप्रिय झालेले 'आरी...आरी' होते. नंतरचे गाणे मोदीजींवर लिहिलेले गीत होते. आणि शेवटी एक गरब्याच्या चालीवर असलेले गुजराती गीत होते. ती गाणी ऐकून तरुणांमध्ये प्रचंड जोश निर्माण होत होता.




विरोधक टीका करत होते. मोदीजींमध्ये आता तेवढी एनर्जी राहिली नाही असे म्हणत होते. दिल्लीमध्ये इतक्या विद्यार्थ्यांना केवळ चांगल्या हॉस्टेलची सोय नसल्यामुळे आपला जीव गमवावा लागला, पण मोदीजी संवेदना दाखवत नाहीत. उलट असे कार्यक्रम घेत आहेत, अशीही टीका झाली. काहींनी तर सांगितले की मोदीजी राहुल गांधींची कॉपी करत आहेत. पण मोदीजींची 'रिस्क टेकिंग कपॅसिटी' खूप असल्यामुळे त्यांच्यावर काही फरक पडत नाही. ते त्यांच्या पद्धतीने काम करत असतात.

सगळे काही अतिशय प्रोफेशनल पद्धतीने होत होते. कार्पोरेट स्टाइल. मोदिजींच्या कार्यक्रमात खास वापरलेले ते इंग्रजी गाणे आवर्जून ऐकले. आणि धक्काच बसला. कदाचित संयोजकांनी त्या गाण्याचे बोल ऐकले नसावे, असे वाटायला लागले. मी ते गाणे परत परत ऐकले. त्यामध्ये तीन कडवे आहेत. पहिले दोन कडवे लहान मुलगा आणि तरुणांना उद्देशून आहे. खरी गम्मत तिसऱ्या कडव्यातच आहे. ते नेमके कुणाला उद्देशून म्हंटले असावे? संयोजकांनी हेच गीत का निवडले असावे? असे अनेक प्रश्न निर्माण झाले. तुमच्यासाठी त्या गाण्याचे तिसरे कडवे टाकत आहे.

Buddy, you're an old man, poor man
Pleading with your eyes, gonna make you some peace someday
You got mud on your face, big disgrace
Somebody better put you back into your place

आपल्याला या गाण्याची निवड पटली नाही. मोदीजींमध्ये 'रिस्क टेकिंग कपॅसिटी' खूप आहे म्हणून ठीक आहे. लोकही त्यांच्यावर प्रचंड प्रेम करतात म्हणून ठीक आहे. पण हे गाणे कुणी निवडले असावे?आणि का?

**-दिलीप लाठी**

# शेतकऱ्यांचा संघर्ष -वर्तमान आणि भविष्यातील आव्हाने



**'शे**तकऱ्यांसाठी वर्तमान भयानक आहे व सरकारने शेतकरी विरोधी धोरणे बदलली नाही तर शेतकऱ्यांसाठी व देशासाठी भविष्यकाळ महाभयानक राहील' हे विधान केवळ एक इशारा नसून आजच्या कृषी क्षेत्रातील वास्तव आणि गंभीर परिस्थितीचे प्रतिनिधित्व करते. भारत हा कृषिप्रधान देश मानला जातो, जिथे बहुतांश जनता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. परंतु, आज तोच शेतकरी विविध संकटांच्या दुष्टचक्रात अडकला आहे.

**शेतकऱ्यांची वर्तमानकालीन गंभीर परिस्थिती**

हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्ती अनिश्चित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि कडक उन्हामुळे पिकांचे प्रचंड नुकसान होते. हवामानातील बदलांमुळे शेती जुगार बनली आहे. उत्पादन खर्चात मोठी वाढ: बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल आणि मजुरीचे दर गगनाला भिडले आहेत. यामुळे शेतीतील गुंतवणुकीचा खर्च कमालीचा वाढला आहे.

**योग्य हमीभावाचा अभाव**

उत्पादित मालाला बाजारात योग्य व रास्त भाव मिळत नाही. व्यापाऱ्यांची मध्यस्थी आणि बाजार समितीतील गैरव्यवहार यांमुळे शेतकऱ्याच्या हाती नगण्य नफा उरतो.कर्जाचा डोंगर आणि आत्महत्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाल्यामुळे शेतकरी सावकार आणि बँकांच्या कर्जाच्या जाळ्यात अडकतो. न फेडता येणाऱ्या कर्जाच्या आणि नैराश्याच्या भाराखाली अनेक शेतकरी आत्महत्येकडे वळतात.

**सरकारी धोरणे आणि त्यांची भूमिका**

शेतकऱ्यांच्या या दुरवस्थेला अनेकदा कृषी धोरणांमधील त्रुटी आणि शेतकरीविरोधी वाटणारे निर्णय कारणीभूत ठरतात.आयात-निर्यात धोरणे पिकांचे भाव थोडे वाढले की लगेच परदेशातून आयात वाढवली जाते किंवा निर्यातीवर बंदी घातली जाते. यामुळे शेतकऱ्यांना वाढीव भावाचा फायदा मिळत नाही.

**विमा योजनांमधील अकार्यक्षमता**

पीक विमा योजनांचा लाभ योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. प्रक्रिया गुंतागुंतीची असल्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहतात.

**पायाभूत सुविधांची कमतरता**

साठवणुकीची गोदामे, शीतगृहे (Cold Storage), आणि थेट बाजारपेठेची सोय नसल्यामुळे माल खराब होतो आणि शेतकऱ्यांना तुटपुंज्या भावात तो विकावा लागतो.

**भविष्यातील धोके: देशावर होणारा परिणाम**

जर ही परिस्थिती बदलली नाही, तर त्याचा फटका केवळ शेतकऱ्यालाच नाही, तर संपूर्ण देशाला बसणार आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न सततच्या घाट्यामुळे नव्या पिढीचा शेतीवरील विश्वास उडाला आहे. तरुण वर्ग शेती सोडून शहरांकडे स्थलांतरित होत आहे. यामुळे भविष्यात अन्नधान्याची मोठी टंचाई निर्माण होऊ शकते.

**आर्थिक मंदी आणि महागाई**

शेतकरी हा मोठा ग्राहक वर्ग आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न घटल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडेल, ज्याचा थेट परिणाम देशाच्या एकूण जीडीपीवर (GDP) होईल. अन्नधान्य टंचाईमुळे महागाई अनियंत्रित होईल.सामाजिक असंतोष शेतकरी आणि ग्रामीण भागातील वाढती गरिबी, बेरोजगारी आणि असमानता यांमुळे देशात सामाजिक आणि राजकीय असंतोष वाढीस लागेल.

**सुधारणेसाठी आवश्यक उपाययोजना**

हमीभाव आणि बाजारपेठ: सर्व पिकांना स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींनुसार उत्पादन खर्चावर आधारित योग्य हमीभाव (MSP) मिळायला हवा.

तंत्रज्ञान आणि सिंचन सोयी जलसंधारणाची कामे, आधुनिक सिंचन पद्धती (ठिबक, तुषार) आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतीवरील हवामानाचा प्रभाव कमी करणे.

थेट बाजारपेठ आणि प्रक्रिया उद्योग: मध्यस्थांची साखळी तोडून शेतकऱ्याला थेट ग्राहकांशी जोडणे आणि ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणे.

धोरणात्मक स्थिरता आयात-निर्यात धोरणे शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून दीर्घकालीन आणि स्थिर असावीत.

शेती आणि शेतकरी हे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया असतात. शेतकऱ्यांचा वर्तमान सुरक्षित केल्याशिवाय देशाचे भविष्य उज्ज्वल असू शकत नाही. सरकारने वेळीच आपली धोरणे शेतकरीहितैषी बनवून ठोस पावले उचलली नाहीत, तर येणारा काळ संपूर्ण देशासाठी अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक ठरेल.

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य,
शेतकरी संघटना, अकोला
मो नं ७०२०५८५२६१

# इस्त्रो:खाजगी कंपन्यांकडे सुपूर्द करणार?

**ने**हरूव्हियन मॉडेलमधील सार्वजनिक उपक्रमांच्या शृंखलेलतील शेवटच्या मूल्यवान कडीवर डल्ला मारण्याची तयारी!अनेक दशके सार्वजनिक स्त्रोत,केंद्र सरकारने उचललेली जोखीम आणि हजारो प्रोफेशनल्स/कामगार/कर्मचाऱ्यांनी उभ्या केलेल्या सार्वजनिक उपक्रमाच्या भल्या थोरल्या वृक्षावर, बाडांगुळासारखे वाढणारे भारतातील खाजगी कॉर्पोरेट उपक्रम.



खाजगी क्षेत्राला परवानगी मिळालेल्या औद्योगिक/बँकिंग क्षेत्रात खाजगी क्षेत्राने शून्यापासून सुरुवात करून जोखीम भांडवल घालून, स्वतःच्या प्रोफेशनल्सच्या नव्या टीम उभारून जरूर धंदा करून दाखववा.पण इतिहास साक्ष आहे.खाजगी मोठ्या कंपन्या एकतर सार्वजनिक उपक्रमांना,राजकीय/ धोरणात्मक निर्णयांवर पकड बसवून कमकुवत करतात (उदा बीएसएनएल)आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनुभवी प्रोफेशनल्स/तंत्रज्ञ आयते मिळवतात गेल्या दोन तीन दशकातील अनेक उदाहरणे देता येतील.इस्त्रो त्यातील अजून एक.

भारत सरकारच्या मालकीच्या इसरोने यशाचे अनेक मैलाचे गाठले आहेत.चांद्रयान,गगन यान मोहिमा,एकाचवेळी अनेक उपग्रह अवकाशात सोडणे इत्यादी. त्याच्या बातम्या अधूनमधून आपण वाचत असतो. या सगळ्या यशांमुळे इसरोने भारताला जागतिक अंतराळ संशोधनाच्या नकाशावर मनाचे पान मिळवून दिले आहे. भारतीय नागरिकांना अभिमान वाटावा असे जे सार्वजनिक उपक्रम आहेत त्यात इस्त्रोचे स्थान खूप वरचे आहे.

पण गेले महिनाभर इसरो वेगळ्याच कारणांमुळे बातम्यात आहे. काही दिवसांपूर्वी इसरो मधील जवळपास १०० तंत्रज्ञ/शास्त्रज्ञांनी इसरोचा काही दिवसात राजीनामा दिल्याची बातमी होती. नंतर बातमी आली, इसरो गेली अनेक दशके स्वतः करत असलेल्या ॲक्टिव्हिटी थांबवून त्या आता खाजगी कंपन्यांकडे सुपूर्द करणार आहे. आता बातमी आहे इसरो मधील स्वतःच्या/इस्त्रोच्या भवितव्याबद्दल कर्मचारी संघटनामध्ये अस्वस्थता आहे.

ज्या वेळी नॉन रुटीन बातम्या एकामागोमाग एक येऊन आदळतात त्यातून एक पॅटर्न तयार होऊ लागतो, तो योगायोग कधीच नसतो. अंतराळ क्षेत्रात गेली काही वर्षे धोरणात्मक बदल होत गेले. त्याची पार्श्वभूमी अलीकडच्या घटनांना आहे. नजीकच्या काळात देशातील राज्यकर्त्यांच्या जवळ असणारा एखादा उद्योग समूह अंतराळ क्षेत्रात येण्याची बातमी येणार हे नक्की अंतराळ संशोधनासारख्या प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रात तरुण संशोधकांना सामावून घेणे, त्यासाठी धोरणात्मक फ्रेम,भांडवल पुरवठा होईल हे बघणे हे गरजेचे आहे. तरुण तंत्रज्ञांनी सुरु केलेले खाजगी मालकीचे स्टार्ट अप्स आणि मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांनी त्या क्षेत्रात प्रवेश करणे यात फरक आहे.स्टार्ट अप्स इस्त्रोला पूरक भूमिका वठवू शकतात. राजकीय वरदहस्त असणारी महाकाय कॉर्पोरेट भविष्यात इस्त्रोच्याच जीवावर उठणार हे नक्की.

दुसरा मुद्दा आहे अंतराळ क्षेत्रातील देशाच्या सार्वभौमत्वाचा, तिसरा देशाच्या सुरक्षेचा. विशेषतः डेटा सुरक्षेचा. चौथा मुद्दा आहे इस्त्रो कडून हस्तांतरित होणाऱ्या तंत्रज्ञानाबद्दल, जे अनेक दशकांच्या लाखो मानवी तास आणि भांडवल घालून विकसित केले गेले आहे. ते कोणाला, किती किमतीला,कोणत्या अटींवर दिले जाणार याबद्दल पारदर्शकता नाही असे इस्त्रोच्या कर्मचारी संघटना म्हणत आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या आयपीआर बद्दल,पेटंट बद्दल, दुसऱ्या कंपनीला तंत्रज्ञान विकताना स्वतःच्या व्यापारी आणि स्ट्रॅटेजिक हिताला प्रचंड महत्व देतात. इस्त्रोला तसे वागू दिले जाईल का ? उत्तर आहे.

स्वातंत्र्यनंतर अनेक सार्वजनिक उपक्रमांनी विविध क्षेत्रात तंत्रज्ञ, विशेषज्ञ तयार करून राष्ट्र उभारणीत हातभार लावला. आणि ज्या ज्यावेळी ही क्षेत्रे एक एक करून खासगी गुंतवणूकदारांसाठी मोकळी केली त्या त्या वेळी या खासगी कंपन्यांनी त्यांना लागणारी तंत्रज्ञ/प्रोफेशनल्स मंडळी सार्वजनिक उपक्रमातून उचलली.तेल व नैसर्गिक वायू,रेल्वे, बंदरे, विमानतळ, विमान वाहतूक, वीज निर्मिती व वितरण, दूरसंचार, संरक्षण साहित्य, रस्ते बांधणी, बँका, विमा कंपन्या, सरकारी इस्पितळे केवढी मोठी यादी आहे.

राष्ट्र अर्थ बलवान करायचे असेल तर या गाभ्यातील गोष्टी त्या राष्ट्राच्या हक्काच्या असावयास लागतात. देशहित, सार्वजनिक हित उराशी बाळगणारे प्रोफेशनल केडर तयार करावे लागते. सार्वजनिक उपक्रमांनी या साऱ्यात पायाभूत काम केले आहे; ज्याची रुपयातील किंमत काढताच येणारी नाही.

**-संजीव चांदोरकर**

# एआयच्या जगातील स्पर्धा

**ए**आय जणू जीवनरेषा आहे. असे जे काही वातावरण तयार केले जाते आहे त्याच्या बरोबर उलट या क्षेत्रातील महत्वाची माणसे बोलत आहे. मग ते युवल नोवॉ हरारी असोत, बिल गेट्स असोत नाहीतर जेकब coxon असो किंवा इतर व्हिसलब्लोअर्स असोत.. एआय चे मार्केटिंग अशा पद्धतीने जगभर सुरू आहे की, एआय शिवाय आयुष्य जगणे शक्य नाही असेच वातावरण निर्माण केले जाते आहे.शाळा कॉलेजात काम करताना तर हे प्रकर्षाने जाणवते. मुलांना त्यातले धोके कुणीही सांगत नाही. जसे ते धोके पर्यावरणीय आहेत तसेच ते माणसांच्या मूलभूत कौशल्याशी निगडित आहेत. बिल गेट्स यांनी नेट निगेटिव्ह असा शब्द वापरला आहे. कालपर्यंत नेट positive ची चर्चा होती आणि काही प्रमाणात का होईना लोकांना वाटत होते हे सगळे आपल्या फायद्यासाठी सुरू आहे. पण खरंच तसे आहे का?



जे सुरू आहे, एआयच्या जगात जी स्पर्धा लागली आहे, ती सगळ्यात धोकादायक आहे. अतीप्रगत आणि बुद्धिमान एआयच्या जगात आता एकच गोष्ट शिल्लक राहिली आहे ती म्हणजे चेतना. Conciousness.एआयमध्ये ज्या क्षणी चेतना निर्माण करण्यात यश येईल..ज्याला यश येईल तो ही रेस जिंकला. पण तोवर झालेला आणि त्यानंतर होणारा विनाश रोखणार कसा? अशावेळी, डिजिटल well-being चेच दोर घट्ट पकडून ठेवावे लागतील. तरच यातून थोडीफार सुटका शक्य आहे.पुढे जाताना मागचे दोर कापून चालणार नाही. या सगळ्या गदारोळात आपण युजर्स पाल्यापाचोळ्या सारखे फरपटत जातो आहोत, जाणार आहोत..मग कधी ट्रेंड्स च्या नावाखाली तर कधी बेरोजगारीच्या नावाखाली..भारतात एआय ला ट्रेन करण्याचे काम अनेक कामगार करतात. उद्या हेच ट्रेन झालेले एआय या लोकांचे काम काढून घेणार आहेत. हे एआयला ट्रेन करणाऱ्याला माहित नसते असे नाही पण जगण्याची आजची धडपड इतकी तीव्र आहे की आजचा दिवस पैसा मिळवणे, जगणे महत्त्वाचे आहे.. उद्याचे काय होईल याची काळजी करायला निम्म्याहून अधिक लोकांना वेळच नाही. हाच तो विनाशकाल आहे.

**-मुक्ता चैतन्य**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# आकाश पाळण्यात महिलेच्या डोक्याची चामडी निघाली!

## तांन्हा पोळ्याच्या यात्रेत सुरक्षेचा बोजवारा, पाळण्याच्या बेरिंगमध्ये केस अडकल्याने गंभीर जखमी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. ११ :** मनीष ढाले फुलसावंगी येथील पुणेश्वर मंदिराच्या पायथ्याशी तांन्हा पोळ्यानिमित्त आयोजित यात्रेत गुरुवारी दुपारी आकाश पाळण्यात घडलेल्या भीषण दुर्घटनेने एकच खळबळ उडाली. आकाश पाळण्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, यात्रेतील मनोरंजनाच्या साधनांची तपासणी नेमकी झाली होती का, असा सवाल उपस्थित होत आहे.

पुणेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी तसेच यात्रेचा आनंद घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. विशेषतः महिलांची मोठी गर्दी होती. दरम्यान, दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास फुलसावंगी येथील बाली मारोती टाळीकोटे (वय २५) या आकाश पाळण्यात बसल्या असताना अचानक त्यांचे केस पाळण्याच्या बेरिंग मध्ये अडकले. पाळणा सुरू असल्याने काही क्षणांतच केस जोराने ओढले गेले. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्यावरील केसांसह चामडी निघाल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे यात्रास्थळी उपस्थित भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच उपस्थित सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंभुरे व जमादार सुहास कायटे यांनी नागरिकांच्या मदतीने तातडीने पाळणा थांबविला. जखमी महिलेला बाहेर काढून रुग्णवाहिकेने उपचारासाठी पुसद येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.यात्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असताना मनोरंजनाच्या साधनांच्या सुरक्षेची काटेकोर तपासणी होते का, हा प्रश्न या दुर्घटनेनंतर पुन्हा ऐरणीवर आला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने पाळण्यांसह सर्व मनोरंजन साधनांची सुरक्षा तपासणी करूनच त्यांना परवानगी द्यावी, अशी मागणी होत आहे.

# दोन दिवसांत चोरट्याचा पर्दाफाश बोलेरोसह तीन दुचाकी जप्त

## यवतमाळ शहर पोलिसांच्या डीबी पथकाची कारवाई, ६.५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. ११ :** शहरातील विशाल नगर परिसरातून बोलेरो कॅम्पर चोरीला गेल्याच्या घटनेचा यवतमाळ शहर पोलिसांच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने अवघ्या दोन दिवसांत छडा लावला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि आरोपीच्या हालचालींचा माग काढत पोलिसांनी संशयिताला यवतमाळातच सापळा रचून अटक केली. त्याच्याकडून चोरीची बोलेरो कॅम्परसह तीन दुचाकी असा सुमारे ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

विशालनगर, पिंपळगाव रोड येथील रहिवासी सुभाष प्रल्हादराव भुत यांच्या घरासमोर उभी असलेली बोलेरो कॅम्पर (एमएच ३१ ईएन १३३८) १ सप्टेंबरच्या रात्री ते २ सप्टेंबरच्या सकाळदरम्यान चोरीला गेली होती. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४४/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपीने चेहऱ्यावर कापड बांधून ओळख लपविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र डीबी पथकाने परिसरातील तसेच आरोपीच्या संभाव्य मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक तपासातून आरोपीची ओळख पटविण्यात आली. बोलेरो चोरीसाठी वापरलेली दुचाकी यवतमाळ परिसरात लपवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ती घेण्यासाठी आरोपी परतताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. आरोपीकडून बोलेरो कॅम्पर, सुपर स्प्लेंडर, ॲक्टिव्हा आणि हिरो होंडा स्प्लेंडर प्रो अशी वाहने जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एसडीपीओ अमोल कोळी व ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने केली.

## थोडक्यात



### तान्हा पोळ्यातून चिमुकल्यांचा समाजभानाचा जागर

**५१२ बालस्पर्धकांचा सहभाग,स्वच्छता, संविधान, महिला सुरक्षा अन् शेतकरी प्रश्नांवर देखाव्यांतून प्रबोधन**

**यवतमाळ :** परंपरेच्या उत्सवाला प्रबोधनाची धार देत आयोजित 'भव्य तान्हा पोळा उत्सव–२०२६' उत्साहात पार पडला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषदेचे गटनेता डॉ. नीरज वाघमारे यांच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमात तब्बल ५१२ बालस्पर्धकांनी सहभाग घेतला. चिमुकल्यांनी साकारलेल्या देखाव्यांतून स्वच्छता, संविधान, महिला सुरक्षा, शेतकरी आणि सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भाष्य करण्यात आले. कु. शिवन्या नाळे हिच्या स्वच्छता अभियानाच्या देखाव्याला प्रथम क्रमांक मिळाला. चर्विल ठमके याच्या बालिकेवरील अत्याचारविरोधी देखाव्याला द्वितीय, तर बालकिशन नाळे व गौरी नाळे यांच्या गाईच्या गोठ्याच्या देखाव्याला तृतीय क्रमांक मिळाला. शिवाजी महाराजांचा किल्ला, विठ्ठल, गोरक्षा, संविधान, भारतमाता, बळीराजा आणि जंतर-मंतर आदी विषयांचे देखावेही लक्षवेधी ठरले.
विशेष म्हणजे प्रत्येक सहभागी बालकाला भेटवस्तू व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे तान्हा पोळा केवळ परंपरा नव्हे, तर बालमनातून समाजजागृतीचा प्रभावी मंच ठरला.



### इंग्रजी आत्मविश्वासाला नवे व्यासपीठ..!

**दाते कॉलेजमध्ये 'इंग्लिश लँग्वेज क्लब' चा शुभारंभ**

**यवतमाळ :** विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्यासह आत्मविश्वास, सर्जनशील लेखन आणि संपादकीय क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने दाते महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात 'इंग्लिश लँग्वेज क्लब' व 'एडिटोरियल बोर्ड'चा शुभारंभ करण्यात आला. ९ सप्टेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागताने झाली. प्रा. डॉ. सचिन तेलखडे यांनी क्लबच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, कार्यक्षेत्र व आगामी उपक्रमांची माहिती दिली. उपप्राचार्य तथा इंग्रजी विभागप्रमुख डॉ. ताराचंद कंठाळे यांनी इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना साहित्यिक उपक्रम आणि प्रकाशना मध्ये सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू यांनी उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी क्लबचा प्रभावीपणे उपयोग करण्याचे आवाहन केले. क्लबच्या अध्यक्षा सानिया खरतडे हिने आगामी उपक्रमांची रूपरेषा मांडली. सूत्रसंचालन मोनिका कुमरे व रोहिणी बसवनाथे यांनी केले, तर प्रा. नलिनी आडे यांनी आभार मानले.

### जूगार अड्डयावर धाड, ६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त..

**महागाव पोलिसांची धडक कारवाई**

**महागाव :** महागाव तालुक्यातील दहिसावळी येथे पोलिसांनी धडक कारवाई करत जुगारावर धाड टाकून ६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई तपास अधिकारी तथा पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.
मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने संबंधित ठिकाणी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच घटनास्थळी असलेल्या व्यक्तींमध्ये एकच खळबळ उडाली.
या कारवाईदरम्यान पोलिसांनी ६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच चार आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईमुळे महागाव तालुक्यातील अवैध प्रकार करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. परिसरात अशा प्रकारच्या गैरकायदेशीर हालचालींना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.
या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक कार्यरत आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# शेतकऱ्यांच्या सणाच्या दिवशी अंदाज समितीचा दौरा..!

## ७४ ग्रामपंचायतींच्या समस्या मोजक्याच गावांपुरत्या?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**केळापूर, दि. ११ :** केळापूर तालुक्यात ७४ ग्रामपंचायती असताना महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचा दौरा मोजक्याच गावांपुरता मर्यादित राहिल्याने प्रशासनाच्या पाहणीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या सणाच्या दिवशी हा दौरा आयोजित करण्यात आल्याने शेतकरी व ग्रामस्थांना आपल्या समस्या मांडण्यासाठी कितपत संधी मिळाली, याबाबतही सवाल उपस्थित होत आहेत.

### दौरा जनतेच्या प्रश्नांचा आढावा की औपचारिकता

**७४ ग्रामपंचायतींचा तालुका, गावागावात समस्या आणि प्रशासनाकडे तक्रारी तरीही पाहणी मोजक्या गावांची हा दौरा जनतेच्या प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी की केवळ औपचारिकता? असा सवाल मनसेने उपस्थित केला असून, या प्रकरणाकडे प्रशासन व विधानमंडळ अंदाज समितीने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी केली आहे.**

तालुक्यातील अनेक गावांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, ग्रामपंचायत विकासकामे, निधीचा वापर, अपूर्ण तसेच निकृष्ट कामांसह विविध मूलभूत समस्या आहेत. या संदर्भातील तक्रारी पंचायत समिती प्रशासनाकडे उपलब्ध असतानाही संबंधित गावांमध्ये समितीने प्रत्यक्ष पाहणी का केली नाही, असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे केळापूर तालुकाध्यक्ष अश्विन मुरलीधर ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. तक्रारी गावागावात, समस्या गावागावात आणि तक्रारी प्रशासनाकडे उपलब्ध असताना अंदाज समितीची पाहणी मोजक्याच गावांपुरती का? असा थेट सवाल मनसेने केला आहे. शेतकऱ्यांच्या सणाच्या दिवशी दौरा आयोजित करण्याऐवजी शेतकरी व ग्रामस्थांना त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी पुरेसा वेळ आणि संधी देणे आवश्यक होते, अशी भूमिका मनसेने मांडली आहे. याबाबत अश्विन ठाकरे यांनी विधानमंडळ अंदाज समितीच्या अध्यक्षांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेट देऊन विकासकामे, निधीचा वापर तसेच पंचायत समितीकडे प्राप्त तक्रारींची वस्तुनिष्ठ पाहणी करण्याची मागणी केली आहे.

# पावसासाठी उमरखेडच्या ईदगाहवर आर्त साद..! नमाज-ए-इस्तिस्कातून अल्लाहकडे सामूहिक दुआ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ११ :** मागील दीड महिन्यापासून पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिके, पशुधन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर पावसासाठी अल्लाहकडे प्रार्थना करण्यासाठी शुक्रवारी उमरखेड येथील ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का अदा करण्यात आली. पावसाअभावी निर्माण झालेल्या संकटाची तीव्रता या सामूहिक प्रार्थनेतून अधोरेखित झाली.

शहरातील विविध मशिदींचे इमाम तसेच मोठ्या संख्येने मुस्लिम समाजबांधव या वेळी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक, वयोवृद्ध, तरुणांसह लहान मुलांनीही नमाजमध्ये सहभाग घेतला. नमाज अदा केल्यानंतर उपस्थितांनी पावसासाठी विशेष दुआ केली. हे अल्लाह! आम्हाला फायदेशीर, आरोग्यदायी, उपयुक्त आणि निरुपद्रवी पाऊस दे. तुझ्या सेवकांना व जनावरांना पाणी दे आणि कोरड्या पडलेल्या जमिनीला पुन्हा जीवन दे, अशी आर्त प्रार्थना करण्यात आली. नमाज-ए-इस्तिस्का ही पावसासाठी अल्लाहकडे विनंती करण्याची विशेष नमाज असून ती मोकळ्या मैदानात किंवा ईदगाहमध्ये अदा केली जाते. दोन रकअत नमाज, प्रवचन, पश्चात्ताप व क्षमायाचना यानंतर सामूहिक दुआ करण्यात आली. परिस्थितीत बदल आणि अल्लाहच्या रहमतीची अपेक्षा व्यक्त करण्यासाठी विशेष धार्मिक प्रथा पाळण्यात आल्या. पावसाअभावी शेतकरी, जनावरे आणि सर्वसामान्य नागरिकांवर ओढवणारे संकट टळावे, खरीप पिकांना जीवदान मिळावे आणि उमरखेडसह संपूर्ण राज्यावर रहमतीचा पाऊस बरसावा, यासाठी उपस्थितांनी मनोभावे प्रार्थना केली.

# आमदार तथा विधिमंडळ समितीचा दौरा हा शेतकऱ्यांसाठी सार्थक ठरेल का?

## शेतकरी संघटना व गोरसेना यांची निवेदनाद्वारे मागणी.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ११ :** यवतमाळ जिल्ह्यातील दौऱ्यावर आलेल्या विधिमंडळ अवलोकन अंदाज आमदार समितीच्या सदस्यांना पुसद येथील रेस्ट हाऊसवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मनीष जाधव यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी गाठून समिती सदस्यांना वेठीस धरून जिल्ह्यातील चालू खरीप हंगाम २०२६-२७ च्या पावसाच्या खंडामुळे जिल्ह्यातील प्रमुख पीक असलेली सोयाबीन आणि कापूस करपून गेल्याने संदर्भ विषयाला घेऊन पीक परिस्थितीबाबत अवगत करून दिले व तात्काळ जिल्ह्याला कोरडा दुष्काळ घोषित करून शेत पातळीवरील पीक नुकसानीचे पंचनामे गृहीत धरून सरसकट पिक विमा सहगतवर्षीचा पिक विमा देण्यात यावा अशी मागणी या वेळेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मनीष जाधव सह जिल्हा स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष प्रेमराव सरगर व जय राठोड गोर सेना जिल्हा अध्यक्ष व विकास राठोड काटखेडा, शेषराव राठोड फेट्रा माजी सरपंच धीरज पांडे पुसद,गौतम रणवीर , सुमेध कुलदीपके (काळी दौ.) योगेश राठोड, गणेश जाधव, विकास राठोड , गोर सेना मांजर जवळा यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्याच्या उपस्थितीने पोलीस प्रशासन सतर्क झाले होते कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याची त्यांनी दक्षता घेतली व आमदार सदाभाऊ खोत यांनी शेतकऱ्यांचा समस्या ऐकून घेतल्या व माळ पठारावरील पाणी प्रश्ना बद्दल व पिक विमा व जिल्ह्याला कोरडा दुष्काळ घोषित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून निरपेक्ष न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी आश्वासन दिले.या विधिमंडळ अंदाज समिती आमदाराच्या दौऱ्यामध्ये अचानक शेतकऱ्यांनी धडक दिल्याने उपस्थित अधिकाऱ्यांमध्ये व पोलीस प्रशासनामध्ये धास्ती निर्माण झाली होती मात्र कुठलाही अनुचित प्रकार न घडता समिती सदस्यांनी शेतकऱ्यांचं म्हणणं ऐकून घेतले यावेळी शिवसेनेच्या नेत्या मंदा मात्रेसह अनेक विधिमंडळ सदस्य या ताफ्यामध्ये समावेश होता , शेतकऱ्याने अतिशय आक्रमकपणे कोरड्या दुष्काळाच्या संदर्भाने मागणी करत प्रश्न मांडून विधिमंडळ अंदाज अवलोकन समितीच्या सदस्याला निवेदन दिले.

# निमणीच्या सरपंचांवर ग्रामस्थांचे गंभीर आरोप..! विकासनिधीच्या हिशोबाची चौकशी मागणी

## साडेतीन वर्षे गावात वास्तव्यास नसल्याचा दावा..! पदाच्या गैरवापराची चौकशी करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी-जामणी, दि. ११ :** तालुक्यातील गट ग्रामपंचायत निमणीच्या सरपंचांविरोधात ग्रामस्थांनी गंभीर तक्रारी करत ग्रामपंचायतीच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. सरपंच मागील साडेतीन वर्षांपासून गावात नियमित वास्तव्यास नसल्याचा आरोप असून, विकासकामांकडे दुर्लक्ष आणि ग्रामपंचायत निधीच्या वापराबाबतही संशय व्यक्त करण्यात आला आहे.

७ सप्टेंबर रोजी ग्रामस्थांनी गावातील विकासकामांबाबत सरपंचांकडे विचारणा केली. मात्र, समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. निमणी तसेच दरारा या दोन्ही गावांमध्ये रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा आणि अन्य मूलभूत सुविधांची अपेक्षित कामे झालेली नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीला १५ वा वित्त आयोग, मनरेगा, तांडा वस्ती, दलित वस्ती तसेच अन्य योजनांतून किती निधी प्राप्त झाला, त्यातून कोणती कामे मंजूर व पूर्ण झाली आणि किती खर्च झाला, याचा संपूर्ण हिशोब ग्रामसभे समोर मांडण्याची मागणी करण्यात आली आहे. निधीच्या वापरात गैरप्रकार किंवा अपहार आढळल्यास सरपंच, ग्रामसेवक तसेच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आहे. सरपंच पदासोबत रास्त भाव दुकानाच्या कामकाजात पदाचा गैरवापर झाला आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी आणि चौकशी अहवाल ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी रविंद्र सो. कुमरे, आलेश कुमार मडावी, आकाश गेडाम, सुधाकर कुडमंते, राहुल कुडमंते, उमेश कुमरे, देविदास मडावी, विजय कुडमंते व राजू कुडमंते यांनी केली आहे.

# कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी संकटात तातडीने पंचनामे व मदत द्यावी — मनसेची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ११ :** पुसद तालुक्यात पावसाअभावी अनेक भागांमध्ये पिकांची परिस्थिती गंभीर झाली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पुसद उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी करण्यात आली.

तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून पिकांचे पंचनामे करावेत, पीकविमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी कार्यवाही करावी तसेच शासनाकडून तातडीची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणी, उत्पादन घट आणि वाढते कर्ज यामुळे आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे प्रशासनाने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रवी सूर्य, तालुका संघटक सचिन राठोड, शहर अध्यक्ष आकाश रहाटे ,शहर उपाध्यक्ष कुणाल डहाळे, नितेश राठोड, निखिल टाळीकोटे आदी जन उपस्थित होते.

# काळी दौलत आरोग्य केंद्राचा कारभार रामभरोसे!

## वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी गायब, ४० गावांतील रुग्णांची हेळसांड..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ११ :** मौजे काळी दौलत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कथित अनियमित कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शासनाने लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या या आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या असून, त्याचा थेट फटका परिसरातील सुमारे ४० गावांतील गोरगरीब रुग्णांना बसत आहे.

या प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतानाही त्यापैकी अधिकारी तसेच आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका आणि आरोग्य सेविका शासकीय वेळेत नियमित उपस्थित राहत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेषतः गरोदर माता, लहान मुले, वृद्ध आणि गंभीर आजारांच्या रुग्णांना उपचारासाठी दूरवरून यावे लागते. मात्र डॉक्टर व कर्मचारी उपलब्ध नसल्याने रुग्णांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे सांगण्यात येते. रुग्णांकडून यापूर्वी सूचना करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते संदेश गौतमराव रणवीर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वतः आरोग्य केंद्राची पाहणी करावी, सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांची फेस अटेंडन्स व GPS आधारित हजेरी अनिवार्य करावी, गैरहजर राहणाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी तसेच काळी दौलत येथे कायमस्वरूपी २४ तास सेवा देणारा निवासी डॉक्टर नियुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी यवतमाळ आणि तालुका आरोग्य अधिकारी, महागाव यांनाही देण्यात आल्या आहेत. आता आरोग्य विभाग या गंभीर तक्रारीची दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी व कारवाई करतो का, याकडे ४० गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आश्रमशाळांमध्ये 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान'

## १९ ते २६ सप्टेंबर २०२६ दरम्यान अभियान, सर्पमित्र, सर्पतज्ज्ञ व आरोग्य विभागाच्या सहकार्याने जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता लक्षात घेऊन आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्या खालील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा तसेच वसतिगृहांमध्ये १९ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन, आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना तसेच वेळेत वैद्यकीय उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती नाशिक आदिवासी विकास विभागाचे आयुक्त (प्र.) गोपीचंद कदम यांनी दिली.

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शाळा व वसतिगृहे प्रामुख्याने डोंगराळ, दुर्गम व वनक्षेत्रालगतच्या भागात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा साप, विंचू तसेच इतर वन्यजीवांशी संपर्क येण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच सर्पदंशाबाबत व्यापक जनजागृती करण्यावर अभियानात विशेष भर देण्यात येणार आहे.

अभियानांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि वसतिगृह स्तरावर स्थानिक सर्पमित्र, सर्पतज्ज्ञ तसेच आरोग्य व वन विभागाच्या सहकार्याने किमान एक तासाचे विशेष जनजागृती सत्र आयोजित करण्यात येणार आहे. साप आढळल्यास सुरक्षित अंतर राखणे, शांतपणे त्या ठिकाणापासून दूर जाणे, सापाला पकडण्याचा अथवा मारण्याचा प्रयत्न न करणे, सर्पदंश झालेल्या व्यक्तीची हालचाल कमीत कमी ठेवणे आणि तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच सर्पदंशासंदर्भातील अंधश्रद्धा व गैरसमज दूर करण्यासाठी वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे.

विभागाच्या डिजिटल स्टुडिओच्या माध्यमातूनही सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद याबाबत तज्ज्ञांची मार्गदर्शनपर सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र शासनाने १८ ऑगस्ट २०२६ रोजी सर्पदंशाचा अधिसूचित आजार म्हणून समावेश केला आहे. त्यानुसार सर्पदंशाच्या घटनांची वेळेत नोंद व अहवाल सादर करणे, त्याचे निरीक्षण करणे तसेच Anti-Snake Venom (ASV) उपलब्धता आणि साठवणूक केंद्रांची माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. अभियानाच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा किंवा वसतिगृहाच्या परिसरात कोणताही जिवंत साप आणून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करू नये, असे सक्त निर्देश देण्यात आले आहेत.

**आपत्कालीन संपर्क यंत्रणा अद्ययावत करणे**

मुख्याध्यापक, अधीक्षक आणि परिचारिका यांनी जवळच्या आरोग्य संस्थेचे नाव व संपर्क क्रमांक, Anti-Snake Venom उपलब्ध असलेल्या आरोग्य संस्थांची माहिती, आपत्कालीन वाहतूक व्यवस्था व संपर्क क्रमांक तसेच स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक दर तीन महिन्यांनी अद्ययावत ठेवावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित स्तरावर सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अभियान महत्त्वपूर्ण**

'आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता ही विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियानाच्या माध्यमातून दुर्गम भागातील आश्रमशाळांमधील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये सर्पदंशाबाबत योग्य जनजागृती निर्माण होऊन आपत्कालीन परिस्थितीत प्राण वाचविण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठीही हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल,' असे नाशिक आदिवासी विकास विभागाचे आयुक्त (प्र.) गोपीचंद कदम यांनी सांगितले.

# शाडू मातीच्या कलाकृतींनी फुलले शिवाजी बहुउद्देशीय शाळेचे अंगण

**अमरावती/का.प्र.**

बैलपोळा व श्री गणेशोत्सवाचे औचित्य साधून शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, अमरावती येथे विद्यार्थ्यांसाठी 'शाडू मातीपासून श्री गणेशमूर्ती व नंदीबैल निर्मिती कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, तसेच माती, जलस्रोत, हवा आणि सजीवसृष्टीचे रासायनिक व प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे प्रदूषण टाळण्याबाबत जनजागृती करणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

विद्यालयाचे कलाशिक्षक सचिन र. चोपडे यांनी शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

प्रसिद्ध मूर्तिकार व विशेष मार्गदर्शक गजानन खलोकर यांनीही आपल्या कलाशैलीतून मातीपासून विविध शिल्पे साकारण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या चिमुकल्या हातांनी अत्यंत सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती आणि नंदीबैल साकारत आपल्या कलागुणांना वाव दिला. शाळेचे शाळा निरीक्षक संजीवकुमार खाडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे निरीक्षण करून त्यांचा उत्साह वाढविला.

अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याचे कौतुक करत 'गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा उत्सव आहे. भक्तीबरोबरच



### शाडू मातीच्या गणेशमूर्ती व नंदीबैल निर्मितीतून विद्यार्थ्यांचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश

पर्यावरणाचे संरक्षण करणे हीदेखील आपली जबाबदारी आहे,' असा संदेश दिला.

प्रमुख अतिथी म्हणून सुनील पांडे (अध्यक्ष, विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय), तर अतिथी म्हणून विनोद वैद्य (सचिव, विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, वैद्य ज्वेलर्स) उपस्थित होते. यावेळी उपमुख्याध्यापक एस. एम. माळवे, पर्यवेक्षिका स्नेहल डिके, शिक्षक प्रतिनिधी कांबे व ज्येष्ठ शिक्षिका टाले यांची उपस्थिती होती.संचलन व आभार प्रदर्शन व्ही. आर. पाटील यांनी केले. शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. 'गणपती बाप्पा मोरया! पर्यावरणाचे रक्षण करूया!' या घोषवाक्यासह विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकता, संस्कृती आणि पर्यावरण-जागरूकतेचा उत्सव व्हावा, असा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

## दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शहर युवक काँग्रेसची निदर्शने

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे यांच्यावर नागपूर येथे पोलिसांकडून कथितरीत्या झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या घटनेचा अमरावती युवक काँग्रेसतर्फे तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र राज्याच्या गृहमंत्र्यांना देण्यात आले.

९ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे नागपूर येथील संघ कार्यालयावर संविधानिक व लोकशाही मार्गाने मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चादरम्यान महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे यांच्यावर नागपूर पोलिसांकडून कथितरीत्या जीवघेणा हल्ला झाल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला आहे. या घटनेमुळे युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व असंतोष निर्माण झाला आहे.

'लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसी दडपशाही खपवून घेतली जाणार नाही,' असा इशारा युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

सदर घटना नेमक्या कोणत्या परिस्थितीत घडली, याची वस्तुनिष्ठ



माहिती समोर येण्यासाठी घटनेची तातडीने निष्पक्ष व सखोल चौकशी करावी. उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज, व्हिडिओ रेकॉर्डिंग तसेच इतर सर्व पुरावे तपासून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी करण्यात आली.यासोबतच शिवराज दादा मोरे यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करून त्यांना शासकीय सुरक्षा प्रदान करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.युवक काँग्रेसच्या प्रमुख मागण्या शिवराज मोरे यांच्यावरील कथित हल्ल्याची तातडीने निष्पक्ष चौकशी करावी.दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.घटनेचे फुटेज व इतर उपलब्ध पुरावे तपासावेत. शिवराज दादा मोरे यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करून शासकीय सुरक्षा द्यावी.संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट करावी.'लोकशाही, संविधान आणि कायद्याच्या राज्यावर विश्वास ठेवणाऱ्या महाराष्ट्रात आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर दडपशाही होत असेल, तर ती गंभीर बाब आहे. या प्रकरणात सरकारने तातडीने कारवाई करावी; अन्यथा महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या वतीने संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

निवेदन सादर करताना युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सरकार व पोलिस प्रशासनाच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला.

यावेळी माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, बडनेरा विधानसभा अध्यक्ष आशिष यादव, एनएसयुआय प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट, एनएसयुआय शहराध्यक्ष स्वराज पोटे, एनएसयुआय प्रदेश सचिव वेदांत केने, सागर यादव, धनंजय बोबडे, शुभम हिवसे, कृणाल गावंडे, रोशन इंगळे, आकाश गेडाम, आकाश धुराटकर, चैतन्य गायकवाड, अनय वाटाणे, प्रियाल मोहोड, मोहीत भेंडे, कौस्तुभ देशमुख, श्रेयस धर्माळे, अभिषेक भोसले, साहिल वानरे, क्रिश बिसने, निशांत पवार हे युवक कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती ग्रामीणमध्ये ३१ डिसेंबरपर्यंत वाद्ये व ध्वनिक्षेपकांवर निर्बंध

## पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे आदेश

**अमरावती-** आगामी काळातील सण-उत्सव आणि विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर अमरावती ग्रामीण पोलीस दलाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कडक पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३८ अन्वये अमरावती ग्रामीण पोलीस क्षेत्रात विनापरवाना ढोल-ताशे, बँड, ध्वनिक्षेपक आणि आवाज निर्माण करणाऱ्या उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिकृत आदेश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जारी केले आहेत. संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत गायन, वाद्य संगीत, ढोल-ताशे, ध्वनिक्षेपक, तसेच मोठा आवाज किंवा प्रतिध्वनी निर्माण करणारी यंत्रे वाजवण्यास मनाई आहे. मोठ्या आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास, अस्वस्थता आणि शांतता भंग टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. आवाजाचे नियमन व नियंत्रण करण्याचे पूर्ण अधिकार संबंधित पोलीस अंमलदारांना देण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३६ अन्वये कायदेशीर कारवाई केली जाईल. हा आदेश ३१डिसेंबर २०२६ च्या रात्री १२:०० वाजेपर्यंत संपूर्ण अमरावती ग्रामीण क्षेत्रात लागू राहणार आहे.गणेशोत्सव, दुर्गोत्सव, दिवाळी, गुरुनानक जयंती व नाताळ या सणांच्या काळात सामाजिक शांतता व कायदा सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी नागरिकांनी आणि आयोजकांनी या नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# घोटा येथे तान्हा पोळा साजरा

**कुऱ्हा-** तिवसा तालुक्यातील घोटा येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी मोठ्या उत्साहात लहान मुलांचा तान्हा पोळा सकाळी ८ वा. वार्ड नं. २ मधील घोटा येथील श्रीधर शिरकरे यांच्या घरासमोर साजरा करण्यात आला. या तान्हा पोळ्यात ६० मुलांनी सहभाग घेऊन यामध्ये



काही हातांनी बनविलेले बैल तर काही रेडीमेड सजावट केलेले बैलांचा समावेश होता.सदर मुलांना खाऊ वाटप व पैसे देऊन तान्हा पोळ्याचा समारोप करण्यात आला. यावेळी पोलिस पाटील घोटा अजय गंगाधर इंगोले, ढोल वादक अविनाश सुलताने, प्रमोद सुलताने, प्रवीण मुंडे, सागर शिरकरे, गणेश सुलताने, मनीष सुलताने, राजेश मुंडे, दिनेश वाघमारे, देवानद् मुंडे, पंकज जाभोड़े, राजेश सैरीसे, अक्षय गहूकार, अतुल राऊत, सोमेश्वर जेवड़े, राजेश सुलताने यांच्या सह गावकरी व लहान मुले उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात शैक्षणिक कार्यक्रम

**अमरावती-** डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील बालरोग विभाग आणि इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स अमरावती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'TRIPP – Tackling Respiratory Issues in Pediatric Practice' या शैक्षणिक कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून व भाऊसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली.

यावेळी बालरोग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिभा काळे यांनी प्रास्ताविक व परिचयपर मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमात बालरोगांमधील श्वसनविकारांच्या निदान व उपचाराबाबत विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. श्रीनाद जहागिरदार यांनी मुलांमधील श्वसनमार्गाच्या संसर्गाचे निदान, डॉ. विनोद गांधी यांनी ॲलर्जिक रानायटिस व ॲडिनॉइड वाढीचे निदान व उपचार तसेच श्वसन संसर्गामध्ये जंतुनाशक औषधांचा विवेकी वापर, डॉ. विशाल चव्हाण यांनी बालरोगांच्या दैनंदिन उपचारपद्धतीत खोकल्याच्या औषधांचा वापर, तर डॉ. सिद्धांत लालवाणी यांनी बालरोगांतील श्वसनविकारांमध्ये स्टिरॉइड्सचा विवेकी वापर तसेच इनहेलेशनची योग्य पद्धत व विविध उपकरणे याबाबत मार्गदर्शन केले.शहरातील विविध बालरोगतज्ज्ञ, पदव्युत्तर व पदवीपूर्व विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन डॉ. वैदेही व डॉ. अभिनंदन यांनी केले, तर डॉ. आदित्य टांक यांनी आभार प्रदर्शन केले.

# चांदुर रेल्वे शहराचे नाव जपण्याचीही जनप्रतिनिधीना फुरसत नाही?

**नागरिकांचा प्रश्न**

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

शहराच्या विकासाची आणि सौंदर्याची जबाबदारी खांद्यावर घेऊन नगरपालिकेत पोहोचलेल्या नगरसेवकांना आता स्वतःच्या शहराचे नाव जपण्याचीही आठवण करून द्यावी लागणार का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

मुख्य रस्त्यावर शहराचे सौंदर्य वाढावे आणि बाहेरून येणाऱ्या नागरिकांना 'चांदुर रेल्वे' शहराची ओळख व्हावी, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या आकर्षक नामफलकावरील शहराचे नावच आता गायब झाले आहे. त्यामुळे सौंदर्यीकरणाच्या नावाखाली केलेल्या कामाची देखभाल नेमकी कोण करणार, हा प्रश्न ऐरणीवर




आला आहे.

नगरसेवकांना निवडून देणारे नागरिक याच चांदुर रेल्वे शहराचे आहेत. याच शहराच्या नावाने नगरपालिका आहे आणि याच शहराच्या विकासासाठी नगरसेवकांना जनतेने प्रतिनिधित्वाची संधी दिली आहे. मग शहराची ओळख सांगणारा नामफलकच दुर्लक्षित होत असेल, तर शहराच्या इतर विकासकामांकडे किती गांभीर्याने पाहिले जात असेल? असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

**'नाव' गायब होण्यापूर्वी जागे व्हा!**

आज नामफलकावरील 'चांदुर रेल्वे' हे नाव गायब झाले आहे; उद्या शहराच्या इतर ओळखीच्या खुणाही अशाच दुर्लक्षित राहिल्या तर त्याची जबाबदारी कोण घेणार? त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने आणि नगरसेवकांनी केवळ आश्वासनांपुरते न राहता तातडीने नामफलकाची दुरुस्ती करून 'चांदुर रेल्वे' हे नाव पुन्हा दिमाखात झळकवावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.कारण शहराचे नाव ही केवळ अक्षरे नाहीत; ती शहराची ओळख, अस्मिता आणि नागरिकांचा अभिमान आहे.

# कळमगावात पारंपरिक बैलपोळा उत्साहात

## ५० वर्षांची परंपरा कायम; २५ बैलजोड्यांसह शेतकऱ्यांचा शेला-श्रीफळ देऊन सन्मान

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शेतकऱ्याचा जिवाभावाचा सोबती असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा सण चांदूर रेल्वे तालुक्यातील कळमगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गावातील शेतकरी मंडळींनी आपल्या कष्टकरी बैलांचा सण आनंदोत्सवात साजरा करत बैलांना सजवून मानाचा घाट घातला.

कळमगाव येथे गेल्या ५० वर्षांपासून माजी पोलीस पाटील स्व. मनोहर सोपानराव वाघ यांच्या नेतृत्वाखाली बैलपोळ्याचे आयोजन करण्याची परंपरा सुरू होती. त्यांच्या निधनानंतर ग्रामपंचायतीचे सरपंच ॲड. शिवाजी नरेंद्र वाघ यांनी पुढे चालू ठेवली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाच्या बैलपोळ्याची सांगता अत्यंत उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या



वातावरणात करण्यात आली. यावेळी २५ बैलजोड्या पोळा उत्सवात सहभागी झाल्या होत्या. शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नात्याचा गौरव करत उपस्थित सर्व शेतकऱ्यांचा शेला व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. बैलपोळ्याच्या निमित्ताने गावातील नागरिक, शेतकरी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करून त्यांना मानाचा घाट घालण्यात आला. यामुळे गावातील जुन्या परंपरेला नव्या पिढीनेही उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाला श्रीकृपा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. सागर वाघ, नितीन वाघ, पवन वाघ, गौरव वाघ, चेतन वाघ, शुभम वाघ, अक्षय वाघ, सागर दुर्योधन, जीवन दुर्योधन, संजय इंगळे, प्रमोद गवई, अवधूत मेश्राम, अमर वाघ, अजिंक्य वाघ, प्रशिल वाघ, आयुष वाघ, शैलेश वाघ, उपसरपंच अंकुश आठवले, पोलीस पाटील निलेश बोरकर, मंगेश कडू, वैभव वाघ यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदगावात पोळ्याला रंगली बैल जोडी सजावट स्पर्धा

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक मुंगसाजी महाराज चौकात पोळा उत्सवात बैल जोडी सजावट स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन स्वर्गीय संजय पारसकर स्मृती प्रित्यर्थ पारसकर कृषी केंद्राच्या वतीने माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर व अभिषेक पारसकर यांनी केले होते.

या स्पर्धेत ५५५५ रुपयाचा प्रथम पुरस्कार प्रमोद मारोटकर यांच्या बैल जोडीला देण्यात आला.

## शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा

३३३३ रुपयाचा द्वितीय पुरस्कार आसिफखा यांच्या बैल जोडीने व २२२२ रुपयाचा तृतीय पुरस्कार गजानन शिरभाते यांच्या बैलजोडीने पटकावला.

यावेळी पोळ्याला तोरणाखाली आलेल्या सर्व जोडी मालकाचा गौरव करण्यात आला.

बैल जोडी स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ वयोवृद्ध शेतकरी माजी सरपंच देविदास सुने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला . यावेळी प्रमुख अतिथी नांदगावचे ठाणेदार आनंद पीदुरकर, आयोजक माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर, अभिषेक पारसकर, कावड यात्रा समितीचे डॉ. भूषण पोतदार, माजी नगराध्यक्ष संजय पोपळे, नगरसेवक योगेश चवाळे, अविनाश ब्राह्मणवाडे, वैभव कोंडवते,



घनश्याम सारडा, प्रदीप जोशी, अरुण लहाबर, गजानन मारोटकर, गुणवंत कोळमकर, स्पर्धेचे परीक्षक नागोराव दिघडे, संजय अंभोरे, उमेश चौकडे, सुरेश रावेकर, महादेव काळेकर, मुमताज कुरेशी, महादेव सोनोने, अनिल शिरभाते, अरुण भाऊ गुल्हाने, गजानन डोक, अशोक दैत, विजय सुने ही मंडळी प्रामुख्याने मंचावर उपस्थित होती. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मारोती लाहाबर, अमोल ढंगारे, उमेश सोनोने, ऋषिकेश मारोटकर, प्रसाद चांदणे, अक्षय मारोटकर, अंकित काळेकर, अनिकेत मरोटकर, सागर लाड, विशाल काळेकर, अमन काकडे, ओम काळेकर, कृष्णा पारसकर, ओम मारोटकर व बऱ्याच युवा मंडळींनी परिश्रम घेतले. संचालन डॉ. संजय जेवडे यांनी केले.

# सरकारी माल, कुणीही यावे लुटून जावे !





**आपले काहीच वाकडे होऊ शकत नाही हे आरोपींना माहित असल्यामुळे ते मिळालेला पैसा पचवून समाजात बिनधास्तपणे वावरत असतात. असे घोटाळे करणाऱ्यावर कारवाई व्हावी यासाठी बळी पडलेल्या व्यक्ती पाठपुरावा करुन प्रकरण तडीला नेण्याचा वर्षानुवर्षे प्रयत्न करतात. हे झाले खाजगी व्यक्तींच्या फसवणुकीबाबत. मात्र, एखाद्या घोटाळ्यामध्ये जर शासकीय रकमेचा अपहार झाला तर आरोपी पकडले जावेत, सरकारी म्हणजेच जनतेचा पैसा परत मिळावा, आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी कुणीच इच्छुक नसते.**

आजकाल आर्थिक फसवणुकीच्या बातम्यांचे फारसे नावीन्य राहीलेले नाही. दरोजच्या वृत्तपत्रात आर्थिक फसवणुकीला बळी पडल्याची किमान एक तरी बातमी असतेच. यापैकी काही जण स्वतःच्या निष्काळजीपणाने, काही अज्ञानामुळे तर काही स्वतःचा दोष नसताना चोरांच्या चलाखीमुळे फसतात. फसवणूक झाल्यानंतर पोलीस तक्रार, चौकशी, नेत्यांच्या घोषणा वगैरे सगळे सोपस्कार पार पडतात पण फसवणुक झालेल्यांना त्यांचे गेलेले पैसे परत मिळत नाहीत. ते बिचारे पोलीस खाते आणि न्यायालयाच्या चकरा मारत राहतात. काही वर्षांपूर्वी राणा नावाच्या एका सराईत बदमाशाने अमरावती शहरामध्ये कमी किमतीच्या सदनिकांची स्कीम आणली. स्वतःचे घर नसणाऱ्या अनेक मध्यमवर्गीयांनी आपली शिल्लक पुंजी पणाला लावून राणाभाऊकडे पैसे भरुन आपल्या स्वप्नातील घराची नोंदणी केली. शेकडो लोकांकडून पैसे गोळा केल्यानंतर हा राणा अमरावती शहरातून फरार झाला. पोलीस तक्रार झाली, चौकशी झाली, अटक झाली, सुटका झाली, त्याला पाताळातून शोधून आणून शिक्षा देण्याच्या आणि पैसे परत मिळवून देण्याच्या भिमसेनी घोषणा देखील झाल्या परंतु अद्याप कुणालाही पैसे परत मिळालेले नाहीत. ज्यांचे पैसे गेले ते पोलीस आणि न्यायालयात चकरा मारीत आहेत, परंतु त्यांना कुणीही काय सुरु आहे याची माहिती देत नाही. जिल्हाधिकारी साहेबांना राणाची जमीन विकून बळींचे पैसे परत करण्याचे आदेश आहेत असे म्हणतात पण, नक्की काय ते कुणालाच सांगितले जात नाही. त्यानंतर सूर्या नावाची एक कंपनी उगवली, तिने भरपूर व्याज देण्याचे आमिष देऊन शेकडो मध्यमवर्गीयांना लुबाडले. त्याचीही चौकशी सुरु आहे, पैसे मिळालेले नाहीत आणि आता सर्वांनी ती आशा सोडूनही दिली आहे. हे संपत नाही तोच अनंत पॅन कार्ड क्लब नावाच्या कंपनीने कोट्यवधीचा घोटाळा करुन आम जनतेला चुना लावला, त्यातही कुणाचे पैसे परत मिळाले नाहीत आणि भविष्यात मिळण्याची शक्यताही दिसत नाही. काही दिवस उलटत नाही तोच अमरावतीच्या युनियन बँकेचा घोटाळा पुढे आला. या बँकेच्या मॅनेजरने त्याच्याच कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन गहाण ठेवलेल्या आणि लॉकरमध्ये ठेवलेल्या सोन्याची अक्षरशः लूट केली. चौकशी झाली आरोपींना अटकही झाली, जामीन मिळाले पण झालेल्या

नुकसानाची पूर्ण भरपाई मिळालेली नाही. हे संपत नाही तोच मुथूट फायनान्समधील गहाण सोने विकण्याचा घोटाळा पुढे आला. यातही आरोपींना अटक झाली आहे. लवकरच जामीन मिळतील आणि ज्यांचे सोने गेले ते हात चोळत बसतील यात शंका नाही! खाजगी संस्था किंवा कंपन्यांनी केलेल्या घोटाळ्यातील पैसे परत मिळत नाहीत हे आता त्या घोटाळ्यातील बळींना कळून चुकले असले तरी वेड्या आशेने ते बिचारे चकरा मारीत असतात. आपले काहीच वाकडे होऊ शकत नाही हे आरोपींना माहित असल्यामुळे ते मिळालेला पैसा पचवून समाजात बिनधास्तपणे वावरत असतात. असे घोटाळे करणाऱ्यावर कारवाई व्हावी यासाठी बळी पडलेल्या व्यक्ती पाठपुरावा करुन प्रकरण तडीला नेण्याचा वर्षानुवर्षे प्रयत्न करतात. हे झाले खाजगी व्यक्तींच्या फसवणुकीबाबत. मात्र, एखाद्या घोटाळ्यामध्ये जर शासकीय रकमेचा अपहार झाला तर आरोपी पकडले जावेत, सरकारी म्हणजेच जनतेचा पैसा परत मिळावा, आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी कुणीच इच्छुक नसते. उलट, ज्या खात्यातील घोटाळा आहे त्या खात्यातील अधिकारी-कर्मचारी हे घोटाळेबाजाला कसे वाचवता येईल हेच पहात असतात, कारण कुठे ना कुठे या घोटाळ्यामध्ये त्यांचेही हितसंबंध गुंतलेले असतातच. सरकारी घोटाळा किती कोटींचा आहे याचा अंदाज घेऊन पोलीस खातेही आपले अर्थपूर्ण संबंध तडीला नेतात आणि तात्पुरता निलंबित झालेला घोटाळेबाज सुखनैव आणि सन्मानाने कामावर रुजू होतो.

अमरावतीच्या शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था (पूर्वीचे व्हीएमव्ही) एका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याने तब्बल दीड कोटी रुपयांहून अधिक रकमेचा घोटाळा केला आहे. राखोल तपासणी अंती हा आकडे चार ते पाच कोटीपर्यंतही जाऊ शकतो. विशेष म्हणजे, उच्च शिक्षण विभागाचे पुणे येथील संचालकांचे कार्यालय, मंत्रालयातील उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि अमरावतीच्या विभागीय सहसंचालकांच्या कार्यालयातील अधिकारी यापैकी कुणीही हा घोटाळा गांर्भीर्याने घेतल्याचे दिसत नाही, दिनांक ३जुलै२०२६ रोजी हा घोटाळा उघडकीस आला. पगाराचे देयक तयार करणाऱ्या या कर्मचाऱ्याने देयक बनवताना स्वतःच्या पगारात दरमहा भरमसाट वाढ करवून घेतली आणि शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावला. पगार देयकासाठी संबंधित कर्मचारी आणि कार्यालय प्रमुख यांच्याकरिता वेगवेगळे लॉग इन आयडी आणि पासवर्ड असतात. शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेच्या वर्ष २०१६-१७ पासून कार्यरत असणाऱ्या प्रत्येक प्राचार्यांनी आपला आयडी आणि पासवर्ड स्वतः न वापरता महेश आंधळे या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याकडे आंधळेपणाने सोपवल्यामुळे हा कर्मचारी गेल्या ९ वर्षांपासून सतत एवढा मोठा घोटाळा करु शकला. घोटाळा उघडकीस आल्यानंतर दिनांक ४ जुलै २०२६ रोजी संस्थेच्या प्राचार्यांनी प्राथमिक चौकशीकरिता एक त्रिसदस्यीय समिती नेमली. या समितीसमोर घोटाळेबाज महेश आंधळे याने आपण घोटाळा केला असल्याचे लेखी कबूल केले आणि ६जुलै२०२६ रोजी घोटाळ्यातील जवळ जवळ २२ लाख रुपये एकरकमी भरुन दिले. याचवेळी सदर कर्मचाऱ्यास तात्काळ पोलीसांच्या हवाली करणे आवश्यक असताना मोकळे सोडण्यात आले आणि तो सहज गायब झाला. पुढे तपासणी केली असता केवळ वेतन देयकामध्येच दीड कोटीचा घोटाळा असल्याचे दिसून आले. आश्चर्याची बाब म्हणजे घोटाळा कमी रकमेचा दिसावा या हेतूने वैद्यकीय देयके,भविष्य निर्वाह निधीची देयके, तासिका तत्वावरील सुमारे अडीचशे शिक्षकांच्या आंधळेच्या हाताखालून गेलेल्या देयकांची तपासणी अद्यापही करण्यात आलेली नाही!

दि. ४जुलै २०२६ रोजी या घोटाळ्याची माहिती हा कर्मचारी ज्यांच्या नियंत्रणाखाली काम करतो त्या विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. खांबोरकर यांना देण्यात आली. सहसंचालकांनी याची गंभीर दखाल घेऊन तात्काळ कार्यवाही करीत संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करणे आवश्यक होते, परंतु व्हीएमव्हीच्याच परिसरात काही मिटर अंतरावर असलेल्या सहसंचालकांच्या कार्यालयातून व्हीएमव्ही मध्ये आंधळे याच्या निलंबनाचे आदेश यायला आठ दिवसानंतरची म्हणजे ११जुलै २०२६ ही तारीख यावी लागली. संस्थेच्या प्राचार्यांनी तात्काळ पोलीसांशी संपर्क न साधता सहसंचालकांकडून गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितली आणि आणखी वेळ गमावला. गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी प्राचार्यांना घोटाळा मोठा असल्याचे सांगून आर्थिक गुन्हे शाखेकडे टोलवले. या टोलवाटोलवीत आणखी काही दिवस निघून गेले आणि आरोपी आंधळे याला फरार होण्यास पुरेसा वेळ मिळाला. एकंदरित, आरोपी महेश आंधळे यांना फरार होण्यासाठी वेळ मिळावा आणि या दरम्यान त्याला अटकपूर्व जामीन घेण्याची संधी मिळावी यासाठी उच्च शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पोलीस खात्याने आपली 'अर्थपूर्ण' भूमिका चांगल्या प्रकारे निभावली असल्याची आणि या एकुणच प्रकरणात अमरावतीच्या एका 'वजनदार' सत्ताधारी लोकप्रतिनिधीने मध्यस्थी केल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात चांगली रंगली आहे. त्यामुळेच एवढा मोठा घोटाळा होऊन आरोपीला साधी अटकही होऊ नये ही बाब फारशी आश्चर्याची नाही. सध्या हा निलंबित आरोपी रुजू देखील झाला आहे ! सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे उच्च शिक्षण विभाग गाढ झोपेत आहे आणि पोलीसांची चौकशी अजूनही सुरुच आहे!

शासकीय कार्यालयात जेव्हा असे घोटाळे होतात ते विशिष्ट कर्मचाऱ्यांना लायकीपेक्षा जास्त अधिकार दिल्यामुळे व ठराविक वेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नियमानुसार बदल्या न केल्यामुळे होतात हे आजवरच्या उदाहरणावरुन दिसून आले आहे. उच्च शिक्षण विभागाचे विभागीय कार्यालय व्हीएमव्ही परिसरातच आहे. या कार्यालयातील काही विशिष्ट कर्मचारी गेल्या कित्येक वर्षांपासून याच कार्यालयात ठाण मांडून आहेत. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे एजंट म्हणून हे कर्मचारी काम करतात. नियमानुसार ठराविक कालावधीनंतर बदली करावीच लागते म्हणून पुणे येथील संचालक कार्यालयाच्या डोळ्यात धूळ फेकण्याकरिता काही दिवसांनी त्यांची कागदोपत्री बदली करण्यात येते आणि 'प्रतिनियुक्ती' या गोंडस नावाखाली त्याच दिवशी या ठराविक कर्मचाऱ्यांना पुन्हा कार्यालयात रुजू करुन घेतले जाते. उच्च शिक्षण सहसंचालकांच्या कार्यालयातील याच एजंट कर्मचाऱ्यांनी घोटाळेबाज आंधळे याला आपल्या हिश्श्याच्या मोबदल्यात पुरेशी तांत्रिक, कागदोपत्री व राजकीय मदत सातत्याने पुरवल्यामुळेच एक चतुर्थ श्रेणी कर्मचारी एवढा मोठा घोटाळा करु शकला असावा असे समजण्यास बराच वाव आहे. सहसंचालक कार्यालयातील या विशिष्ट कर्मचाऱ्यांच्या संपत्तीमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत असल्यामुळे ही शक्यता देखील मुळीच नाकारता येत नाही.

पूर्वाश्रमीचे विदर्भ महाविद्यालय म्हणजेच आजच्या शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेला दैदिप्यमान इतिहास आहे. अनेक थोर कवी, लेखक, संशोधक, नेते, वकील, डॉक्टर्स, नेते या संस्थेने निर्माण केलेले आहेत. अगदी मोजक्या शुल्कामध्ये शिक्षण देणारी ही संस्था गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी ही जणू वरदानच आहे. संस्थेने स्वबळावर प्रगती करावी यासाठी शासनाने या संस्थेला स्वायत्त दर्जा दिलेला आहे. परंतु, दुर्दैवाने येथे बसलेले झारीतील शुक्राचार्य संस्थेच्या प्रगतीला बाधक ठरत आहेत. कोट्यवधी रुपयांची शासकीय लूट करणाऱ्या आरोपींना जर उच्च शिक्षण खाते आणि पोलीस खाते संरक्षण देत असेल तर घोटाळेबाजांचे मनोधैर्य चांगलेच वाढून या संस्थेला डबघाईस यायला फारसा वेळ लागणार नाही, हे सांगायला भविष्यवेत्त्याची गरज नाही !

**ॲड नीलकंठ ल. तायडे**
मो.९४२२१५९२३३

## वर्धा हिंदी विद्यापीठ:कॅम्पस बंदी की अभिव्यक्तीची कोंडी?

वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील ताजा वाद विद्यार्थ्यांचे लोकशाही हक्क आणि प्रशासकीय शिस्त या दोन्ही बाजूंनी चर्चेत आला आहे. जुलै २०२६ पासून सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर, १ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठ प्रशासनाने ६ दलित आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कॅम्पस आणि वसतिगृहातून तात्पुरते निलंबित (बंदी) केले आहे. यामुळे हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हक्कांची गळचेपी करणारा आहे की केवळ शिस्तीचा भाग, यावरून तीव्र वाद निर्माण झाला आहे.

गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ मूलभूत शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांसाठी चाललेल्या संघर्षाचा शेवट सहा संशोधक विद्यार्थ्यांवरील 'कॅम्पस बंदी'च्या टोकाच्या कारवाईत होणे, हे भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील वाढत्या प्रशासकीय असहिष्णुतेचे निदर्शक मानले जात आहे. ज्या विद्यापीठाची स्थापना आंतरराष्ट्रीय स्तरावर भाषा, संस्कृती आणि मानव्यविद्यांच्या संवर्धनासाठी झाली, त्या संस्थेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, वसतिगृहातील स्वच्छता, निकृष्ट दर्जाचे मेसचे अन्न, २४ तास ग्रंथालय सुविधा आणि पीएचडी प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता यांसारख्या प्राथमिक हक्कांसाठी दोन महिने रस्त्यावर बसावे लागणे ही मुळातच संस्थात्मक अपयशाची कबुली आहे.



विद्यार्थ्यांच्या निदर्शनांकडे संवादाच्या माध्यमातून न पाहता विद्यापीठ प्रशासनाने अवलंबलेली दडपशाहीची भूमिका या वादाला अधिक चिघळवणारी ठरली आहे.या संपूर्ण कारवाईचे सामाजिक आणि संस्थात्मक परिमाण अत्यंत संवेदनशील आणि चिंतनीय आहे. ज्या सहा विद्यार्थ्यांवर बंदी घालण्यात आली, त्यापैकी तीन विद्यार्थी दलित (अनुसूचित जाती) आणि तीन इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील आहेत. यामुळे उच्च शिक्षण संस्थांमध्ये वंचित घटकांतून प्रथम पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात व्यवस्था किती अपयशी ठरत आहे, याचा नव्याने उहापोह सुरू झाला आहे.

सध्या विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे सुरू असलेले धरणे आंदोलन केवळ एका कॅम्पसपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्याचे पडसाद राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील पुरोगामी चळवळीत उमटत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांवरील पोलीस गुन्हे आणि कॅम्पस बंदी त्वरित मागे घेऊन पारदर्शक, समन्यायी आणि संवादात्मक भूमिकेतून या सर्व मूलभूत मागण्यांची तातडीने पूर्तता करणे ही काळाची गरज आहे.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**
वर्धा,मो.९५६१५९४३०६

## ...यांनी शिवाजी राजांचे वंशज असल्याचा टेभा मिरवू नये!

जगभरात बहुसंख्य राजे, सरदार, अमीर उमराव असे होऊन गेले आहेत की,त्यांनी आपल्या दरबारात नृत्यगाण्यांची मैफल भरवली, बायका नाचवल्या, काहींनी त्यांचे शोषणही केले! आपल्याकडे तर सर्रास अनेकांना हा शौक होता, अनेकांच्या नृत्यशाळा होत्या.रखेल्या होत्या,अंगवस्त्रे म्हणून बायका ठेवल्या जात, नाचवल्या जात; लाखो तऱ्हेची लफडी केली जात!याला जे काही मोजके अपवाद होते त्यात आपले सर्वांचे लाडके शिवबाराजे होते!

महिलांना आदराचे, मायेचे स्थान देणारा हा रयतेचा राजा त्यासाठीही इतिहासात ओळखला जातो! त्यांचे वंशज असल्याचा टेंभा मिरवणाऱ्या मंडळींनी राजांची ही नोंद मेंदूवर कायमस्वरूपी गोंदवून ठेवण्याची नितांत गरज आहे, हे आता नाईलाजाने सांगावे लागते. ह्या मंडळींनी तशी वेळ आणली!

शिवाजी राजे हे आपल्यापैकी अगणित लोकांचे काळीज आहेत! त्यांचे काही वारस केवळ वारस असल्याच्या बढाईवर आणि पुण्याईवर टिकून आहेत, वाढले आहेत आणि त्यांचे प्रस्थ अस्तित्वात आहे! त्यांनी आपले राजेपण वगळले तर ते गणंग ठरतील, शिवरायांचे नाव त्यांनी घेतले नाही तर त्यांची राजकीय सामाजिक ओळख शून्य होईल!

महाराष्ट्राच्या राजकारणात सातारा जिल्ह्यातील काही नावे आपण छत्रपती घराण्याचे शिवबांचे थेट वंशज आहोत असा टेंभा मिरवताना दिसतात! कुणी नुसतेच कॉलर उडवत असतात तर कुणी नुसतीच पोस्टरबाजी करताना दिसतात! लोकांनाही त्यातच आनंद वाटत असावा. आपला त्यास आक्षेप असण्याचे कारण नाही!

मात्र..छत्रपती शिवाजी राजांचे वंशज आहोत असा डांगोरा पिटणाऱ्यांनी सार्वजनिक मंचावर वावरताना तरी निदान आपल्या राजांच्या प्रतिमेस अनुरूप नसणारी,छेद देणारी अधम कृत्ये करू नयेत ही रास्त अपेक्षा अनेक जण ठेवतात! बाकी दृष्टीआडच्या जगात तुम्ही काय करत आहात ह्यावर कुणाचा धरबंद असण्याचे काहीच कारण नाही. कारण तुम्ही जुमानावे इतकी सामान्य जनतेची औकात नाही, हे सारेच जाणतात!

परंतु सार्वजनिक मंचावर अचकट विचकट हावभाव करत अश्लील नृत्यांचा बाजार तुम्ही दहीहंडीच्या धार्मिक मंचावर भरवत असाल आणि स्वतः तिथे उपस्थित राहून अगदी डोळे भरून तृप्ततेने तो पाहत असाल तर कृपया इथून पुढे शिवाजी राजांचे वंशज आहोत हे सांगणे बंद करावे! एकतर वर्तन सुधारावे नाहीतर टेंभा मिरवू नये!

वंशज म्हणून राज्य आजवर आपला आदर करत आले. भले तुम्ही त्यांचे वंशज असाल, त्यांचे रक्त तुमच्यात असेल, मात्र त्यांचे विचार अनेकांच्या धमन्यातून आजही वाहतात, त्यांना ही थेर कधीही पचनी पडणार नाहीत! सबब, अजूनही वेळ गेलेली नाही. स्वतःला आवरावे आणि जमल्यास सुधरावे. बाकी नागरी सुविधा आणि सुराज्य, स्वराज्य आदी बाबतीतले आपले योगदान याविषयी न बोललेले बरे!

**- समीर गायकवाड**

## त-ड-का

### महाराष्ट्राची वाघीण..!

महाराष्ट्राची वाघीण म्हणून
कुस्तीपटू अश्विनीची होती
राष्ट्रीय स्तरावर किर्ती..!

कौटुंबिक छळापायी-
अपत्यासह केली
आत्महत्या
किती हृदय विदारक
स्थिती..!

कुटूंब कलहाला
तुटेल एवढे ताणू नये
क्रोध करत असतो घात
जीवनी होईल पश्चाताप..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

## बापटांची भूमिका

**बापटांशी सहमत असो वा नसो, बापटांनी या षंढ झालेल्या, धर्माच्या नावाखाली काहीही खपवून घेणाऱ्या समाजाला एक लख्ख आरसा दाखवायचे काम केले हे मात्र निर्विवाद सत्य आहे.**



आज त्यांनी समाजाला दोन पावले पुढे आणलेय हे नक्कीच जाणवते.ते जे मुद्दे मांडताहते ते अनेक वर्षांपूर्वी एका माणसाने (ज्यांना हे सो-कॉल्ड धार्मिक लोके पूजतात) मांडलेच की ओ. आणि जसे सावरकरांनी मांडले तसेच आगरकरांनी मांडले. या सगळ्यांना धर्माच्या चादरीत आपण हळुवारपणे गाडून टाकलेय. त्यांचे विचार मात्र साफ पुसून टाकलेत. हे महाभाग किती टोकाचे बुद्धिप्रामाण्यवादी आणि वास्तववादी होते, हे आज किती जणांना ठाऊक असेल?

आज बापटांच्या आईचा व्हिडीओ पाहिला आणि माझी आजी आठवली. 'तु फोन उचललास हे आमचे भाग्य.'हे ऐकून लोके, वा किती छान वगैरे बोलले. पण कोकणातली मुले हे लहानपणापासून ऐकत आली असावीत. आम्ही satire कोळून प्यायलोय.

बरे.. इथे कोकणातल्या गावांमधून बापट, साने, ओक, वैद्य, जोगळेकर यांच्या घरांतून फिरलात तर प्रचंड प्रमाणात वास्तववादी लोक भेटतील. माझ्याच आजूबाजूला बरेच लोक असे आहेत ज्यांना उगाच पूजा करणे आणि कर्मकांड करणे हे मान्य नाही. फॉर सम रिझन ब्राम्हण समाज यात फार पुढारलेला दिसतो. ते ओपनली याबाबत चर्चा करू शकतात. देव आहे की नाही हा मुद्दा ज्याचा त्याचा वैयक्तिक.

धर्म म्हणजे चांगले वागणे. चांगला माणूस बनणे. शिव्या घालून, दुसऱ्याला तुच्छ लेखून कोणीच धार्मिक बनत नसतो. मग हल्ली मुद्दा येतो 'ते बघा कसे आहेत.' Demeaning the 'other' मला काय करायचे? मी स्वतःला प्रश्न विचारतो, मी कसा आहे! मी जात-पात मानत नाही. मी जाती ऐवजी समाज बघतो. ब्राह्मण, कुणबी, सुतार असे अनेक समाज येतात, कारण समाज म्हटला की त्यात त्याच्या त्याच्या प्रथा, परंपरा, भाषा, जेवण हे सगळेच येते. आणि हो हे प्रत्येक समाजात भिन्न आहे. मी कोकण चालत असताना एकाच गावात पूर्णपणे वेगवेगळ्या जेवण पद्धती, बोली भाषा पाहिल्या. नुसत्या पाहिल्या नाही, जगलोही. आजही काही ब्राम्हण इतर समाजात जेवायला जात नाहीत. हा निव्वळ मूर्खपणा आहे. मला सांगतात की आमच्या घरात या गोष्टी माझ्या पणजोबांच्या काळापासून कोणी पाळल्या नाहीत. म्हणूनच असेल की आम्ही तसे वाढलो नाही. जात माणसाला उच नीच शिकवते. ही उच नीच, योग्य शिक्षण आणि चांगले वातावरण मिळाले तर राहणारच नाही.

मग लोक येतात ग्रंथांवर. ग्रंथ हे केवळ त्या काळचे रेफरन्स पॉईंट आहेत असे मी मानतो. (मी एकटाच नाही मानत बरंका-वर नमूद केलेल्या प्रत्येकाने तेच म्हटले) त्यावेळच्या लोकांनी त्या वेळच्या विचारानुसार आपली मते मांडली. वेद म्हणजे काय? 'स्वयं वेदन' स्वयं वेदन म्हणजे 'स्वतः अनुभवले असे'. म्हणजेच त्या वेळच्या लोकांनी पाहिले, समजले असे. काळ बदलतो. माणसाच्या बुद्धिमत्तेत भर पडते. जसा डेटा गोळा झाल्यावर विज्ञानात जसा hypothesi पुन्हा नवीन मांडावा लागतो तसे यातल्याही काही गोष्टी बदलणारेत हे ग्रंथकर्त्यांनाही माहित असणारच. हा, काही मूलभूत सत्य आहेत जी बदलणार नाहीत.

तिकडे बाहेर जरी गोष्टी बदलल्या असतील तरी इथे कोकणात मात्र या मुद्द्यांवरुन चर्चा रंगतात, कारण इथे हे विचार करायला लोकांकडे वेळ आहे. ब्राह्मणांच्यात या चर्चा जास्त रंगतात. म्हणूनच बापटांचा तार्किक युक्तिवाद पाहून कोकणात असे अजून बरेच वेडे आहेत असे वाटून जाते. काय गंमत आहे की इथूनच कोणीतरी बापट, कर्वे, साने, (जोशीना पण जोडून टाकूया) तयार होतात जे त्यांच्याच परंपरागत चालणाऱ्या कर्मकांडाला विरोध करतात. कारण चुकीला चूक म्हणणे ही शिकवण unfortunately घरात लहानपणापासूनच अंगवळणी पाडली असते. आता त्यातही काही फळे पिकतात आणि काही कच्चीच राहतात. तो निसर्गदोष म्हणून सोडून देऊ.

आता हेच पहा ना. माझ्या आजी-आजोबांनी दोघांनी व्हीआरएस घेतली. का? तर सरकारी ऑफीसमध्ये भ्रष्टाचार वाढला होता आणि असे चुकीच्या पद्धतीने काम करणे त्यांना पटत नव्हते. चोख सगळी प्रोमोशन सोडून गावी येऊन मातीच्या घरात राहिले. त्या काळी कलेक्टर म्हणून प्रमोशन मिळत असताना 'हे पटत नाही. मी गावी जाईन. शेती करेन' हे बोलणारे माझे आजोबा. माझी आजी सर्व धार्मिक गोष्टी करते पण मला ते पटत नाही म्हणून मला कधीच त्रास देत नाही. आम्ही प्रचंड युक्तिवाद करतो. पार एकमेकांचे रामायण, महाभारत बाहेर काढतो. पण म्हणून आम्ही एकमेकांवर चिडलोय असे कधीच झालेले नाही. मुद्दा हा आहे की तुम्ही वाचा आणि नुसते पुराण वाचल्यासारखे वाचू नका. ते वाचत असताना समोरचा माणूस काय बोलायचा प्रयत्न करतोय. तो बरोबर आहे का? असे प्रश्न स्वतःला विचारा. विचार करा. मग ही वेडी लोके काय म्हणतायत हे कळेल. उगीच मी रट्टा मारला, धाडधाड पुराण वाचले, पण त्याचा मथितार्थ काय हे समजतच नसेल तर मग काय फायदा? तो वेळ वाया गेलाय.

गणपती! गणपती हा उत्सव खरंतर माती आणि शेतीशी रिलेटेड होता. तो शेतीची नासधूस करणाऱ्या हत्ती आणि उंद्राशी रिलेटेड होता. तो रानावनातल्या फुलांशी रिलेटेड होता. याचा आता त्या शेतीशी आणि मातीशी काहीएक संबंध राहिलेला नाही. इथे माणसे आता माती सोडून प्लास्टर ऑफ पॅरिसचा गणपती आणत आहेत आणि त्याला गणेशोत्सव म्हणतात. या मुर्त्या महिनोमहीने नदीत पडलेल्या असतात. ही विटंबना नाही का? सणाचा संबंध निसर्गाशी आणि तुम्ही निसर्गाचाच ऱ्हास करताय, त्यावेळी त्या जीर्ण झालेल्या मूर्तीची अवस्था बघून कोणाच्या भावना दुखवत नाहीत पण विसर्जन त्याच नदीत किंवा तलावात त्याच ठिकाणी नाही करून दिले तर मात्र सगळ्यांच्या जातवारी भावना दुखावतात. इथे कोकणात हल्ली हे भारी चालू झालले.

(तरीही अजूनही गणेशोत्सवाचा निखळ आणि निसर्गदत्त आनंद घ्यायचा असेल, तर अजूनही कोकणातल्या एखाद्या वाडीतच यावे लागते.)

शेवटी, नेपाळमध्ये भटकताना एका माणसाने मला एक छोटीशी गोष्ट सांगितली होती. ती फक्त इथे ठेवून जातो. अर्थ आणि मथितार्थ तुम्हीच लावायचाय...

'समजा, एका समुद्रकिनाऱ्यावर ९९ लोक कपडे घालून उभे आहेत. तिथे अचानक एक विवस्त्र माणूस येतो. साहजिकच, तिथे तो एकटा वेडा ठरतो. पण... तीच परिस्थिती थोडी उलट करा. एका किनाऱ्यावर ९९ विवस्त्र लोक उभे आहेत, आणि तिथे अचानक एक माणूस पूर्ण कपडे घालून येतो. आता सांगा... वेडा कोण?'

**-आशुतोष जोशी**

# कावड पालखी उत्सवातील दागिने चोरीचा छडा; बीडमधून आरोपी जेरबंद

## पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत; १५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

कावड पालखी महोत्सवादरम्यान गर्दीचा फायदा घेत महिला भाविकांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बीड येथून शिताफीने ताब्यात घेतले. शंकर सर्जेराव गायकवाड (रा. गांधी नगर, नाळवंडी नाका, पेठ, बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीच्या सोन्याच्या दागिन्यांची विक्री करून मिळालेले सुमारे पाच लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत.

७ सप्टेंबर रोजी कावड पालखी महोत्सव पाहण्यासाठी आलेल्या महिला भाविक गर्दीत सहभागी झाल्या असताना अज्ञात आरोपीने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरले होते. याप्रकरणी जुने शहर पोलिस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.



गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना आरोपीचा शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार लेव्हरकर यांनी दोन स्वतंत्र पथके तयार करून तपास सुरू केला. पथकाने अकोला शहरासह विविध ठिकाणचे १५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे सीसीटीव्हीमध्ये दिसणारी व्यक्ती शंकर गायकवाड असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक विष्णू बोडखे यांच्या नेतृत्वाखालील पथक बीड येथे रवाना झाले. बीडमध्ये गोपनीय माहिती आणि तांत्रिक मदतीच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन सापळा रचण्यात आला. पोलिसांनी शिताफीने गायकवाडला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने ७ सप्टेंबर रोजी अकोला येथे कावड उत्सवादरम्यान गर्दीचा फायदा घेत चार ते पाच महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीचे सोने विकून मिळालेले पाच लाख रुपये पोलिसांनी जप्त केले. आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी जुने शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### पोलिसांच्या पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर, पोलिस उपनिरीक्षक विष्णू बोडखे तसेच पोलिस अंमलदार महेंद्र मलिये, वसीमोद्दीन, रवि खंडारे, किशोर सोनवणे, अब्दुल माजिद, स्वप्नील खेडकर, अशोक सोनवणे, दिपाली राठोड आणि प्रकाश लोखंडे यांच्या पथकाने केली.

# कोरडा दुष्काळ जाहीर करा; उद्धवसेना काढणार आक्रोश मोर्चा

## पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यात निघणार मोर्चा; बैठकीत निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

मागील दीड महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपू लागली असून पश्चिम विदर्भातील शेतकरी संकटात सापडला आहे. राज्य सरकारची कर्जमाफी फसवी निघाली असून अद्यापही शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. राज्यातील महायुती सरकार शेतकऱ्यांप्रती उदासीन असल्याचा आरोप करत उद्धवसेनेचे उपनेता आमदार नितीन देशमुख यांनी कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांत शेतकऱ्यांसाठी शिवसेनेच्या वतीने आक्रोश मोर्चा काढणार असल्याचा निर्णय शुक्रवारी आयोजित बैठकीत घेतला.



स्थानिक विश्रामगृह येथे शुक्रवारी दुपारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेता आमदार नितीन देशमुख यांच्या वतीने पश्चिम विदर्भातील अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा तसेच अकोला या पाच जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पश्चिम विदर्भावर कोरड्या दुष्काळाचे सावट असताना महायुती सरकारकडून संभाव्य पाणी टंचाई, चारा टंचाईवर

कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. केंद्र व राज्यातील महायुती सरकारची धोरणे शेतकरी विरोधी असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. कापूस, सोयाबीनला हमीभाव देण्याच्या आश्वासनाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विसर पडला असून शेतकऱ्यांना भूमिहीन, बेघर करण्याचे भाजपचे षडयंत्र असल्याचा आरोप आमदार नितीन देशमुख यांनी केला. अशा संकटसमयी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हे शिवसेनेचे कर्तव्य असल्याचे नमूद करत आमदार देशमुख यांनी शेतकऱ्यांसाठी आक्रोश मोर्चा काढण्याचे निर्देश उपस्थित पाचही जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना दिले. या बैठकीला पाच जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह संपर्क प्रमुख निलेश धुमाळ, सह संपर्कप्रमुख सेवकराम ताथोड, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, मुकेश मुरूमकार, महिला आघाडी संपर्क संघटिका सागरताई पुरी, जिल्हा संघटिका डॉ. सरिता वाकोडे तसेच सर्व उपजिल्हाप्रमुख, जिल्हासंघटक, शहरप्रमुख, तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख आदी उपस्थित होते.

### अकोल्यात २२ सप्टेंबर रोजी आक्रोश मोर्चा

अकोला जिल्ह्यात २२ सप्टेंबर रोजी आक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. स्थानिक स्वराज्य भवन येथून हा मोर्चा निघेल. या व्यतिरिक्त २१ सप्टेंबर-वाशिम, २३ सप्टेंबर-यवतमाळ, २८ सप्टेंबर-अमरावती, तसेच २९ व ३० सप्टेंबर रोजी बुलढाणा जिल्ह्यात मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

### भाजपच्या लोकप्रतिनिधींनी साधली चुप्पी

पावसाने दडी मारल्यामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कपाशीचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांवर भाजपचे स्थानिक खासदार, आमदार बोलायला तयार नाहीत. केंद्रासह राज्यात सत्ता असूनही लोकप्रतिनिधी शासनाकडे शेतकऱ्यांच्या समस्या मांडत नाहीत. ते फक्त पक्ष वाढवण्यात मश्गूल असल्याचा टोला जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांनी लगावला.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६

■ प्रतिनिधी | अकोला ■

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती तालुका, जिल्हा, राज्य यासोबतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढविण्यात आली असून अकोला जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र मंडळांना पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या ँहोर्प्र्दूेन.ज्र्स्र्े.म्द.ग्ह या अधिकृत पोर्टलवर अर्ज सादर करता येणार आहे. स्पर्धा पूर्णपणे विनामूल्य असून, केवळ संबंधित शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असलेल्या संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाच यामध्ये भाग घेता येईल. या संपूर्ण स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई कार्य पाहत आहे. स्पर्धेतील विजेत्यांना विविध स्तरांवर आकर्षक रोख बक्षिसे व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, देशप्रेम रुजवावे - अक्षय राऊत

■ प्रतिनिधी | अकोट ■

शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना अक्षरज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि संपूर्ण आयुष्याला आकार देणारे शिल्पकार आहेत. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त आणि देशप्रेमाची भावना रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन इंडियन स्पीकर फोरमचे वक्ते अक्षय राऊत (अकोला) यांनी केले.

## सिल्वर फाउंडेशनतर्फे २१ आदर्श शिक्षकांचा सन्मान



शिक्षक दिनानिमित्त सुप्रसिद्ध समाजसेवी संस्था सिल्वर फाउंडेशनच्या वतीने अकोट तालुक्यातील आदर्श शिक्षकांचा सन्मान सोहळा रविवार, ६ सप्टेंबर रोजी स्थानिक शिवाजी विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अक्षय राऊत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिल्वर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकरराव पांडे होते. माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल कोल्हे, फाउंडेशनचे उपाध्यक्ष अनिल पालेकर, माजी प्राचार्य संजय वालसिंगे, सचिव रवींद्र कापसे, प्रकल्प प्रमुख सुबोध कराळे, महिला मंडळाच्या अध्यक्षा उज्वलाताई भिसे व रुक्मिणीताई चौखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अक्षय राऊत यांनी शिक्षकांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित करत सिल्वर फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम सातत्याने राबविणे ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २१ शिक्षकांची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली. या शिक्षकांना सहकुटुंब आमंत्रित करून मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सत्कारमूर्ती शिक्षकांनी कार्याची अशा पद्धतीने दखल घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देणारा सिल्वर फाउंडेशनचा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

### यांचा झाला गौरव

गोपाल वानखडे, पंकज गिरी, महेंद्र काकड, नितीन धोरण, सचिन इंगळे, रचना शर्मा, प्रीती पुरोहित, स्वाती महाजन, प्रीती ठाकरे, विभाताई चोपडे, विनोद रसे, रवींद्र अपुतीकर, निवृत्ती आवारे, ज्ञानेश्वर खापरकर, संगीता राठोड, रेश्मा रघुवंशी, शीतल गुहे, सुनीता बिहाडे, दीपक पोके, राहुल पालेकर व निळकंठ काळे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# यंदा श्री मारवाडी प्रेसच्या गणेशोत्सवात गणेश उत्पत्ती झाकी

■ प्रतिनिधी | अकोला ■

आपल्या ९० व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळात या वर्षीही अनेक झाक्यांसह मानवीय व कल्याणकारी उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अशी माहिती मंडळाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत मंडळाचे अध्यक्ष अनिल राठी व सचिव आकि.ंपवन बंग,माजी अध्यक्ष नितीन चांडक यांनी दिली.मंडळाकडून दरवर्षीच्या परंपरेला कायम ठेवत या वर्षीही धार्मिक, सामाजिक व सेवागतिविधींनी परिपूर्ण असे विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत.या वर्षी मंडळाकडून श्री सिद्धिविनायक गणेशजीची रिद्धि-सिद्धि व शुभ-लाभसह भव्य प्रतिमा स्थापित केली जाईल. उत्सवात सोमवार, १४ सप्टेंबर रोजी सायं. ५ वा.श्री गणेश आगमन शोभायात्रा,सायं. ७ वा.श्री गणेश स्थापना, दररोज प्रातः ८ वा. गणेशजी आरती, दररोज सायं. ९ वा. रागिनी संगीत विद्यालयाचे संचालक सतीश खोडवे यांच्या कडून संगीतमय महाआरती,सायं. ९ वा.पंडाल सजावट कलाकारांचा सत्कार,सकाळी ११:३० वा. जिल्हा स्त्री रुग्णालयात भोजन वाटप,१० दिवस दर सोमवारी संपूर्ण वर्ष चालू,मंगळवार, १५ सप्टेंबर रोजी प्रातः ९ वा. मारवाडी प्रेस व सावतराम चाळ परिसरात साफसफाई अभियान,बुधवार, १६ सप्टेंबर रोजी सायं. ४ वा. श्री गीता पारायण, श्री गीता परिवार,अध्यक्षा सौ. कल्पना भूतडा, गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी स ९:३० वा. श्री गणपती अथर्वशीर्ष पाठ,अविनाश देशपांडे व श्री गणेश अथर्वशीर्ष मंडळ सदस्य,शुक्रवार, १८ सप्टेंबर रोजी स ९ वा. आदर्श गौसेवा संस्था, म्हैसपूर येथे गौसेवा,शनिवार, १९ सप्टेंबर रोजी प्रातः ९ वा. भव्य निःशुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राधाकिसन तोषणीवाल पब्लिक ट्रस्ट व दम्माणी नेत्र रुग्णालय यांच्या सहकार्याने, रविवार, २० सप्टेंबर भव्य रक्तदान शिबिर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी व साईजीवन ब्लड बँक सहकार्य,स ९ वा. भव्य आरोग्य तपासणी शिबिर नामांकित डॉक्टरांकडून होत आहे.




## जाहीर नोटीस

**(आदेश ५ नियम २० नुसार नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेसाठी जाहिरात) वि दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) अकोट यांच्या न्यायालयात.**

विशेष दिवाणी दावा क्र. ४२/२०२५ प्रोसेस नं.३५९६/२०२६
चौ.ता. ०१/१०/२०२६ दिनांक : ०४/०९/२०२६

अरुणा हरिभाउ धनबहादुर - वादी
- विरूध्द-
लक्ष्मीबाई वानखडे व इतर -प्रतिवादी

**प्रतिवादी :-** आनंद देवानंद वानखडे, रा. समता नगर, डिमलॅन्ड सिटी रोड, महाराष्ट बॅकेच्या मागे, दर्यापूर, ता. दर्यापूर, जि.अमरावती.

ज्याअर्थी वादी यांनी सोबत जोडलेल्या वादपत्राप्रमाणे तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यसाठी दिनांक ०१/१०/२०२६ रोजी दिवसा १०-३० वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलटवाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पृष्टर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबुन असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

समन्स वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी समन्स वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे की, वर नमूद केलल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तूमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठराल. आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, अकोट

## ज्ञानेश्री अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. अकोला, र.नं. ३५८

रजि. नं. AKL/AKL/RSR (C.R.)/358/2023
शॉप नं.१३ मनपा व्यापारी संकुल, शाळा क्रमांक ५, फुलपाखरु शाळेजवळ, जठारपेठ, अकोला

**तृतीय वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना**

दिनांक : ११/०९/२०२६

ज्ञानेश्री अर्बन को. ऑप. क्रेडीट सासायटी लि. अकोला च्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, **आर्थिक वर्ष २०२५-२०२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २६ सप्टेबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नर्मदा सभागृह, हनुमान नगर वृंदावन नगर अकोला** येथे खालील विषयानुसार कामकाजाकरीता आयोजित केली आहे. तरी आपण सर्वसाधारण सभेकरिता निमंत्रीत असल्याने उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

अकोला
दिनांक : ११/०९/२०२६

**मा. संचालक मंडळाचे आदेशान्वये**
व्यवस्थापक

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५०४/२०२६ प्रोसेस नं.१११९७/२०२६
चौ.ता. १५/१०/२०२६ दिनांक : ०२/०९/२०२६

**अर्जदार :** १. वेणूताई गोविंदराव बावणे २. रविंद्र गोविंदराव बावणे दोघेही रा. पावसाळे लेआउट, हनुमान मंदिर जवळ, मलेरिया कॉलनी, कौलखेड,अकोला. ता. जि. अकोला. ३. जयश्री प्रमोद सौंदळे उर्फ जयश्री गोविंदराव बावणे रा. नागे लेआउट, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ४. राजश्री महेश मालते उर्फ राजश्री गोविंदराव बावणे रा. क्वॉर्टर नं. २१/बी, टाइप ३, व्हीटीसी हातूर, पो. वरणगाव ऑर्ड, फॅक्टरी, उपजिल्हा भुसावळ, जि. जळगाव.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गोविंदा संपत बावणे
**पत्ता :-** रा. पावसाळे लेआउट, हनुमान मंदिर जवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोविंदा संपत बावणे यांचे दि. १०/०७/२०२५ रोजी काळे हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३०/२०२६ प्रोसेस नं.११४५६/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ दिनांक : ०७/०९/२०२६

**अर्जदार :** श्री. सुभाष मदनलाल शर्मा रा. गौरी डुप्लेक्स, राहत नगर, अकोला, ता. जि. अकोला. मो. नं. ९३२५७४९९६५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नरेश मदनलाल शर्मा
**पत्ता :-** रा. रा. गौरी डुप्लेक्स, राहत नगर, अकोला. ता. जि. अकोला.
मो. नं. ९३२५७४९९६५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नरेश मदनलाल शर्मा यांचे दि. २४/०८/२०२५ रोजी राहत्या घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३२/२०२६ प्रोसेस नं.११४६९/२०२६
चौ.ता. २२/१०/२०२६ दिनांक : ०८/०९/२०२६

**अर्जदार :** १. नलिनी रामदास कोठाळे २. योगेशचंद्र रामदास कोठाळे ३. विजय रामदास कोठाळे सर्व रा. डॉ. पिंजरकर यांच्या घराजवळ, छोटी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास केशव कोठाळे
**पत्ता :-** रा. डॉ. पिंजरकर यांच्या घराजवळ, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास केशव कोठाळे यांचे दि. १३/०६/२०१९ रोजी राहत्या घरी लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३९५/२०२६ प्रोसेस नं.१०५३९/२०२६
चौ.ता. ०३/१०/२०२६ दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. पल्लवी मिलिंद पळसपगार मो. नं. ९५२९४६२६७६ २. कु. अपुर्वा मिलिंद पळसपगार ३. अमितकुमार मिलिंद पळसपगार ४. श्रीमती. देवका मधुकर पळसपगार सर्व रा. वार्ड नं. २, हिंगणी बु. ता. जि. अकोला. सध्या रा. दहिहांडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मिलिंद मधुकर पळसपगार
**पत्ता :-** रा. व्दारा श्रीमती. पल्लवी मिलिंद पळसपगार रा. वार्ड नं. २, दहीहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मिलिंद मधुकर पळसपगार यांचे दि. १७/०४/२०२१ रोजी दहिहांडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४८२/२०२६ प्रोसेस नं.११०५४/२०२६
चौ.ता. १३/१०/२०२६ दिनांक : २९/०८/२०२६

**अर्जदार :** १. योगेश रामेश्वर बदरखे २. विजया रामेश्वर बदरखे दोघेही रा. स्वामी विवेकानंद कॉन्व्हेंट जवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. योगिता अमित ढोरे रा. १०२, प्रेम रेसिडेन्सी, आठल्ये प्लॉट, भांबुरकर हॉस्पिटल, रामदासपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामेश्वर महादेवराव बरखे
**पत्ता :-** रा. स्वामी विवेकानंद कॉन्व्हेंट जवळ, जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Digambar Undraji Khadse हे दि. २०.०८.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले आहे. **Asha d/o Udayraj Ambhore Name after Marriage Smt. Asha sd/o Digambar Khadse + 1 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICAT** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **Asha d/o Udayraj Ambhore Name after Marriage Smt. Asha sd/o Digambar Khadse + 1 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदत्तीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काब्द्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०९.०९.२०२६ सहीने से न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
शिक्का दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती..

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अमरावती ता. अंजनगाव सुर्जी मौजे. मु-र्हो खिरंगव्हाण येथील भू-मापन गट क्र. १३१ याचे एकूण क्षेत्र ३ हे. १८ आर यापैकी लिहून देणार १) पुनम राजेश धोटे यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ८२ आर व २) निखिल प्रकाश धोटे यांचे मालकीचे क्षेत्र १ हे. १८ आर व ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशीलांना सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारीत करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक. १२/०९/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर

संपर्क क. ०२३१-२६६८८४७

### श्रीमती. आरती एल. सराफ, न्यायाधीश कामगार न्यायालय अमरावती
## जाहीर नोटीस

**वकीलः एल.पी. राजुरकर**

जावक क्र. ६५२/२०२६
कामगार न्यायालय, अमरावती
जिल्हा व सत्र न्यायालय जुनी इमारत
दुरध्वनी कं. ०७२१-२६६२२०२
दिनांक : ०४१०१/२०२६

**केस नंबर-मिसली नेस डबलुसिए ०६/२०२३** **पुढील तारीख ०७/१०/२०२६**

Shakilabee Sharif Shah And Anr **....अर्जदार**

**सूचना**

Rahul Rajendra Jain and anr ..... **प्रतिवादी**

इस सूचना के द्वारा अवगत किया जाता है कि, उपर दिये गये आवेदकने Rijwan Shah Sharif Shah का काम करते समय दि.३०/१०/२०२२ को दुर्घटना से निधन हो गया और उनके निधन के पश्चात यह सब आवेदक इनके कानुनन वारिस है और इस न्यायालय में अर्जी दाखिल किये है। इस कंपनीने रक्कम धनादेश के द्वारा श्रमिक भरपाई आयुक्त, अमरावती में जमा किया गया है। नुकसान भरपाई की रक्कम रू. १०,००,०००/- (रू. दहा लाख मात्र) इतनी रक्कम उपरोक्त आवेदक ने श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालय, अमरावती में जमा कि गयी उनको वितरण करने के लिये अर्जी दाखिल कि है।

अतः इस सुचना तहत अवगत किया जाता है, कि इस न्यायालय में जमा कि गयी नुकसान भरपाई रकम आवेदको को प्रदान करने पर अगर किसी भी वा व्यक्तीयो को आपत्ति है या उसे विरोध है तो उस प्रकार कि सुचना प्रकाशीत होने के ३० दिन के भितर न्यायालय में दाखल करे। ३० दिन की अवधी समाप्त होने के पश्चात प्राप्त विरोध या सुचना पर विचार नही किया जाऐगा। इससे संबंधित लोग ध्यान रखे।
सुनवाई की तारीख -०७/१०/२०२६

आदेशानुसार
**न्यायालय लिपिक,**
शिक्का **कामगार न्यायालय अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज :- १८११/२०२६ पुढील तारीख ३०.०९.२०२६

**मो. शफी पाच वि निरंक**
**जाहिरनामा / सायटेशन**

**अर्जदार- 1-Mohammad Shafi Shaikh Abdul** Age 75 years, Occu: Nil R/o Naugazi Plot, Anjangaon Surji Tq. Anjangaon Surji, Distt. Amravati**2-Mohammad Amin Mohammad Shafi** Age 42 Years, Occu: Labour R/o Almas Nagar, Juni Wasti, Badnera Amdapur, Tq. Dist. Amravati**3-Mohammad Najim Mohammad Shafi** Age 40 Years, Occu: Labour R/o Bail Bajar, Almas Nagar, Juni Wasti, Badnera Amdapur, Tq. Dist. Amravati**4-Shabana Bano Mohammad Wahid** Age 39 Years, Occu: Housewife R/o Old Town, Badnera, Almas Nagar, Amdapur, Tq. Dist. Amravati**5-Rajpura Shabnamben Sirajbhai** Age 32 years, Occu: Housewife R/o Kesharpura, Idar, Sabarkantha, Gujarat**6-Yasmeen Parveen Abdul Zakir** Age 28 years, Occu: Housewife R/o Tlab Pura, Rithpur Tq. Chandur Bazar, Distt. Amravati

**विरुध्द- गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Batulbi Mohammad Shafi** हया दि. **२७.०९.२०२४ रोजी,** अमरावती येथे मयत झाल्या अर्जदार **Mohammad Shafi Shaikh Abdul + 5** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा Mohammad Shafi Shaikh Abdul + ५ वरीलप्रमाणे सदर्छ मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारलेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०४.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
शिक्का **वरिष्ठ स्तर, अमरावती**

## जाहीर नोटीस
### विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.

आर.एम.जे.सी. नं. ४२८/२०२६ ने.ता. ३१/१०/२०२६

**अर्जदार :- १. वृषाली पराग गावंडे,** वय ४५वर्ष,धंदा- घरकाम रा. रूख्मीनी नगर, अमरावती ता. जि. अमरावती
**२. मनिषा ज्ञानेश्वरराव देशमुख,** वय -३९वर्ष व्यवसाय -घरकाम रा. विरशी ता. भातकुली जि. अमरावती

**विरुध्द- गैरअर्जदार :- निरंक**

**इंडीयन सक्सेशन ॲक्टचे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मयुर बाबुराव देशमुख** यांचा **मृत्यू दि. २८/०७/२०२२** रोजी रा. वणी बेलखेडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यू नंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयुर बाबुराव देशमुख यांची रूरल पोस्टल लाइफ इन्शुरन्स पॉलिसी नंबर आर. एमएच. एन आर. इए. ६०६८५८ दि. १६/१०/२००७ ते ०४/१२/२०२१ पर्यंतची पॉलिसी असुन त्यामध्ये रुपये १,००,०००/- (एकुण एक लाख रूपये फक्त) इतकी रक्कम जमा आहे.
अर्जदारांना सदर रक्कम मिळण्याकरीता तसेच इतर कार्यालयीन कामाकरीता वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी. नं. ४२८/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.
त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०४/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

आदेशानुसार
**सहायक अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार**
शिक्का

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



## क्षयरोग किट वाटप कार्यक्रम

**मोर्शी-** येथे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली फूड बास्केट वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाकरिता तुषार फाउंडेशन अमरावती तसेच क्षयरोग पथक मोर्शी यांचे विशेष सहकार्य लाभले.यावेळी क्षय रुग्णांना गहू,तांदूळ, तूरडाळ,मूंगडाळ,गुड खजूर अशा पौष्टिक अन्नपदार्थाची किट वाटप करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या नेतृत्वात डॉक्टर डे,परिचारिका डे, तसेच थोर पुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केल्या जाते.या क्षयरोग किट वाटपाच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीकांत गोहाड यांनी केले. सदर कार्यक्रमाला रितेश पुंड,अमोल झाडे,डॉ. गिरीश धोटे,रितेश कुकडे, विनय शेलुरे,चेतन मासोतकर तसेच मोर्शी शहरातील क्षयरुग्ण व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेची देशपातळीवर मोठी झेप

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून मनपा प्रशासन व शहरवासीयांचे अभिनंदन

**अमरावती/का.प्र.**

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम' (ऍ्ंझ) अंतर्गत घेण्यात आलेल्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये अमरावती महानगरपालिकेने चमकदार कामागिरी करत राष्ट्रीय पातळीवरील बहुमान मिळवला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) केलेल्या सर्वेक्षणानुसार ३ लाख ते १० लाख लोकसंख्येच्या श्रेणीतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांमध्ये (Best Performing Cities) अमरावती महापालिकेला हे पारितोषिक जाहीर झाले आहे. या यशाब?द्दल अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापालिका



प्रशासन आणि अमरावतीकरांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय 'स्वच्छ वायू दिवस' निमित्त येत्या सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता नवी दिल्ली येथील इंदिरा पर्यावरण भवन, गंगा सभागृहात आयोजित विशेष समारंभात केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री श्री. भूपेंद्र



यादव यांच्या हस्ते हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. अमरावतीकरांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षणः पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना म्हटले, 'अमरावती महानगरपालिकेने राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत सातत्याने राबविलेल्या प्रदूषण नियंत्रण मोहिमा, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांचे हे फलित आहे. शहरात शुद्ध हवा आणि प्रदूषणमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने हा क्षण माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे.'

पुढे बोलताना पालकमंत्र्यांनी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्वच्छता व पर्यावरण विभागाचे कर्मचारी तसेच या मोहिमेत मोलाचे सहकार्य करणाऱ्या अमरावतीच्या सुजाण नागरिकांचे कौतुक केले. या राष्ट्रीय पुरस्कारामुळे आगामी काळात शहराचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी आणि प्रदूषणमुक्तीसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची ऊर्जा महापालिकेला मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## मातृभाषेतील शिक्षणाने जीवन समृद्ध होते-वैशाली पाथरे




**तळवेल-** मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विद्यार्थ्यांच्या विचारांना योग्य दिशा मिळते. मातृभाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून संस्कार, संस्कृती आणि ज्ञानाची प्रभावी वाहक आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजा देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून विभागीय सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे उपस्थित होत्या. यावेळी मन्नालाल गुप्ता विद्यालय चांदुर रेल्वे चे मुख्याध्यापक नितीन कडू यांचा भय्यासाहेब देशमुख स्मृती आदर्श शिक्षक सन्मान देऊन सत्कार करण्यात आला.तसेच संस्था अंतर्गत पुरस्कार शिवराव विद्यालय घाटलाडकी येथील शिक्षक सतिश जाणे यांना देण्यात आला.कार्यक्रमाला माजी उपशिक्षणाधिकारी पंडित पंडागडे, प्रा. प्रकाश तायडे, कॅ. नंदकिशोर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सुवर्णपदक व शिष्यवृत्ती देऊन गौरव करण्यात आला. यामध्यों समृद्धी माधवकर,भावेश इंगोले,माही भोरे,श्रुतिका वऱ्हाडे आदी विद्यार्थ्यांचा तसेच उपस्थित मान्यवरांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेश वानखडे,संचालन डॉ तुषार देशमुख परिचय सुचिता फुटाणे तर आभार भाष्कर काळे यांनी मानले.

## सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट येथे शिक्षक दिन



**अमरावती/का.प्र.**

सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट (SSMITA), अमरावती येथे एमबीए प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता, आदर आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे महाविद्यालय परिसरात उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन तसेच भारताचे माजी राष्ट्रपती, प्रख्यात तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थिनी गौरी गुल्हाणे हिने प्रभावीपणे संचालन करत कार्यक्रमाची सांगड विविध सांस्कृतिक व मनोरंजक उपक्रमांशी घातली.

यावेळी प्रीती वानखेडे आणि वैभव चक्रे यांनी शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. वसुंधरा निस्ताने,वृषभ चौधरी यांच्या संगीत व ऑर्केस्ट्रा सादरीकरणाने उपस्थितांची दाद मिळवली. रेणुका उंबरकर हिने सादर केलेल्या कवितेतून शिक्षकांप्रती कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या, तर श्रावणी तायडे हिने सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात सांस्कृतिक रंग भरला. रोहन इंगोले (एमबीए) यानेही शिक्षक दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार विशेष उल्लेखनीय ठरला. प्रज्वल तायडे यांनी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी रुशाली खंडेराय (एमबीए फायनान्स) हिने आभार केले.

या प्रसंगी SSMITA चे प्रभारी संचालक प्रा. अमोल करमरकर आणि सर्व प्राध्यापक उपस्थित होते. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे उपस्थित शिक्षकांनी कौतुक केले. प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा तसेच परस्पर आदर, कृतज्ञता आणि स्नेहभाव वाढवणारा हा कार्यक्रम उत्साही वातावरणात यशस्वीरित्या झाला.

## तान्हा पोळा व राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक प्रभात एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सन लाईट इंग्लिश स्कूल खोलापुरी गेट व सनलाइट इंग्लिश स्कूल मुजफ्फरपुरा सागर नगर यांच्या संयुक्त विद्यमाने मुजफ्फरपुरा सागर नगर येथे तान्हा पोळा उत्सव, बैल सजावट स्पर्धा व राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धेचे आयोजन उत्साहात करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभात एज्युकेशन सोसायटीचे संस्था अध्यक्ष वि.दा.पवार होते. उद्घाटक म्हणून क्रांतीज्योती ब्रिगेड सामाजिक संघटना संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका अर्चना पांडे, प्रियंका पाटणे,नगरसेवक योगेश विजयकर, संतोष कुऱ्हेकर,कविता पवार सामाजिक कार्यकर्ते विजय सावरकर, सावता परिषदचे शेखर माळोदे,न्यूज २४ चे जिल्हा प्रतिनिधी प्रा. सचिन सरोदे तसेच संस्थेचे पालक प्रतिनिधी सानिया सदफ,शबनम परविन, मसिरा



सदफ, शेख इम्रान,उपस्थित होते.

तान्हा पोळ्यानिमित्त चिमुकल्यांनी आकर्षक पद्धतीने सजविलेले बैल, तसेच राधा-कृष्ण वेशभूषा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे मुस्लिम बहुल वस्तीतील हिंदू-मुस्लिम समाजातील महिलांनी या कार्यक्रमात आवर्जून उपस्थित राहून सहभाग नोंदविला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा सुंदर संदेश मिळाला. कार्यक्रमाच्या माध्यमातून लहान विद्यार्थ्यांनी आकर्षण वेशभूषा व कलाकृती सादर केल्या यामध्ये राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धा इयत्ता पहिलीचे अंशरा फातेमा, अनाया तेजीन,काशाफिया, इयत्ता तिसरी अलिया खानम इयत्ता चौथी सना कौसार, बैल सजावट स्पर्धा इयत्ता दुसरी शेख अफवान,रझा कुरेशी, अशार खान इयत्ता तिसरी इकरा अनम, इयत्ता चौथी आलिना खानम या विद्यार्थी या स्पर्धेमध्ये बक्षीस पटकाविले.कार्यक्रमाची प्रास्ताविक मुख्याध्यापक एल.के.व्ही पवार यांनी केले. संचालन पूर्व मेहरे यांनी तर मुख्याध्यापिका माधुरी नेरकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी यशस्वीकर्ता शाळेतील सर्व शिक्षिकांनी परिश्रम घेतले.

## शिंरजगाव मोझरीत बैलपोळा उत्साहात

### यांत्रिकीकरणामुळे शेतीमधील बैलांचे महत्त्व झाले कमी

**शिंरजगाव मोझरी-** उन्हातान्हाची पर्वा न करता शेतात राबणाऱ्या बैलांना विश्रांती देणारा सण म्हणजे पोळा. दरवर्षी मोठ्या उत्साहात कुऱ्हा गावात साजरा केला जातो. शेतात सोने उगविण्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या आपल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.परंतु अलीकडे यांत्रिकीकरणामुळे शेतीमधील बैलांचे महत्व कमी झालेय. तरीही अनेक शेतकऱ्यांना मशागतीसाठी आजही बैलांवरच अवलंबून राहावे लागते. कारण नेहमी योग्य पद्धतीने जमिनीची मशागत बैलच करू शकते.

शिंरजगाव मोझरी येथे पोळ्याच्या आधल्या दिवशी बैलांचे खांदे मळणी केले जातात. त्यांच्या खांद्याला लोणी हळद लावली जातात.पूजा,नैवेद्य दिले जातात. तसेच नवनवीन झळत्या शेतकरी बांधव म्हणतात.बैल पोळ्याच्या दिवशी वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाला नांगरापासून आणि शेतीपासून आराम दिला जातो.सकाळी बैलांची अंघोळ केली जाते. नंतर त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल,सर्वांगावर गेरुचे ठिपके, शिगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या आणि घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे घालतात, घुंगरे निरनिराळे घातले जातात. पुरणपोळी आणि सुग्रास



अन्नाचा नैवेद्य बैलांना दाखवला जातो. ज्वारीचा ठोंबरा दिला जातो.प्रत्येक शेतकरी बैलांचा साजश्रृंगार करतात. बैल सजवतात, त्यांची मिरवणुकीत काढली जाते. गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री वाजवित एकत्र आणल्या जातात व सायंकाळी पाच वाजता सुमारास बैल पोळा भरवला जातो. महादेवाचे गाणी बोलले जाते. बैल सेवेकरी सर्व बैलांची पूजा करतात. असा हा बैलाचा उत्सव कुऱ्हा येथे साजरा करण्यात आला.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्थापणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरणाचे संरक्षण आणि जलप्रदूषण टाळण्यासाठी मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करून घरीच विसर्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि जागरूक नागरिकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन आणि राजनांदिनी स्मृती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या तीन वर्षांपासून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान,जलप्रदूषण तसेच विसर्जनादरम्यान होणारे अपघात टाळण्यासाठी 'पर्यावरण मित्र क्षमता' या संकल्पनेतून ही मोहीम सुरू करण्यात आली. मातीची मूर्ती घरी स्थापित करून तिचे कुंडीत किंवा टबमध्ये माती व खताच्या साहाय्याने विसर्जन करून त्याच ठिकाणी झाड लावणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रमाणपत्रावर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच राजनांदिनी स्मृती फाउंडेशनचे अध्यक्ष एन. सिंग चंडेल आणि युवा पर्यावरण राजदूत कुमारी क्षमता ठाकूर यांच्या स्वाक्षऱ्या असतील. गेल्या तीन वर्षांत या उपक्रमाला जिल्ह्यातील शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत ६० हजारांहून अधिक विद्यार्थी व नागरिकांचा सन्मान करण्यात आला आहे. यावर्षी सहभागी होणाऱ्या



विद्यार्थ्यांनी आपली नावे व विसर्जनाचे फोटो वर्गशिक्षकांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर किंवा शाळेत सादर करावेत. मुख्याध्यापक व प्राचार्यांनी पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची संख्या राजनांदिनी स्मृती फाउंडेशनच्या ९३७०१०१५७७ या क्रमांकावर कळवावी. गणेश मूर्तीची स्थापना करण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही, केवळ २० ते २५% लोकांनीच स्वेच्छेने मातीच्या मूर्तीची स्थापना केली आहे. २०२३ मध्ये, हा आकडा केवळ ८% होता. ही संख्या वाढायला हवी आणि शिल्पकारांची संख्याही वाढायला हवी. या दिशेने सर्वांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने, अमरावतीमध्ये प्रथमच सुरू करण्यात आलेल्या या अनोख्या मोहिमेचे हे तिसरे वर्ष आहे.पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन क्षमता ठाकूर यांनी केले आहे.

## रमा कुमरे यांना सेवा गौरव सोहळा



**कुऱ्हा-** श्रीराम शिक्षण संस्था धामणगाव (रेल्वे) व्दारा संचालीत कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा येथील चतुर्थ श्रेणी कर्मचारी सावित्री उर्फ रमा कुमरे (अत्राम) ह्या सेवानिवृत्त झाल्या बद्दल सेवा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कुऱ्हा परिसरातील पत्रकार तथा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय सचिव अशोक पवार यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कुऱ्हा येथे कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये सन १९९७ ते २०२६ पर्यंत म्हणजे ३० वर्ष चतुर्थ श्रेणी कर्मचारी या पदावर सतत एकनिष्ठ सेवा दिल्याबद्दल सेवा गौरव मोठ्या उत्साहात घेण्यात आला. या कार्यक्रमाला श्रीराम शिक्षण संस्थेचे सचिव धनश्यामजी मेश्राम, प्रमुख पाहुणे संस्थेचे संचालक सुरेश मुंदडा, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुनिलजी आखरे, प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर, महिला महाविद्यालय अमरावती प्रा. डॉ. किर्ती गांधी (मुंदडा), पत्रकार अशोक पवार, वाल्मिकी अत्राम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला.या कार्यक्रमाचे संचालन प्रा. हर्षा कांबे आभार प्रा.डॉ. निशा नायगांवकर (जोशी) यांनी केले.

## दुर्गाबाई पडोळे यांचे निधन



**बेलोरा-** येथील दुर्गाबाई साहेबरावजी पडोळे वय ८२ वर्ष यांचे निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलं,दोन मुली नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. बेलोरा येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## राज्यस्तरीय सोसायटी गणेशोत्सव सजावट स्पर्धा

**अमरावती-** कुठे पारंपरिक आरास, कुठे आकर्षक देखावा, तर कुठे पर्यावरणपूरक सजावटीतून सामाजिक संदेश गणरायाच्या स्वागतासाठी हाउसिंग सोसायट्यांमध्ये सध्या सजावटीची लगबग सुरू आहे. सजावटीतील कल्पकता आणि कलाकौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी बिर्ला ओपस पेंट्सतर्फे 'बाप्पाचा मान' या राज्यस्तरीय सोसायटी गणेशोत्सव सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर आणि अमरावती या शहरांमधील गृहनिर्माण संस्थांना 'भगवान गणेशाचे घर' तयार करण्यासाठी आणि रंगविण्यासाठी आमंत्रित केले जात आहे.गणेशमूर्तीची निवड, आकर्षक आरास आणि नावीन्यपूर्ण सजावटीसाठी रहिवाशांकडून विशेष प्रयत्न केले जातात.

या कल्पकतेला प्रोत्साहन देताना पारंपरिकता, कलात्मकता आणि पर्यावरणपूरकतेचा समतोल साधणाऱ्या सोसायट्यांना यात वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी मिळणार आहे.पुरस्कारांच्या तीन श्रेणी पुढील प्रमाणे असतील - सर्वोत्कृष्ट बिर्ला ओपस 'हाऊस ऑफ गणपती', सर्वात अद्वितीय मूर्ती, सर्वोत्कृष्ट इको-फ्रेंडली पंडाल.तीन प्रमुख बक्षिसे : प्रथम क्रमांक - ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक-२१ हजार रुपये, तृतीय क्रमांक-११ हजार रुपये पर्यावरणाचाही संदेश : पर्यावरणाची काळजी घेण्यावरही स्पर्धेत भर देण्यात आला आहे. नैसर्गिक वस्तू, पुनर्वापर करता येणारे साहित्य आणि उपलब्ध वस्तूंचा कल्पक वापर करून केलेल्या सजावटीला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

# 'एआय' मोड्यूलने महावितरणचा वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक

## तीन महिन्यांत २८ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

**अमरावती/का.प्र.**

वीजचोरीविरोधी तडाखा देण्याच्या मोहिमेमध्ये महावितरणने आता 'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक सुरु केला आहे. तब्बल १९० भरारी पथकांकडून वीजजोडण्यांची तपासणी आणि 'एआय' मोड्यूलच्या सूक्ष्म विश्लेषणातून गेल्या तीन महिन्यात ६६ कोटी २८ लाख रुपयांच्या २७ हजार ९६४ वीजचोऱ्यांचा पर्दाफाश झाला आहे. आतापर्यंत वीजचोरी व तडजोड शुल्काची रक्कम न भरलेल्या २८९ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वीजचोरीविरोधी पारंपरिक तपासणीसोबतच महावितरणने आता हायटेक मोहीम उघडली आहे. यासाठी थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'मशीन लर्निंग'चा वापर करून वीजचोरीचे अचूक भाकित करणारे मोड्यूल तयार केले आहे. वीजग्राहकांचा किंवा परिसरातील वीज वापराचा जुना आलेख, अचानक घटलेली किंवा वाढलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार आणि इतर ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे हे मोड्यूल २४ तास सूक्ष्म विश्लेषण करत आहे. ज्या ग्राहकांच्या वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळत आहे त्या ग्राहकांना हे 'एआय'चे मोड्यूल 'हाय-रिस्क' श्रेणीत टाकत आहे. त्यामुळे कोणत्याही तपासणीशिवाय थेट चोरी होणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती या मोड्यूलद्वारे उपलब्ध होत आहे.

'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरीच्या ठिकाणांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे राज्यभरात १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजचोरीविरोधी धडक कारवाईत कुठेही हयगय होऊ नये यासाठी वीजजोडण्यांच्या तपासणीपासून ते वीजबिलांच्या आकारणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया 'थेफ्ट ट्रॅकिंग ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी एक स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे.

वीजचोरीचे ठिकाण ते तपासणीचे लाईव्ह फोटो, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे आणि दंडात्मक बिलांची वसूली करेपर्यंतची सर्व माहिती या ॲपमध्ये रिअल-टाईम अपडेट केली जात आहे. त्यामुळे कारवाईत अत्यंत पारदर्शकता आणि वेग आला आहे.

गेल्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत महावितरण अंतर्गत संवसु विभाग आणि सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या नियमित व विशेष पथकांनी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात ५ हजार ८३, कोकण- ११ हजार ८३, नागपूर- ५ हजार ९४९ आणि पुणे प्रादेशिक विभागात ५ हजार ८४९ अशा एकूण २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघड केल्या आहेत. त्यातील २४ हजार ५०८ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे स्पष्ट झाले



आहे व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत वीजचोरीच्या बिलांपोटी १० हजार ८१० प्रकरणांत २९ कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा तडजोड शुल्कासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८९ प्रकरणांत कलम १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

लोकेश चंद्र (मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण) - 'येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहेत्यासाठी वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला प्राधान्य देत विजचोरीविरुद्ध धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी 'एआय' मॉड्यूल विकसित करण्यात आले असून त्याद्वारे वीजचोरीविरुद्धची धडक कारवाई आणखी तीव्र व अचूक करण्यात आली आहे.'

# रस्ते, पुल, इमारतीची कामे दर्जेदार करा- मंत्री शिवेंद्रराजे भोसले



**अमरावती/प्रतिनिधीः-** सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते, पुल आणि इमारतींचे कामे केली जातात. ही कामे जनतेच्या सोयीसुविधांसाठी केली जात असल्याने ही कामे दर्जेदार करण्यावर भर द्यावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात मंत्री भोसले यांनी आज (दि.११) अमरावती विभागातील बांधकाम विभागाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी आमदार प्रविण पोटे, संजय खोडके, प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, हरीष पिंपळे, सुलभा खोडके, राजेश वानखडे, उमेश यावलकर, प्रविण तायडे, किसन वानखडे आदी उपस्थित होते. मंत्री भोसले म्हणाले, धोकादायक पुलांची माहिती घेण्यात आली आहे. या पुलांची आवश्यक ती देखभाल, दुरूस्ती करण्यात यावी. ज्यामुळे कोणतीही दुर्घटना होणार नाही, याची काळजी घ्यावी. पुलाला लोखंडी काठड्यांपेक्षा सिमेंटची कठडे उभारून कायमस्वरूपी व्यवस्था करण्याचे तपासून पहावे. रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात येत आहे. तातडीची उपाययोजना म्हणून मुरूमाने ही खड्डे भरण्यात यावीत. वनक्षेत्रातील रस्ते सध्या अस्तित्वात असलेल्या रूंदीमध्ये बळकट करणे शक्य आहे.

त्यामुळे विभागाने ही कामे सुचवावित. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते आणि इतर कामे करण्याअगोदर लोकप्रतिनिधींना अवगत करावे. यामुळे आवश्यक असणारे कामे सुटणार नाहीत. (पान २ वर)

## सारथी इमारत बांधकामाची केली पाहणी

**अमरावती :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेच्या (सारथी) अमरावती प्रादेशिक कार्यालयाची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आज संबंधित यंत्रणांना दिल्या.

नवसारी परिसर स्थित निर्माणाधीन सारथी प्रादेशिक कार्यालयाला मंत्री भोसले यांनी भेट दिली. आमदार सुलभा खोडके, संजय खोडके, प्रवीण पोटे, सारथीचे उप व्यवस्थापक सचिन सेजल, सार्वजनिक बांधकाम अमरावती प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. येथील २.२४ हेक्टर परिसरात सारथीच्या निर्माणाधीन मुला-मुलींचे वसतिगृह, प्रशासकीय इमारत, सभागृह, उपहारगृह, ग्रंथालय व अभ्यासिका इमारतींची मंत्री भोसले यांनी पाहणी केली व माहिती जाणून घेतली. स्थानिक लोकप्रतिनिधींनी यावेळी येथील सभागृहाची वर्तमान असलेली (पान २ वर)

# बच्चू कडूंच्या वर्षानुवर्षांच्या लढ्याला मोठे यश!

## भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकऱ्यांनाही गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा योजनेत संरक्षण



**अमरावती/प्रतिनिधीः-** 'अपघात एकच असेल तर मदतीचा निकष वेगळा का?' हा मूलभूत प्रश्न उपस्थित करत आमदार बच्चू कडू यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन, निवेदने, शासनस्तरीय पाठपुरावा आणि विधिमंडळात सातत्याने भूमिका मांडली. शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, दिव्यांग आणि एकल महिलांनाही अपघाताच्या प्रसंगी शासनाच्या संरक्षणाच्या कक्षेत आणावे, ही मागणी त्यांनी सातत्याने लावून धरली. या संघर्षाची फलश्रुती म्हणून आता शासनाने गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा योजनेची व्याप्ती वाढविली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने दि. १० सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे 'गोपीनाथ मुंडे शेतकरी/भूमिहीन शेतमजूर/महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना' नव्या स्वरूपात राबविण्यास मान्यता दिली आहे. ही योजना १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहे.

यापूर्वीची योजना प्रामुख्याने ७/१२ वर नाव असलेल्या खातेदार शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीपुरती मर्यादित होती. त्यामुळे प्रत्यक्ष शेतीत राबणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांना अपघाताच्या प्रसंगी या योजनेचे संरक्षण मिळत नव्हते. शासनाच्या नव्या निर्णयातही या मर्यादेची स्पष्ट नोंद करून भूमिहीन शेतमजुरांनाही संरक्षण देण्याची आवश्यकता मान्य करण्यात आली आहे.

**अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख; अपंगत्वालाही आर्थिक आधार-** नव्या योजनेत माहितीधारक खातेदार शेतकरी, भूमिहीन (पान २ वर)

# जिल्हा परिषदेत कोल्ह्याचा शिरकाव

## वनविभागाने केले सुरक्षित रेस्क्यू



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद कार्यालयाच्या परिसरात आज शुक्रवारीं ११ सप्टेंबर रोजी सकाळी अचानक कोल्हा आढळून आल्याने काही काळ खळबळ उडाली. कार्यालयीन कामकाजासाठी कर्मचारी ये-जा करीत असतानाच ध्वज रक्षकाच्या निदर्शनास परिसरात कोल्हा आल्याचे दिसून आले. त्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने वनविभागाला माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे बचाव पथक तातडीने जिल्हा परिषद परिसरात दाखल झाले. पथकाने परिसराची पाहणी करून कोल्हा नेमका कुठे आहे, याचा शोध घेतला. कार्यालय परिसरात कर्मचारी व नागरिकांची वर्दळ असल्याने कोल्ह्याला सुरक्षितपणे पकडण्याचे आव्हान वनविभागासमोर होते.वन विभागाच्या पथकाने नियोजन बद्ध पद्धतीने रेस्क्यू मोहीम सुरू केली. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर कोल्ह्याला कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे (पान २ वर)

# बनावट AI वाघाच्या फोटोप्रकरणी तिवसा पोलिसांत गुन्हा दाखल

## आखतवाडा-मिर्चापूर शेतशिवारात वाघ दिसल्याची अफवा

### दोन जणांविरुद्ध कारवाई

**तिवसा/प्रतिनिधीः-** आखतवाडा-मिर्चापूर परिसरातील शेतशिवारात वाघ दिसल्याचे सांगत सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आलेला फोटो AI च्या माध्यमातून तयार करण्यात आल्याचे समोर आले आहे. या बनावट फोटोमुळे परिसरात वाघ असल्याची अफवा पसरली होती.काही व्हाट्स अप ग्रुपवर वाघाचे बनवट फोटो प्रसिद्ध झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.८ सप्टेंबर २०२६ रोजी आखतवाडा-मिर्चापूर मार्गावरील शेतशिवारात वाघ आढळल्याचा दावा करत काही छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आली. मात्र, संबंधित छायाचित्राची पडताळणी केल्यानंतर तो AI तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार केलेला बनावट फोटो असल्याचे निदर्शनास आले. या प्रकाराची दखल घेत तिवसा क्षेत्राचे वनपाल सोमेश्वर घोरमाडे यांनी तिवसा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर तिवसा पोलिसांनी शेख इमरान शेख जुनैद आणि शेख जाहीर शेख हनीफ, दोघेही रा. आखतवाडा, ता. तिवसा, यांच्याविरुद्ध NCR ची नोंद केली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, या प्रकरणात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३५३(१)(ब) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

वन्यप्राण्यांबाबत (पान २ वर)

# ऑक्टोबरमध्ये शहरातील मध्यवर्ती रेल्वे स्टेशनच्या कामाला सुरुवात

**अमरावती/प्रतिनिधीः-** रेल्वे मार्गीकेचा विस्तार, अप्रोच रोड आदिंसह सर्व तांत्रिक बाबींचा सखोल विचार करून शहरातील मध्यवर्ती रेल्वे स्टेशन येथील पुलाचे काम ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होणार असून हे काम गतीने पूर्ण करून स्थानिक नागरिकांची गैरसोय लवकर दूर करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे यांनी आज येथे दिली.

येथील जुना व जीर्ण झाल्याने पाडण्यात आलेल्या रेल्वे पुलाची पाहणी मंत्री भोसले यांनी केली. आमदार सुलभा खोडके, राजेश वानखडे, संजय खोडके, प्रवीण पोटे, महारेलचे सह महाव्यवस्थापक संग्राम पाटील, सार्वजनिक बांधकाम अमरावती प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.



मंत्री भोसले यांनी सांगीतले, विधिमंडळात अमरावतीतील या रेल्वे पुलाचा विषय उपस्थित झाला होता व राज्य शासनाने यास सकारात्कम प्रतिसाद देत हे काम तातडीने हाती घेण्याचा निर्णय घेतला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने या कामासाठी अर्थसंकल्पात १३० कोटींची तरतूद करून निधीस मंजुरीही देण्यात आली. राज्यातील सर्व रेल्वे पुलांची कामे महारेलद्वारेच करण्यात यावीत हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. आता हे काम महारेल करीत असून यासंदर्भातील निविदा प्रक्रिया व अनुषंगिक कामे पूर्णत्वास जात आहेत. भविष्यात रेल्वे मार्गीकेचा विस्तार करणे तसेच अप्रोच रोड जोडण्यासह सर्व तांत्रिक बाबींचा (पान २ वर)

# एकाच रात्री ३ ज्वेलर्स दुकानांचे शटर फोडले

## ८.६७ लाखांचे दागिने लंपास

### फ्रेजरपुरा, गाडगे नगर राजापेठ परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस बंदोबस्तात व्यस्त असतानाच त्याचाच फायदा घेत चोरट्यांनी शहरात धुमाकूळ घातला आहे. गुरुवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी शहरातील तीन वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराफ दुकानांना लक्ष्य केले. दोन ज्वेलर्स दुकानांचे शटर तोडून सुमारे ८ लाख ६७ हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले, तर तिसऱ्या दुकानात चोरीचा प्रयत्न फसला.

एकाच रात्री घडलेल्या या घटनांमुळे सराफा व्यावसायिकांमध्ये प्रचंड खळबळ आणि संतापाचे वातावरण आहे. माहितीनुसार फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत मोती नगर



परिसरातील मामनेकर ज्वेलर्सचे संचालक अजय रामकृष्ण मामनेकर (वय ५३, रा. राजापेठ) हे शुक्रवारी सकाळी ११ वाजता दुकान उघडण्यासाठी आले असता मुख्य शटरचे दोन्ही कुलूप तुटलेले आढळले. आत जाऊन पाहणी केली असता तिजोरीतील सुमारे ५ ग्रॅम सोने आणि १५० ते २०० ग्रॅम चांदी गायब होती. चोरी गेलेल्या मुद्देमालाची किंमत अंदाजे २ लाख ४७ हजार रुपये आहे.तसेच गाडगे नगर परिसरातील पलाश लाईन येथील वरणकर ज्वेलर्सचे संचालक पंकज सदाशिव वरणकर यांच्या दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. येथून चोरट्यांनी सर्वात मोठा हात मारला असून सुमारे ६ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्या (पान २ वर)

# शाळेसाठी निघालेल्या तीन मुली बेपत्ता

## वलगांव आणि तिवसा पोलीस ठाणे हद्दीतली घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शाळेला निघालेल्या तीन अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता झाल्यामुळे पालक चिंतेत सापडले आहे. वलगांव आणि तिवसा पोलीस ठाणे हद्दीत बुधवारी दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनांमुळे खळबळ उडाली असून पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. वलगाव ठाण्याच्या हद्दीतील १५ आणि १४ वयाच्या दोन शाळकरी मैत्रिणी ८ सप्टेंबर रोजी नेहमीप्रमाणे शाळेत जातो असे सांगून घराबाहेर पडल्या. मात्र, त्या शाळेत पोहोचल्याच नाहीत. सकाळी साडेअकराच्या सुमारास त्या वलगाव रेल्वे स्टेशनच्या दिशेने जाताना एका परिचित व्यक्तीला दिसल्या होत्या. त्यामुळे शाळेसह रेल्वे स्टेशन परिसरात त्यांचा शोध घेण्यात आला. दिवसभर शोध घेऊनही दोन्ही मुलींचा पत्ता लागला नाही. अखेर पालकांच्या तक्रारीवरून वलगाव पोलिसांनी ९ सप्टेंबर रोजी अज्ञात इसमाविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला. दुसरी घटना तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत ९ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. पूर्व माध्यमिक शाळेत शिकणारी १३ वर्षीय मुलगी शाळेत जाण्यासाठी निघाली, पण ती शाळेमध्ये पोहोचलीच नाही. वर्गशिक्षिकेने पालकांना फोन करून याची माहिती दिल्यानंतर कुटुंबाच्या पायाखालची (पान २ वर)

# ५ दिवसाच्या आठवड्यासाठी बॅंक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## राजकमल चौकात जोरदार प्रदर्शन




**अमरावती/प्रतिनिधीः-** बॅंक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बॅंकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश आज (दि.११) रस्त्यावर दिसला. युनायटेड फोरम ऑफ बॅंक युनियन्सच्या आवाहनावरून विविध राष्ट्रीयीकृत बॅंकांचे अधिकारी आणि कर्मचारी राजकमल चौकावर एकवटले आणि त्यांनी जोरदार निदर्शने केली. यानंतरही मागणी पूर्ण नाही झाली तर २६ ऑक्टोबर पासून बेमुद्दत संपाचा इशारा देण्यात आला आहे.

बॅंक कर्मचाऱ्यांनी केंद्र सरकार आणि बॅंक व्यवस्थापनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत ५ दिवसांचे बॅंकिंग तात्काळ लागू करा आणि यापूर्वी झालेल्या द्विपक्षीय कराराचा सन्मान करा, अशी मागणी केली. शुक्रवारीं सकाळ पासूनच विविध राष्ट्रीयीकृत बॅंकांच्या शाखांमधून अधिकारी आणि कर्मचारी राजकमल चौकात पोहोचू लागले. हातात मागण्यांचे फलक आणि बॅनर घेऊन कर्मचाऱ्यांनी एकत्रित प्रदर्शन केले. आंदोलनादरम्यान '५ Day Banking लागू करा', 'कराराचा सम्मान करा', (पान २ वर)

# परतवाड्यात जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा

## १९ जणांवर गुन्हा, १.३९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जुगाराच्या अवैध प्रकारांविरोधात परतवाडा पोलिसांनी कारवाई करत तब्बल १९ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत पोलिसांनी १९ हजार १२० रुपये रोख रक्कम तसेच ११ मोबाईल फोन असा एकूण १ लाख ३९ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पोलीस स्टेशन परतवाडा येथे अपराध क्रमांक ६४८/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार कायद्याच्या कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलीस हेड कॉन्स्टेबल रविंद्र बहोरीया यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांच्या कारवाईत राजेश श्रीरंग देवळेकर (वय ५०, रा. घोडगाव), (पान २ वर)

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सण-उत्सव तसेच गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती पोलिसांकडून दंगा नियंत्रण योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निदा हायस्कूल येथे सायंकाळी ५ ते ६.२० वाजेपर्यंत ही क्वीक रिस्पॉन्स मोहीम राबविण्यात आली.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मोहिमेचा मुख्य उद्देश शहरात अचानक कायदा-सुव्यवस्थेचा



प्रश्न निर्माण झाल्यास पोलीस अधिकारी व अंमलदार किती जलदगतीने घटनास्थळी पोहोचतात, तसेच दंगा नियंत्रणासाठी उपलब्ध मनुष्यबळ आणि यंत्रणा कितपत सज्ज आहे, याची प्रत्यक्ष पाहणी करणे हा होता. या रंगीत तालीमेत पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, परिमंडळ-२चे पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे, गाडगेनागर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे, फ्रेजरपुरा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त नयन आलुरकर, राजापेठ विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्यासह गाडगेनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव उपस्थित होते. (पान २ वर)



# वैद्यकीय तपासणीपूर्वी मद्यपीचा पोलिसांना गुंगारा!

## रुग्णालयातून अचानक पलायन; पाठलाग करून पुन्हा पकडले

**अमरावती/प्रतिनिधीः-** मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालणाऱ्या तरुणाला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले; मात्र तपासणीच्या आधीच त्याने पोलिसांची नजर चुकवून धूम ठोकली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे वलगाव पोलिसांची काही काळ धावपळ उडाली. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता त्याचा पाठलाग सुरू केला आणि रुग्णालय परिसरातूनच त्याला पुन्हा ताब्यात घेतले. गुरुवारी (१० सप्टेंबर) रात्री घडलेल्या या प्रकारामुळे रुग्णालयाच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत २५ वर्षीय तरुण मद्यप्राशन करून गोंधळ घालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत (पान २ वर)

# कसाबपुरात अवैध गोवंश कत्तलखान्यावर छापा

## ८३० किलो गोमांसासह १३.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** पूर्णानगर परिसरातील कसाबपुरा येथे सुरू असलेल्या कथित अवैध गोवंश कत्तलीवर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ८३० किलो गोमांस, दोन गोवंश, कातडी, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि तीन मालवाहू वाहने असा एकूण १३ लाख ७७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत सात जणांविरुद्ध आसेगाव पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी



संरक्षण अधिनियम, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतूक, गोमांस विक्री तसेच गोवंश कत्तलीविरोधात कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. (पान २ वर)

# दारूच्या नशेत वाद; ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

## तरोडा जगताप येथील घटना; मारहाणीत मृत्यू झाल्याचा संशय

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** दारूच्या नशेत झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत होऊन ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना तरोडा जगताप येथे घडली. दादाराव तुकारामजी बोरकर यांचा या घटनेत मृत्यू झाला असून, अरुण भीमरावजी ठाकरे याचे नाव संशयित आरोपी म्हणून समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दादाराव बोरकर आणि अरुण हे दोघेही दारूच्या नशेत असताना त्यांच्यात वाद झाला. वाद वाढल्यानंतर दोघांमध्ये मारामारी झाल्याचे सांगण्यात येत आहे. या मारहाणीत बोरकर गंभीर जखमी झाले. (पान २ वर)

# पावसाअभावी मूग करपला

## शेतकऱ्याने चार एकर उभ्या पिकावर फिरविला रोटर

**खल्लार/प्रतिनिधीः-** गेल्या दिड महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे दर्यापूर तालुक्यात खरीप पिकांची स्थिती अत्यंत दयनिय व चिंताजनक झाली आहे. पावसाअभावी हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यांदेखत करपून जात आहेत. रामागड येथील हवालदिल झालेले शेतकरी विनोद लाजूरकर यांनी त्यांच्या चार एकर उभ्या मुगाच्या पिकावर रोटर (रोटाव्हेटर)



फिरविला आहे. यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून याबाबत शेतकरी वर्गात हळहळ व्यक्त होत आहे.

यावर्षी सुरुवातीला झालेल्या चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने कापूस,मूग, सोयाबीन आणि तूर या पिकांची पेरणी केली होती. मात्र, ऐन वाढीच्या काळातच पावसाने मोठी हुलकावणी दिली. दिड महिनाभरापासून पाऊस गायब असल्याने जमिनीतील ओलावा संपला असून (पान २ वर)